विकास समर्पित मासिक

# योजना

## युवाशक्ती

**तरुणांसाठी रोजगार निर्माण करण्याचे आव्हान**
अलख शर्मा / बलवंत सिंग मेहता

**शिक्षणाच्या माध्यमातून तरुणांचे सक्षमीकरण**
डॉ. राकेश के. वत्स / डॉ. मीनू वत्स

**भारतीय युवक: उदयोन्मुख शक्ती**
ए. के. दुबे


(विशेष लेख)
**नवोद्योग : आव्हाने व भविष्यातील वाटचाल**
सौरभ सन्याल / डॉ. रंजीत मेहता



मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केंद्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४४ ❖ ❖ अंक ११ ❖ ❖ जून २०१७ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖



मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**


**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**


**जाहिरात दर पत्रक**

| | |
|---|---|
| ब्लॅक ॲड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक ॲड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |


## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ■ तरुणांसाठी रोजगार निर्माण करण्याचे आव्हान | अलख शर्मा / बलवंत सिंग मेहता | ५ |
| ■ रोजगारक्षमताः सक्षमीकरण साधण्याचे अचूक साधन | सुनिता संघी | ११ |
| ■ शिक्षणाच्या माध्यमातून तरुणांचे सक्षमीकरण | डॉ राकेश के. वत्स / डॉ. मिनू वत्स | १९ |
| ■ युवा सबलीकरण आणि योग | ईश्वर व्ही बसवारेड्डी | २४ |
| ■ नवोद्योगः आव्हाने व भविष्यातील वाटचाल (विशेष लेख) | सौरभ सन्याल / डॉ. रंजीत मेहता | २७ |
| ■ भारतीय युवक : उदयोन्मुख शक्ती | ए.के. दुबे | ३३ |
| ■ युवापिढीच्या आरोग्यदायी, तणावमुक्त जीवनासाठी योगाभ्यास- (फोकस) | डॉ. ईश्वर एन. आचार्य / डॉ. राजीव रस्तोगी | ३७ |
| ■ बंडखोरीने ग्रासलेला प्रदेश : युवकांसाठी उपक्रम | रवी पोखर्णा | ४२ |
| ■ सामाजिक प्रगती : आर्थिक वाढीच्या पलीकडचा विकास | नताशा भास्कर झा | ४६ |



योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -०२२-२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

संपादकीय

# युवक: आशा भविष्याची

युवक हे राष्ट्राच्या भावी पिढीचे विश्वस्त असतात. जगातील अनेक देशांमध्ये वयस्कर नागरिकांची संख्या वाढत असताना भारत मात्र २०२० सालापर्यंत जगातील सर्वात 'तरूण' राष्ट्र म्हणून ओळखला जाईल. भारताच्या एकूण लोकसंख्येत युवकांचे ४० टक्के प्रमाण असून ही उत्साहाने भरलेली चैतन्यदायी युवाशक्ती देशाचे सर्वात मौल्यवान मनुष्यबळ आहे. अफाट लोकसंख्येचे भारताला मिळणारे लाभ हा आजघडीला जगातील अर्थतज्ञ आणि धोरणकर्त्यांसाठी चर्चेचा मुद्दा बनला आहे. देशाचे भविष्य असलेल्या युवकांना राष्ट्रउभारणीत मोठा वाट उचलण्याची संधी आहे. भारतीय तरुणांमधील सृजनात्मक क्षमतेला उत्साह,ऊर्जा आणि हरहुन्नरीपणाची जोड लाभल्यास ही युवाशक्ती देशासाठी अनेक चमत्कार घडवू शकते.

अभियंते, डॉक्टर्स, वकील, बँक अधिकारी,उद्योजक, खेळाडू अशा अनेक क्षेत्रातील युवकांकडे विविध क्षेत्रांमध्ये देशाचे नेतृत्व करण्याची क्षमता आहे. त्यासाठी गरज आहे ती फक्त युवकांना योग्य मार्गदर्शन आणि संसाधने उपलब्ध करून देउन सुसज्ज करण्याची. असे सुसज्ज युवक निश्चितच देशाच्या विकासात हातभार लावू शकतात. त्या दृष्टीने पहिले पाऊल असेल पोषक वातावरण असलेले घर जिथे मुलांचे आरोग्यदायी वातावरणात संगोपन होऊ शकेल आणि त्याला चांगले शिक्षण मिळू शकेल. त्यासाठी शिक्षण हक्क कायदा २००९ खूपच महत्वपूर्ण ठरला आहे. सर्व स्तरावर दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी सरकारने सर्व शिक्षा अभियान, इ-पाठशाला, उडान ईत्यादि महत्वाचे कार्यक्रम आणि योजना सुरु केल्या आहेत. पहाडी, दुर्गम आणि दूरवरच्या भागांमध्ये जेथे शिक्षणाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी दूरस्थ शिक्षण महत्वाचे ठरते. या पद्धतीचे महत्त्व आता सर्वाना पटू लागले असून ग्यान, स्वयंम आणि नॅशनल लायब्ररी यासारख्या उपक्रमामुळे दुर्गम भागातील लोकांना घरबसल्या शिक्षणाच्या चांगल्या सुविधा मिळू लागल्या आहेत.

शिक्षित युवकांना अर्थातच, विशिष्ट कामांसाठी आवश्यक ती कौशल्ये शिकवणे गरजेचे आहे. आपल्या शाळा-महाविद्यालयांमधील नेहमीचे पारंपरिक शिक्षण सध्याच्या स्पर्धेच्या आणि तंत्रज्ञाच्या युगात युवकांना रोजगार मिळवून देण्यासाठी पुरेसे नाही त्यामुळे आता गरज आहे ती युवकांना सुयोग्य आणि पुरेशी कौशल्ये शिकविण्याची, त्यांना प्रशिक्षित करण्याची. असे झाल्यास भारतातील युवाशक्तीचे रूपांतर सर्वात मोठ्या तंत्रकुशल मनुष्यबळात होईल. नोकरी मिळविण्यासाठी उद्योग-व्यवसायामध्ये ज्या कौशल्यांची गरज आहे, अशी कौशल्ये आत्मसात करण्यासाठी काही उपक्रम हाती घेतले आहेत. त्यात स्किल इंडिया मिशनचा समावेश होतो. या उपक्रमाअंतर्गत सन २०२२ पर्यंत ४० कोटींहून अधिक लोकांना त्यांच्या आवडीनुसार कौशल्ये शिकवून त्यांच्या रोजगाराच्या संधी वाढविण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत दूरस्थ शिक्षण देण्याचीही तरतूद आहे.

शेवटी, रोजगाराच्या चांगल्या संधी म्हणज़ेच युवकांचे सशक्तीकरण होय. कामधंदा नसलेली रिकामटेकडी माणसे समाजासाठी धोका तर असतातच शिवाय देशाच्या अर्थव्यवस्थेसाठीही अशी परिस्थिती चांगली नसते. त्यामुळेच सरकारने नवउद्यमींना प्रोत्साहन देण्यासाठी स्टार्टअप इंडिया आणि स्टॅन्डअप इंडिया यासारखे कार्यक्रम सुरु केले आहेत. 'मुद्रा','सेतू' 'ऐम' ही अशाच काही कार्यक्रमांची नावे आहेत, ज्याद्वारे नवकल्पना आणि उद्योजकतेची संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

युवक हे राष्ट्र उभारणीच्या कामातील आधारस्तंभ असतात. त्यांच्याच हातात नियती बदलण्याची शक्ती असते. फ्रँकलिन रूझवेल्टचे एक वाक्य यासंदर्भात महत्वाचे आहे. तो म्हणतो... 'आपण नेहमीच युवकांचे भविष्य निर्धारित करू शकत नाही, पण आपण युवकांना भविष्यकाळासाठी मात्र निश्चितच तयार करू शकतो"

■■■

# तरुणांसाठी रोजगार निर्माण करण्याचे आव्हान

अलख शर्मा /
बलवंत सिंग मेहता,



**मोठया प्रमाणातल्या वाढत्या युवक वर्गाला सामावून घेण्यासाठी दरवर्षी निर्माण होणाऱ्या नोकऱ्या किंवा रोजगारसंधी खूपच अपुऱ्या पडत आहेत. या समस्येवर उपाय म्हणून भारत सरकारने 'प्रधानमंत्री रोजगार निर्माण कार्यक्रम', 'स्वर्णजयंती ग्राम स्वंरोजगार योजना', 'स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना' तसेच 'मेक इन इंडिया' आणि 'स्कील इंडिया' यासारख्या रोजगार निर्मितीसाठीच्या अनेक योजना सुरु केल्या आहेत.**

जगातली सगळ्यात मोठी तरुणांची लोकसंख्या आज भारतात आहे. जगभरातल्या एकूण तरुणांपैकी एक पंचमांश तरुण एकट्या भारत देशात आहेत. रोजगार विश्वात जर योग्य जागी या तरुणांना संधी मिळाली, तर भारतीय तरुण देशाच्या आर्थिक विकासाला मोठया प्रमाणावर हातभार लावू शकेल. भारताची निम्म्यापेक्षा जास्त, लोकसंख्या (सुमारे ६०.३ टक्के) 'कार्यक्षम वयाच्या' वर्गात म्हणजे १५ ते ५९ वर्ष वयाच्या गटात मोडते, तर लोकसंख्येचा एक चतुर्थांश भाग (सुमारे साडे सत्तावीस टक्के) 'तरुण' वर्गात म्हणजे वय वर्ष १५ ते २९ या गटात येतो. २०११ साली घेतलेल्या जनगणनेवरुन ही आकडेवारी घेण्यात आली आहे. सन २००१ ते २०११ या कालावधीत भारतातल्या तरुण वर्गाच्या लोकसंख्येत झालेली वाढ (सुमारे २ टक्के) ही देशाच्या एकूण लोकसंख्यावाढीच्या दरापेक्षा (सुमारे १.६ टक्के) कितीतरी जास्त होती. परिणाम स्वरुप देशाच्या रोजगार विश्वात दरवर्षी सुमारे १ कोटी तरुणांची भर पडत जाते. त्यामुळे देशात तरुण लोकसंख्येचा फुगवटा जाणवतो आहे. हा फुगवटा, देशाचा उत्तर भाग आणि पूर्वेकडच्या मागासलेल्या राज्यांमधे जास्त प्रमाणात दिसून येतो आहे. मात्र, एवढ्या मोठया प्रमाणातल्या वाढत्या युवक वर्गाला सामावून घेण्यासाठी दरवर्षी निर्माण होणाऱ्या नोकऱ्या किंवा रोजगारसंधी खूपच अपुऱ्या पडत आहेत. या समस्येवर उपाय म्हणून भारत सरकारने 'प्रधानमंत्री रोजगार निर्माण कार्यक्रम', 'स्वर्णजयंती ग्राम स्वंरोजगार योजना', 'स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना' तसेच 'मेक इन इंडिया' आणि 'स्कील इंडिया' यासारख्या रोजगार निर्मितीसाठीच्या अनेक योजना सुरु केल्या आहेत.

या छोट्या लेखातून आपल्या देशासमोर असलेल्या रोजगार निर्मितीच्या आव्हानांचे चित्र, तर स्पष्ट होईलच पण त्याचबरोबर सरकार यासाठी करत असलेल्या उपाययोजनांचा थोडक्यात आढावा घेता येईल. या लेखात वापरण्यात आलेली आकडेवारी, भारत सरकारच्या रोजगार विषयक कार्यालयाने २०१५-१६ या कालावधीत केलेल्या पाचव्या वार्षिक रोजगार सर्वेक्षणाच्या अहवालातून घेतली आहे. सर्वसामान्यपणे युवक वर्ग किंवा तरुण वर्ग म्हणजे वय वर्ष १५ ते २९ मधल्या वयोगटातल्या

व्यक्ती मात्र आपण या लेखासाठी वय वर्ष १८ ते २९ या गटातल्या व्यक्तीच विचारात घेतल्या आहेत. याचे कारण असे की, १५ ते १७ वर्ष वयोगटातल्या खूप कमी व्यक्ती रोजगार विश्वात त्याच्या रोजगाराची वा नोकऱ्यांची नोंद ठेवतात म्हणूनच रोजगार निर्मितीचे आव्हान १८ ते



२९ वर्ष वयाच्या तरुणांशी मोठया प्रमाणावर संबंधित आहे.

**रोजगार सहभागित्व दर (Worker Porticipation Rate-WPR)**

रोजगार सहभागित्व दर - WPR- म्हणजे रोजगार, व्यवसाय वा नोकरीधंदा असणाऱ्या व्यक्तींचे एकूण लोकसंख्येशी गुणोत्तर सन २०१५-१६ मधे प्रौढ व्यक्तींच्या गटाचा म्हणजे ३०वा त्यापेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींचा WPR हा ५७.३ टक्के होता. तर युवकांसाठी हाच दर ३९.२ टक्के होता. (कोष्टक क्रमांक १ पहा) अर्थात हे अपेक्षितच आहे. कारण वय वर्ष १८ ते २९ या गटातल्या व्यक्ती मोठया प्रमाणात शैक्षणिक संस्थांमध्ये हजर राहतात आणि पुढील शिक्षण घेत असतात. कोष्टक क्रमांक १ वरुन हे देखिल दिसून येते की, शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात जास्त व्यक्ती कामधंदा किंवा रोजगार उपलब्ध असलेल्या आहेत. तसेच १८ ते २९ वर्ष या वयोगटातल्या महिलांशी तुलना करता पुरुषांचा WPR कितीतरी जास्त आहे.**कोष्टक क्रमांक १ Work Partcipation Rate (UPS) by Age Group** २०१५-१६

| Sector | 18-29 Years | | | 30+ Years | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | M | F | P | M | F | P |
| Rural | 63.1 | 19.1 | 42.3 | 89.0 | 29.8 | 60.1 |
| Urban | 48.6 | 11.8 | 30.7 | 82.6 | 16.7 | 50.4 |
| Total | 59.3 | 17.1 | 39.2 | 87.1 | 26.0 | 57.3 |

Source: Labour Bureau, Report on Youth Employment and Unemployment Scenario,

(स्रोत: रोजगार प्राप्त असलेल्या आणि रोजगारापासून वंचित राहिलेल्या युवकांबाबतचा कामगार कार्यालयाने दिलेला अहवाल. दुसरा खंड २०१५-१६ भारत सरकार)

**टिप्पणी :** UPS - सर्वसाधारण मुख्य स्थिती M-पुरुष, F-स्त्रिया, P- व्यक्ती

**कोष्टक क्रमांक २ : २०१५-१६ मधल्या विविध वयातल्या कामगारांचे ते करत असलेल्या कामानुसार वर्गीकरण**

| | 15-17 Years | | | 18-29 Years | | | 30 Years & above | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | R | U | R+U | R | U | R+U | R | U | R+U |
| Self Employed | 40.8 | 30.9 | 39.7 | 40.5 | 33.3 | 39.0 | 51.2 | 43.4 | 49.2 |
| Wage/ Salaried employee | 5.1 | 18.9 | 6.5 | 14.1 | 37.6 | 19.0 | 10.5 | 33.8 | 16.5 |
| Contract Worker | 3.6 | 7.7 | 4.0 | 4.6 | 8.4 | 5.4 | 2.4 | 4.9 | 3.0 |
| Casual Worker | 50.6 | 42.6 | 49.7 | 40.8 | 20.7 | 36.6 | 35.9 | 17.9 | 31.0 |
| Total | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |

कोष्टक क्रमांक २ लक्षपूर्वक बघितल्यावर असे लक्षात येते की, ३० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या कामगारांपैकी निम्मे कामगार स्वयंरोजगार करतात. त्या तुलनेत १८ ते २९ वर्ष वयोगटातल्या कमी म्हणजे सुमारे दोन पंचमांश कामगारांनी स्वयंरोजगाराचा मार्ग धरला आहे. कोष्टक क्रमांक २ बघितल्यावर असाही निष्कर्ष काढता येतो की जास्तीत जास्त तरुणवर्ग रोजगार मिळवताना नियमित आणि रोजंदारीवर काम करायला पसंती देतो आहे. ही पद्धत शहरी आणि ग्रामीण, अशा दोन्ही भागात सारखीच दिसून येते आहे.'

(**स्रोत** : रोजगार मिळालेल्या आणि न मिळालेल्या युवकांबाबत भारत सरकारच्या कामगार कार्यालयाने दिलेल्या अहवालाचा दुसरा खंड, २०१५-१६.)

**टिप्पणी :** R-शहरी U- ग्रामीण

**उद्योगधंद्यानुसार विभागणी :**

कामगारांची त्यांच्या उद्योगधंद्यानुसार विभागणी बघितली तर असे लक्षात येते की १८ ते २९ वर्ष वयोगटातल्या बहुतांश व्यक्ती (सुमारे ३८.१ टक्के) शेतीप्रधान वा शेतीशी संबंधित उद्योगांमधे कार्यरत आहेत. त्या पाठोपाठ व्यापार, हॉटेल आणि उपहारगृहांमधे काम करणारे तरुण (१९.४ टक्के), बांधकाम व्यवसाय (१५.१ टक्के), उत्पादन किंवा वस्तु निर्माण (१३.१

टक्के) आणि त्याशिवाय इतर सेवा काम करणाऱ्या व्यक्ती आहेत. वय वर्ष ३० पेक्षा जास्त वयाच्या प्रौढ व्यक्तींच्या गटाशी तुलना करता असे दिसून येते की तरुण लोकांचा कल बिगरशेती क्षेत्रातल्या बांधकाम, वस्तुनिर्माण, उत्पादन, व्यापार आणि इतर रोजगारांच्या संधीकडे अधिक आहे. शेती क्षेत्राकडून इतर क्षेत्राकडे तरुणांनी वळण्याचे महत्त्वाचे कारण हे आहे की कृषी क्षेत्र खूप कामगारांना सामावून घेऊ शकत नाही. त्याबरोबरच उत्तमोत्तम शिक्षण घेतलेल्या तरुणांना चांगला मोबदला देऊ शकणारे रोजगार उपलब्ध करुन देण्याची क्षमता कृषी क्षेत्रात नाही, हे सत्यही स्विकारावे लागेल.

**प्रौढ व्यक्तींचा याच कालावधीतला बेरोजगारीचा दर फक्त १.६ टक्के होता. (कोष्टक क्रमांक ४ पहा) तरुणांचा दर ११.३ टक्के होता. तर याच वयाच्या तरुणींचा बेरोजगारीचा दर तरुणांच्या दुप्पट म्हणजे २० टक्के होता. शहरी भागात ग्रामीण भागाच्या तुलनेत बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे आणि पुरुषांपेक्षा स्त्रियांमधे हे प्रमाण जास्त आहे हे कोष्टक ४ वरुन स्पष्ट होत आहे. शहरी भागातल्या तरुण स्त्रियांमधे बेरोजगारीचे प्रमाण २८ टक्के इतक्या चिंताजनक पातळीवर आहे. याच भागातल्या बेरोजगार तरुणांचे प्रमाण फक्त ११.५ टक्के आहे. वय वर्ष १५-१७ या गटातल्या खूप कमी व्यक्ती रोजगार वा कामधंदा करतात, तरीही या गटातल्या बेरोजगारीचे प्रमाण देखिल १८ ते २९ वर्ष वयोगटातल्या व्यक्तींएवढेच आहे याला महत्त्व द्यायला हवे.**

**कोष्टक क्रमांक ३ : कामाच्या स्वरुपानुसार विविध वयोगटातल्या व्यक्तींच्या गटांची विभागणी, २०१५-१६.**

| Industry | 18-29 Year | 30+ Year |
|---|---|---|
| Agriculture & allied | 38.1 | 47.2 |
| Mining & Quarrying | 0.9 | 1.1 |
| Manufacturing | 13.2 | 9.6 |
| Electricity, gas and Water Supply | 0.6 | 0.6 |
| Construction | 15.1 | 10.0 |
| Trade, Hotels and Restaurants | 19.4 | 17.5 |
| Transport, Storage and Communication | 3.7 | 3.9 |
| Financial, insurance, real estate and business services | 8.3 | 9.2 |
| Community, social and personal services | 0.7 | 0.8 |
| Total | 100.0 | 100.0 |

(**स्रोत** : कोष्टक २ प्रमाणेच)

**बेरोजगारीचा दर :**

काम करण्यासाठी इच्छुक आणि उपलब्ध असलेल्या पण काम न मिळालेल्या अजूनही कामाच्या शोधात असलेल्या व्यक्तींचे एकूण लोकसंख्येशी गुणोत्तर म्हणजे बेरोजगारीचा दर. सन २०१५-१६ मध्ये १८ ते २९ वर्ष वयोगटातल्या तरुणांचा बेरोजगारीचा दर १३.२ टक्के होता. हा दर ३० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तीच्या दराशी तुलना करता आठपटीपेक्षाही जास्त होता. प्रौढ व्यक्तींचा याच कालावधीतला बेरोजगारीचा दर फक्त १.६ टक्के होता. (कोष्टक क्रमांक ४ पहा) तरुणांचा दर ११.३ टक्के होता. तर याच वयाच्या तरुणींचा बेरोजगारीचा दर तरुणांच्या दुप्पट म्हणजे २० टक्के होता. शहरी भागात ग्रामीण भागाच्या तुलनेत बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे आणि पुरुषांपेक्षा स्त्रियांमधे हे प्रमाण जास्त आहे हे कोष्टक ४ वरुन स्पष्ट होत आहे. शहरी भागातल्या तरुण स्त्रियांमधे बेरोजगारीचे प्रमाण २८ टक्के इतक्या चिंताजनक पातळीवर आहे. याच भागातल्या बेरोजगार तरुणांचे प्रमाण फक्त ११.५ टक्के आहे. वय वर्ष १५-१७ या गटातल्या खूप कमी व्यक्ती रोजगार वा कामधंदा करतात, तरीही या गटातल्या बेरोजगारीचे प्रमाण देखिल १८ ते २९ वर्ष वयोगटातल्या व्यक्तींएवढेच आहे याला महत्त्व द्यायला हवे.

कोष्टक क्रमांक ४ : २०१५-१६ **सालचा विविध वयोगटातल्या बेरोजगारीचा दर.**

| Sector | 15-17 Year | | | 18-29 Year | | | 30+ Year | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | M | F | P | M | F | P | M | F | P |
| Rural | 18.4 | 22.8 | 19.5 | 11.2 | 17.9 | 12.7 | 0.9 | 3.7 | 1.6 |
| Urban | 22.1 | 21.4 | 22.0 | 11.5 | 27.9 | 15.1 | 0.7 | 5.3 | 1.5 |
| Total | 18.8 | 22.7 | 19.8 | 11.3 | 20.0 | 13.2 | 0.9 | 4.0 | 1.6 |

सुशिक्षित युवकांमधले बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस जास्त वाढत चालले आहे. शैक्षणिक पातळी जसजशी वाढत जाईल, तसेच बेरोजगारीचे प्रमाण वाढत जाते हे कोष्टक क्रमांक ४ वर नजर टाकल्यावर समजून येईल. पदवीपूर्व पातळीवरचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या युवकांमधे २३ टक्के बेरोजगारी दिसून येते पण पदवी घेतलेल्या किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षण पूर्ण केलेल्या व्यक्तींमधे बेरोजगारीचे प्रमाण ३५ टक्क्यांपर्यंत वाढलेले दिसते. सुशिक्षित तरुणींमधे सुशिक्षित तरुणांपेक्षा बेरोजगारीचे प्रमाण लक्षणियरित्या जास्त आहे. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

**कोष्टक क्रमांक ५ : वयोगट आणि शैक्षणिक पातळीनुसार बेरोजगारीचा दर**

| Education | 18-29 Years | | | 30 + Years | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | M | F | P | M | F | P |
| Not Literate | 4.0 | 6.2 | 4.9 | 0.6 | 3.0 | 2.2 |
| Below Primary | 4.8 | 5.8 | 5.1 | 0.6 | 1.9 | 1.6 |
| Primary | 5.5 | 8.0 | 6.2 | 0.6 | 2.3 | 1.0 |
| Middle/Secondary/Higher | 9.2 | 17.1 | 10.4 | 0.7 | 4.8 | 1.6 |
| Certificate course at undergraduate level | 21.3 | 31.3 | 23.5 | 0.6 | 11.2 | 2.4 |
| Diploma at Graduate level | 20.9 | 33.1 | 23.0 | 1.0 | 7.6 | 1.4 |
| Graduate & above | 29.7 | 47.7 | 34.8 | 2.3 | 13.5 | 6.2 |
| All | 11.3 | 20.0 | 13.2 | 0.9 | 4.0 | 1.6 |

पदवीपूर्व किंवा पदवी पातळीवर प्रमाणपत्र परिक्षा किंवा डिप्लोमा केलेल्या १८ ते २९ वर्ष वयोगटातल्या सुशिक्षित तरुणींपैकी एक तृतीयांश तरुणी रोजगारापासून वंचित आहेत. ज्या तरुणींनी पदवी घेतली आहे किंवा त्यापेक्षाही जास्त शिक्षण घेतले आहे. त्यांच्या बाबतीत परिस्थिती आणखी वाईट आहे. त्यांच्यातला बेरोजगारीचा दर सुमारे ४८ टक्के इतका चिंताजनक आहे. याचा अर्थ असा होतो की भारतीय रोजगार विश्वात निर्माण होणाऱ्या



रोजगार संधी अपुऱ्या आहेतच, पण त्याबरोबरच स्त्रियांना नोकरीवर ठेवण्यामधे किंवा रोजगार उपलब्ध करुन देण्यात मोठा भेदभाव केला जातो, असे दिसून येते आहे. याचे अजून एक कारण असे असू शकेल की स्त्रियांना सुयोग्य ठरणारे रोजगार निर्माण होत नाहीत किंवा झालेच तर त्या ठिकाणी स्त्रियांना नोकरी करणे सुलभ व्हावे या दृष्टीने वाहतूक, पाळणाघरे इत्यादी सारख्या पायाभूत सुविधांची वानवा असते. एकंदरीत काय तर तरुण वर्गासाठी पुरेशा रोजगार संधी निर्माण करणे भारताला अजूनही शक्य झालेले नाही. शहरी भागातल्या तरुण स्त्रियांच्या बाबतीत हे आव्हान अजूनच गंभीर आहे.

**सरकारने केलेल्या नवीन उपाययोजना**

सरकारने याआधी तरुणांना रोजगार मिळावा या हेतुने अनेक स्वयंरोजगार योजना आणल्या होत्या, पण त्यांचे परिणाम फारसे समाधानकारक नाहीत. म्हणून गेल्या काही वर्षात युवकांमधे व्यवसाय करण्यासंबंधी जागृती व्हावी, प्रोत्साहन मिळावे या हेतुने 'स्टार्ट अप विथ मुद्रा '(Micro Units Development and Refinance Agency), 'स्टार्ट अप इंडिया', 'प्रधानमंत्री मुद्रा योजना', 'इझ ऑफ डुईंग बिझनेस', स्टार्ट अप व्हिलेज एंटरप्रुनरशिप प्रोग्रॅम इत्यादीं सारख्या नव्या योजना केंद्र सरकारने सुरु केल्या. या योजनांविषयी थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे :

**'स्टार्ट अप इंडिया' आणि 'स्टँड अप इंडिया'**

उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारने २०१६ साली 'स्टार्ट अप इंडिया' आणि 'स्टँड अप इंडिया' असे दोन उपक्रम सुरु केले. ज्यामधे विविध उद्योगांना मदत व्हावी म्हणून करात सवलत आणि १० हजार कोटी रुपयांचा स्टार्ट अप निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. व्यवसाय चालवण्यातली सुलभता

आणखीन वाढवण्यासाठी नवीन व्यावसायिकांना नोंदणी प्रक्रिया, कायदेशीर अटी, नियामकांचे नियंत्रण, कर सवलत इत्यादी गोष्टींमधे उदार दृष्टीकोनातून मदत करण्यासारख्या अनेक उपाययोजना सरकारने केल्या. डिसेंबर २०१६ पर्यंत देशात ४ हजार ७०० स्टार्ट अप उद्योग उभे होते. मात्र यापैकी सुमारे २०० उद्योग एका वर्षातच बंद करावे लागले कारण त्यातून अपेक्षित परिणाम साध्य झाले

**ग्रामीण भागातल्या नागरिकांनी अधिकाधिक उद्योग सुरु करावेत, या उद्देशाने सरकार 'स्टार्ट अप व्हिलेज एंटरप्रुनरशिप प्रोग्रॅम' ही योजना आखत आहे. या भागाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी अगदी तळाच्या म्हणजे गाव पातळीवर आवश्यक ती प्रेरणा निर्माण व्हायला मदत होईल. सन २०१५ ते २०१९ या चार वर्षांच्या कालावधीत देशभरातल्या २४ राज्यांमधल्या १२५ गटांमधे कार्यरत असलेल्या सुमारे १ लाख ८२ हजार ग्रामीण उद्योगांना पाठिंबा देऊन ही योजना त्यांचे सशक्तीकरण करेल, अशी अपेक्षा आहे.**

नाहीत. इंडिया स्टार्ट अप आऊटलुक रिपोर्ट २०१७ मधे जरी असा दावा केला गेला आहे की हे नैसर्गिक प्रगतीचेच उत्तम उदाहरण आहे आणि सध्याच्या अत्यंत स्पर्धात्मक जगात २० टक्क्यापेक्षा जास्त स्टार्टअपस् टिकाव धरु शकत नाहीत, तरीही या कार्यक्रमाच्या प्रगतीवर होत असलेल्या आरोपांकडे जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. 'स्टार्ट अप इंडिया' ही योजना देखिल २०१६



सालच्या जानेवारीत सुरु झाली. तिचा उद्देश अनुसूचित जाती, जमाती आणि महिला यासारख्या दुर्लक्षित गटांमधल्या उद्योजकतेला प्रोत्साहन देणे, मदत करणे हा होता. केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयाने २०१७ ला तयार केलेल्या अहवालानुसार डिसेंबर २०१६ पर्यंत 'स्टँड अप इंडिया' योजनेमधून मंजूर झालेल्या एकूण कर्जांची संख्या १५,३४१ आहे. ज्यामधे २०५५ महिला, अनुसूचित जातींतल्या २५६८ व्यक्ती, तर अनुसूचित जमातींमधल्या ७१८ व्यक्तींचा समावेश आहे.

**'प्रधानमंत्री मुद्रा योजना'**

सूक्ष्म आणि लघु उद्योगांना संस्थात्मक अर्थ पुरवठ्याचा फायदा मिळावा याकरिता केंद्र सरकारने एप्रिल २०१५ मधे प्रधानमंत्री मुद्रा योजना सुरु केली. उद्योगांच्या विकासाची किंवा वाढीची पायरी आणि त्या पायरीवर त्या त्या उद्योगाला लागणारी निधीची गरज यानुसार प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत तीन प्रकारची कर्जे मंजूर केली जातात. शिशु (५०,००० हजार), किशोर (५०,००० हजार ते ५ लाख) आणि तरुण (५ लाख ते १०लाख) या योजनेअंतर्गत मार्च २०१६ पर्यंत एकूण १.२५ दशअब्ज रुपयांची कर्जे वितरीत झाली. त्यातल्या ३२.७ दशलक्ष कर्जदारांपैकी ३०.३ दशलक्ष कर्जदार 'शिशु' प्रकारातले आहेत.

**'स्टार्ट अप व्हिलेज एंटरप्रुनरशिप प्रोग्रॅम'**

ग्रामीण भागातल्या नागरिकांनी अधिकाधिक उद्योग सुरु करावेत, या उद्देशाने सरकार 'स्टार्ट अप व्हिलेज एंटरप्रुनरशिप प्रोग्रॅम' ही योजना आखत आहे. या भागाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी अगदी तळाच्या म्हणजे गाव पातळीवर आवश्यक ती प्रेरणा निर्माण व्हायला मदत होईल. सन २०१५ ते २०१९ या चार वर्षांच्या कालावधीत देशभरातल्या २४ राज्यांमधल्या १२५ गटांमधे कार्यरत असलेल्या सुमारे १ लाख ८२ हजार ग्रामीण उद्योगांना पाठिंबा देऊन ही योजना त्यांचे सशक्तीकरण करेल, अशी अपेक्षा आहे. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर ग्रामीण भागातल्या ३ लाख ७८ हजार व्यक्तींना रोजगार मिळेल, असा अंदाज जाणकारांनी दर्शवला आहे.

**'निष्कर्ष'**

भारत सध्या लोकसंख्येच्या स्थित्यंतराच्या अवस्थेतून जात आहे. परिणामी, भारताच्या तरुण वर्गाचे एकंदर लोकसंख्येशी असलेले गुणोत्तर वाढत आहे. संख्येत सतत वाढत जाणाऱ्या तरुण वर्गाला उत्तम शिक्षण आणि अनुरुप नोकऱ्यांची सातत्यपूर्ण निर्मिती यांची आवश्यकता असते. आतापर्यंत केलेल्या विश्लेषणावरुन असे दिसून येत आहे की हे आव्हान

पेलायला कठीण आहे. विशेषत: सुशिक्षित तरुणांना सुनिश्चित रोजगार पुरवणे हेच मोठे कठीण काम आहे. एकीकडे जगभरात नोकरी वा इतर प्रकारे अर्थार्जन करणाऱ्या स्त्रियांमधे

**भारत सध्या लोकसंख्येच्या स्थित्यंतराच्या अवस्थेतून जात आहे. परिणामी, भारताच्या तरुण वर्गाचे एकंदर लोकसंख्येशी असलेले गुणोत्तर वाढत आहे. संख्येत सतत वाढत जाणाऱ्या तरुण वर्गाला उत्तम शिक्षण आणि अनुरुप नोकऱ्यांची सातत्यपूर्ण निर्मिती यांची आवश्यकता असते. आतापर्यंत केलेल्या विश्लेषणावरुन असे दिसून येत आहे की हे आव्हान पेलायला कठीण आहे. विशेषत: सुशिक्षित तरुणांना सुनिश्चित रोजगार पुरवणे हेच मोठे कठीण काम आहे.**

सगळ्यात कमी प्रमाण भारतात दिसून येते हे दुर्दैवी सत्य समोर असतानाच दुसरीकडे अर्थार्जन करायची इच्छा आणि पात्रता असणाऱ्या भारतीय स्त्रियांमधे बेरोजगारीचे प्रमाण खूप जास्त आहे. सरकारचे प्रयत्न योग्य दिशेने सुरु असले तरीही अजून खूप काही करण्यासारखे आहे. दीर्घ मुदतीच्या आणि इतर सर्वच आर्थिक धोरणांमधे रोजगार निर्मितीचा मुद्दा समाविष्ट व्हायला हवा आहे. भारतीय अर्थव्यवस्थेमधे पुरेशा प्रमाणात नोकऱ्या वा रोजगार निर्माण झालेले नाहीत. रोजगार निर्मितीची प्रक्रिया वेगवान व्हावी यासाठी विविध मंत्रालयांनी त्यांचे कार्यक्रम योजना आणि धोरणांमधे रोजगार निर्मितीला महत्त्व द्यायला हवे. देशाच्या पश्चिम आणि दक्षिण भागात ज्या प्रमाणात नोकऱ्या वा इतर रोजगारांमधे वाढ होऊन त्या भागांचा विकास झालेला दिसतो. तसा तो मध्य आणि पूर्वेकडच्या भागात झालेला दिसत नाही. हे आवर्जून लक्षात घ्यायची गरज आहे. अशा प्रकारचा प्रादेशिक असमतोल दूर व्हायला हवा आणि स्थानिक तरुणांना त्यांच्या भागातच उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन द्यायला हवे. त्याचप्रमाणे, सरकारचे विविध कार्यक्रम आणि धोरणे यांच्यात असा उपयुक्त बदल घडवून आणायला हवा, ज्यामुळे अधिकाधिक स्त्रियांना अर्थार्जन करता येईल.

आपल्या देशाने लोकसंख्येच्या प्रकारात होणारे संक्रमण लक्षात घेऊन त्यानुसार वेगाने बदल घडवून आणले तर हे संक्रमण आपल्यासाठी वरदान ठरेल. पण जर तसे करता आले नाही तर याच संक्रमणामुळे निर्माण झालेला बेरोजगार तरुणांचा प्रश्न अनर्थाला कारणीभूत होईल.

■■■

*लेखक अलख शर्मा हे नवी दिल्ली स्थित 'इन्स्टीट्यूट फॉर ह्यूमन डेव्हलपमेंट' या संस्थेचे संचालक असून विकास आणि कामगार क्षेत्रातील ख्यातनाम अर्थतज्ञ आहेत. डॉ. बलवंत सिंग मेहता हे शर्मा यांचे सहकारी असून त्याच संस्थेत कार्यरत आहेत.*

email : alakh.sharma@ihdindia.org
balwant.mehta@ ihdindia.org




विकास समर्पित मासिक
**योजना**
नियमित वाचा, वर्गणीदार व्हा.

## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी UNICODE (Mangal) or KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत, हे नम्र आवाहन.

# रोजगारक्षमताः सक्षमीकरण साधण्याचे अचूक साधन

**सुनीता संघी**



**राष्ट्रीय युवा धोरण २०१४ च्या अनुसार, १५ ते २९ वयोमर्यादेत येणारी सर्व युवापिढी वेगवेगळ्या गरजा, आवश्यकता मानणारी आहे. सन २०११ नुसार ही युवा पिढी एकूण लोकसंख्येच्या २८% असून भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (GNI) ३४% भागात स्वत:चे योगदान देते. भारतीय युवा जनतेचा राष्ट्रीय घरगुती उत्पादनातील टक्का हा त्यांचा श्रम करण्याचे योगदान आणि त्यांची उत्पादकता वाढवून वाढविता येईल.**

भारत सध्या जनसांख्यिकीय संक्रमणाच्या शिखरावरती आहे, आणि एकूण लोकसंख्येच्या ६५% जनता ही कार्यशील वयोमर्यादेत (WORKING AGE) म्हणजेच १५-५९ वर्षांमध्ये आहे. हीच तर संधी आहे दुनियेच्या मोठमोठया अर्थव्यवस्थांची कौशल्यपूर्ण मनुष्यबळाची गरज पूर्ण करण्यासाठी एक सक्षम असे कौशल्य भांडवल उभारण्याची. मात्र यामध्ये अचूक कौशल्ये आणि सर्व देशांनी स्विकारलेल्या मापदंडांचा ताळमेळ मात्र हवा.

राष्ट्रीय युवा धोरण २०१४ च्या अनुसार, १५ ते २९ वयोमर्यादेत येणारी सर्व युवापिढी वेगवेगळ्या गरजा, आवश्यकता मानणारी आहे. सन २०११ नुसार ही युवा पिढी एकूण लोकसंख्येच्या २८% असून भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (GNI) ३४% भागात स्वत:चे योगदान देते.भारतीय युवा जनतेचा राष्ट्रीय घरगुती उत्पादनातील टक्का हा त्यांचा श्रम करण्याचे योगदान आणि त्यांची उत्पादकता वाढवून वाढविता येईल.

ह्या लोकसंख्येचा लाभ भारताला सर्वच ठिकाणी समान होतो असे नाही. भारताचा द्वीपकल्पीय प्रदेश ज्यामध्ये पश्चिम बंगाल, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्रप्रदेशचा समावेश होतो, आणि भारताचा आंतरीय पृष्ठप्रदेश म्हणजेच मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तरप्रदेश आणि बिहार ही राज्ये, यामध्ये कमालीची तफावत आहे. भारताचा हा द्वीपकल्पीय प्रदेश, त्याच्या कार्यशील जनतेतील तीव्र चढउतार हे चीन आणि कोरिया या देशांशी साम्य दाखवतात तर पृष्ठीय प्रदेश हा तुलनेने तरुण आणि चपळ, आणि विपुल प्रमाणात युवाशक्तीने भरलेला आहे. त्यामुळे या दृष्टीकोनातून दोन भारत दिसून येतात. एक आहे द्वीपकल्पीय प्रदेश म्हणजेच प्रौढ भारत. जेथे प्रौढ आणि वडिलधाऱ्यांच्या गरजांकडे लक्ष वेधले जात आहे आणि दुसरीकडे आहे पृष्ठप्रदेश म्हणजेच जवान भारत. जेथे शिक्षण कौशल्य आणि रोजगारीच्या संधी अशा गोष्टींकडे लक्ष वेधायला हवे आहे.

तरीही, या युवकांना व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकासासाठी स्थलांतरित करणे हे तसे या राज्यांसाठी कठीण काम आहे.या मागील कारणे म्हणजे स्थलांतरित होण्याची इच्छा नसणे, प्रशिक्षणाचा खर्च करण्यास सक्षम नसणे वा मान्यता नसणे, अशिक्षितता, आणि जागृतीचा अभाव अशी बरीच कारणे आहेत. युवकांच्या सक्षमतेचा प्रश्न श्रमिक बाजारातील युवकांच्या सहभागावर नजर फिरवण्याची गरज असल्याचे सुचवतो.

### युवक आणि श्रमिक बाजार

श्रमिक बाजारातील दर्शक म्हणजेच कामगारांच्या सहभागी होण्याचा दर

(कार्यरत तथा कार्येच्छुक), कामगार संख्येचा दर, आणि बेरोजगारीचा दर हा तक्ता क्र. १ मध्ये दिलेला असून भारताच्या श्रमिकबाजारातील युवकांबद्दलची स्थिती याबद्दल फार महत्वाची माहिती पुरवून जाते.

**तक्ता क्र. १.**

| **ग्रामीण पुरुष** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **वर्गगट** | १९९९-२००० | | | २०११-१२ | | |
| | **LFPR** | **WPR** | **UR** | **LFPR** | **WPR** | **UR** |
| १५-१९ | ५३२ | ५०३ | ६.५ | ३३३ | ३०३ | ११.४ |
| २०-२४ | ८८९ | ८४४ | ६.२ | ७८८ | ७४२ | ६.९ |
| २५-२९ | ९७५ | ९५० | ३.२ | ९६३ | ९४२ | २.८ |
| १५-२९ | - | ७४१ | ५.१ | - | ६१६ | ६.१ |
| एकूण | ५४० | ५३१ | - | ५५३ | ५४३ | - |

| **ग्रामीण स्त्रिया** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **वर्गगट** | १९९९-२००० | | | २०११-१२ | | |
| | **LFPR** | **WPR** | **UR** | **LFPR** | **WPR** | **UR** |
| १५-१९ | ३१४ | ३०४ | ३.१ | १६४ | १५६ | ८.० |
| २०-२४ | ४२५ | ४०९ | ४.९ | २९७ | २७८ | ९.९ |
| २५-२९ | ४९८ | ४९१ | २.४ | ३६९ | ३५७ | ५.८ |
| १५-२९ | - | ४०० | ३.७ | - | २५८ | ७.८ |
| एकूण | ३०२ | २९९ | - | २५३ | २४८ | - |


| **ग्रामीण स्त्रिया** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **LFPR** | **WPR** | **UR** | **LFPR** | **WPR** | **UR** |
| १५-१९ | ३१४ | ३०४ | ३.१ | १६४ | १५६ | ८.० |
| २०-२४ | ४२५ | ४०९ | ४.९ | २९७ | २७८ | ९.९ |
| २५-२९ | ४९८ | ४९१ | २.४ | ३६९ | ३५७ | ५.८ |
| १५-२९ | - | ४०० | ३.७ | - | २५८ | ७.८ |
| एकूण | ३०२ | २९९ | - | २५३ | २४८ | - |


| **शहरी पुरुष** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **LFPR** | **WPR** | **UR** | **LFPR** | **WPR** | **UR** |
| १५-१९ | ३६६ | ३१४ | १५.४ | २५६ | १४.४ | |
| २०-२४ | ७५५ | ६५८ | १३.९ | ६६४ | ५९४ | ११.६ |
| २५-२९ | ९५१ | ८८३ | ७.५ | ९५१ | ९०६ | ५.३ |
| १५-२९ | - | ५९३ | ११.५ | - | ५५८ | ८.९ |
| एकूण | ५४२ | ५१८ | - | ५६३ | ५४६ | - |

| **शहरी स्त्रिया** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **LFPR** | **WPR** | **UR** | **LFPR** | **WPR** | **UR** |
| १५-१९ | १२१ | १०५ | १५.५ | ८९ | ७८ | १५.३ |
| २०-२४ | १९१ | 155 | 25.8 | 197 | 160 | २१.९ |
| २५-२९ | २१४ | १९४ | १५.८ | २५३ | २३१ | १०.८ |
| १५-२९ | - | १४९ | १९.९ | - | १५७ | १५.६ |
| एकूण | १४७ | १३९ | - | १५५ | १४७ | - |
| -स्रोत एनएसएसओ रोजगार आणि बेरोजगारी सर्वेक्षणाच्या विविध फे-या | | | | | | |

श्रमिकांचा कामांमध्ये सहभागी होण्याचा दर (Labour Force Participation Rate), कामगारांच्या संख्येशी असलेले गुणोत्तर (Worker Population Ratio) आणि तरुणांमधील बेरोजगारीचा दर (Unemployment Rate) याची वयोनिहाय वर्गवारी खालीलप्रमाणेः ह्या तक्त्यावरुन इतके स्पष्ट आहे की, सर्व वयोगटांमधून लिंग वा स्थान ह्या निकषांस वगळून श्रमिकांचा वा कामगारांचा (श्रमशक्तीतील लोकसहभाग) चा दर घसरत आहे. यातही ही तीव्र घट ग्रामीण महिलांबाबतीत जरा जास्त आहे. या तीव्र घटीमागील कारण हे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी नसणे किंवा सामाजिक अथवा धार्मिक कारणांमुळे अशा संधी उपलब्ध न होणे असू शकतात. तरुण मुलांच्या (पुरुषांच्या) सहभागातील घटीचे कारण म्हणजे ही मुले श्रमिक बाजारात शिरण्याआधी तेथे लागणारी कौशल्ये आत्मसात करण्याच्या प्रयत्नात असतात. १५-२९ ह्या वयोगटातील मुलांचा कामातील सहभागाचा दर आणि श्रमिकांच्या सहभागाचा कल समान असल्याचे दर्शवतो.

सर्व प्रकारच्या वयोगटांवर नजर फिरवता बेरोजगारीचा दर हा ६.१% ते १५.६% यादरम्यान आहे. शहरी भागातील तरुण महिलांना (१५-२९) बेरोजगारीचा सर्वांत जास्त अनुभव आहे. तो म्हणजे १५.६%

इतका. या मागील मुख्य कारण 'कौटुंबिक पाठिंबा' असावे.विविध युवा वयोगटामध्ये, बेरोजगारीचा दर १५-२९ या गटाचा दर चढता आहे. कल घटता असला तरी राष्ट्रीय सरासरीपेक्षा मात्र तो जास्त आहे हे निश्चित.

बेराजगारीचा टक्का जास्त आहे, विशेषत शिक्षित मुलांमधील बेरोजगारी ही सुध्दा जास्तीत जास्त लोकसंख्या असण्याचा फायदा घेऊ देत नाही. इ यु एस २०११-१२ च्या माहितीनुसार, युवकांमधील बेरोजगारीचा उच्च दर हे सुचवतो की, तरुणांच्या कामाबद्दलच्या आकांक्षा वाढलेल्या आहेत आणि सोबतच या आकांक्षा आणि उपलब्ध रोजगार संधी यांच्यातील असंतुलनही वाढलेले आहे. तक्ता क्र. २ वरुन असेही दर्शनास येते की, बेरोजगारीचा हा वाढता दर फक्त शिक्षित वा पदवीप्राप्त मुलांकडेच जास्त नसून पदविका व प्रमाणपत्र धारक व्यावसायोपयुक्त शिक्षण ग्रहण करणाऱ्या मुलांमध्येही जास्त आहे.

हा तक्ता पाहून कळते की येथे एकीकडे युवक रोजगार शोधत आहेत तर दुसरीकडे उद्योग समूह कौशल्यपूर्ण मनुष्यबळाच्या शोधात आहेत. विरोधाभास असा की, ना युवकांना रोजगार मिळतो ना उद्योगांना मनुष्यबळ. कौशल्यातील हे असंतुलन युवकांना बेरोजगार बनवते कारण एखाद्या ठराविक प्रकारच्या कौशल्याची मागणी त्या प्रमाणात पगार व शैक्षणिक अर्हता असलेल्या मनुष्यबळाचा त्या क्षेत्रातील पुरवठा वाढवते. किंवा शैक्षणिक अर्हता ही त्या कामाच्या ठिकाणी लागणाऱ्या नैपुण्यापेक्षा वेगळे असणे, किंवा शैक्षणिक अर्हता आणि ते काम करण्यासाठी लागणारी गुणवत्ता यात

**तक्ता २**

**२०११-१२ च्या शिक्षणाच्या अनुषंगाने बेरोजगारीचा सामान्य दर**

| सामान्य शिक्षण दर | बेरोजगारीचा दर (१५-२९ वर्षे) | | | |
|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | | शहरी | |
| | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| अशिक्षीत | २.३ | ०.८ | २.५ | १.६ |
| प्राथमिक शाळा शिक्षीत | ३.२ | ०.६ | ४.८ | ४.३ |
| अल्प शिक्षीत | ४.२ | ४.६ | ५.१ | ५.८ |
| माध्यमिक शाळा शिक्षीत | ४.६ | ८.६ | ५.५ | १५.१ |
| उच्च माध्यमिक शाळा शिक्षीत | ६.५ | १३.८ | १२.० | १४.६ |
| पदविका प्रमाणपत्र | १५.९ | ३०.० | १२.५ | १७.३ |
| पदवी व इतर | १९.१ | २९.६ | १६.३ | २३.४ |
| एकूण | ५.० | ४.८ | ८.१ | १३.१ |

**एकूण भारतीय बेरोजगारीतील ४९% भाग हा या युवा बेरोजगारांनी भरला आहे, आणि आजघडीला भारतात अनौपचारिक क्षेत्रात ९३% संधी उपलब्ध आहेत. सुशिक्षीत तरुणाईचा बहुतांश टक्का हा एकतर बेरोजगार आहे, अर्धरोजगारीत आहे, रोजगाराच्या शोधात आहे किंवा नोकरी करत आहे वा असुरक्षित कार्यक्षेत्राच्या संपर्कात आहे. अलिकडच्या इंडिया स्किल अहवालानुसार, शिक्षित युवकांपैकी ४०% जण हे रोजगार करण्यायोग्य आहेत.**

फरक असणे, किंवा तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे कौशल्य निष्फळ ठरणे इ.

एकूण भारतीय बेरोजगारीतील ४९% भाग हा या युवा बेरोजगारांनी भरला आहे, आणि आजघडीला भारतात अनौपचारिक क्षेत्रात ९३% संधी उपलब्ध आहेत. सुशिक्षीत तरुणाईचा बहुतांश टक्का हा एकतर बेरोजगार आहे, अर्धरोजगारीत आहे, रोजगाराच्या शोधात आहे किंवा नोकरी करत आहे वा असुरक्षित कार्यक्षेत्राच्या संपर्कात आहे. अलिकडच्या इंडिया स्किल अहवालानुसार, शिक्षित युवकांपैकी ४०% जण हे रोजगार करण्यायोग्य आहेत. मात्र, गरिबीचा प्रश्न सोडवणे, कामाच्या ठिकाणातील असुरक्षितता, बाजाराशी संबंधित कौशल्यांचा अभाव, माहितीचा अभाव, कौशल्य विकासविषयक असमज अशी आव्हाने आहेतच. १) चालू काळातील मागणी असलेल्या कौशल्यांचा पुरवठा करणे, २) उद्योग आणि कामगारांसाठी बदलास स्विकारण्यासाठी मदत करणे, ३) येत्या काळातील श्रमिक बाजारातील गरजांसाठी लागणारी पात्रता निर्माण करणे आणि सातत्य ठेवणे, ह्याची आव्हानांना तारण्यासाठी गरज आहे. आता खरा प्रश्न आहे तो रोजगारक्षमतेमध्ये सुधारणा होण्यासाठी धोरण काय असावे.

### रोजगारक्षमतेसाठी पुढाकार

जनसंख्येचा फायदा करुन घेण्यासाठी आणि युवा जनतेला रोजगारक्षम बनवण्यासाठी, राष्ट्रीय कौशल्य विकास मिशन आणि कौशल्यविकास आणि इंटरप्रिनरशिप साठी

आखलेल्या राष्ट्रीय नवधोरणाबरोबर नवे मिशन आरंभ केले आहे. हे नवे मिशन कुशल लोकांचा पुरवठा करणे, लोकांना बाजारातील मागणीनुरुप कुशल बनवणे वा आवश्यक कुशलता येण्यासाठी प्रयत्न करणे, सामान्य आणि जागतिक मानकांनुसार (Standards) प्रमाणन होण्यासाठी राष्ट्रीय कौशल्यार्हता आराखड्याचे समर्थन करणे, मनुष्यबळाचा मागणी आणि पुरवठा यांची सांगड घालणे आणि उद्योगक्षमतेला प्रेरणा पुरवणे यावर लक्ष केंद्रीत करते. शासनाचे विविध कार्यक्रम हे मंत्रालये (शासन यंत्रणा) संपर्क यंत्रणा, लोकांना दिलेली वचनबद्धता पाळणे, जागतिक भागिदारी, कार्यक्रमांची व्याप्ती आणि समर्थन, आयसीटी चा वापर या गोष्टींचा मेळ साधू पाहतात. शिवाय प्रशिक्षकांना प्रशिक्षण आणि संपर्कयंत्रणेतील सुधारणा आणि कार्यक्रम हे वंचित लोकांपर्यंत पोहचावयास यावे ह्याकडेही शासन लक्ष देऊन असते.

व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे म्हणून क्षमता आणि दर्जा या दोन्ही निकषांच्या सुधारणांचा विचार करता व्यावसायिक शिक्षणाला शालेय शिक्षण इयत्ता नववी आणि वरील वर्ग इथपासून सुरुवात करण्याचे त्याचसोबतीने उद्योग समूहांना अभ्यासक्रमातून, प्रात्यक्षिकांतून या वयोगटांपर्यंत पोहोचण्याचे आणि शिक्षकांना प्रशिक्षण पुरवण्याचे योजिले आहे. उद्योग समूहांनी संबंधित पाठ्यक्रमांची रचना करुन उद्योगशिक्षण संस्थांची संरचना उभारली जाईल. इतर उद्योगसमूहांबरोबर सामंजस्य करार केले जातील. कौशल्य मंडळांद्वारे उद्योगसमूह जोडले जातील, तंत्रज्ञानातील प्रगतीचा फायदा सेवापुरवण्यात होईल, शिकाऊ उमेदवारांच्या प्रशिक्षणावर लक्ष दिले जाईल. ज्यामुळे शिक्षार्थी उपलब्ध होण्यास मदत होईल. जागतिक पातळीवरील रोजगार आणि कामाच्या ठिकाणांवरील बदलाचा आढावा घेता सरकार आणि शासन यांच्या जोडणीतून कुशल कामगार घडवण्यासाठी नव्या संस्था उभारल्या जातील. विद्यापीठे पात्र शिक्षकांना उभारण्याचा, अभ्यासक्रमातून संशोधन आयोजण्याचा आणि व्यावसायिक शिक्षणासाठी अध्यापनशास्त्र तयार करण्याचा आणि त्यासाठी आवश्यक संस्थांचे पर्यवेक्षण करण्याचा प्रयत्न करत आहे.

---

**व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे म्हणून क्षमता आणि दर्जा या दोन्ही निकषांच्या सुधारणांचा विचार करता व्यावसायिक शिक्षणाला शालेय शिक्षण इयत्ता नववी आणि वरील वर्ग इथपासून सुरुवात करण्याचे त्याचसोबतीने उद्योग समूहांना अभ्यासक्रमातून, प्रात्यक्षिकांतून या वयोगटांपर्यंत पोहोचण्याचे आणि शिक्षकांना प्रशिक्षण पुरवण्याचे योजिले आहे. उद्योग समूहांनी संबंधित पाठ्यक्रमांची रचना करुन उद्योगशिक्षण संस्थांची संरचना उभारली जाईल. इतर उद्योगसमूहांबरोबर सामंजस्य करार केले जातील.**

---

कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचा अंतर्भाव करुन एकूण २० मंत्रालये विस्तारितपणे सामान्य कार्यक्रम, प्रांतिय कार्यक्रम आणि क्षेत्रीय कार्यक्रम युवकांमधील रोजगारक्षमता वाढवण्यासाठी राबवत आहेत. विविध कौशल्यांची गरज पाहून सध्या एकूण १३००० हून अधिक संस्था, ४००० हून अधिक तंत्रशिक्षण संस्था, आणि २०००० हून अधिक व्यावसायिक शिक्षण देणारे अभ्यासक्रम उपलबध आहेत. त्यामुळे लोकांमधील गुणवत्तेला पूर्ण वाव देऊन प्रमाणपत्र, क्रेडिट ॲक्युम्युलेशन आणि बदली अशा बाबींचा परिचय होउन त्यांची पात्रता वाढवता येते. अनौपचारिक क्षेत्रातील मोठया प्रमाणात असलेला काम आणि मर्यादित कौशल्यांचा वापर पाहता त्याला प्रमाणनाची गरज आहे. पीएमकेव्हीवाय मार्फत मिळालेल्या पूर्वप्रशिक्षणाची ओळख वा प्रमाणपत्र ही कौशल्य विकास वा पुनर्विकास यामध्ये समाविष्ट होण्यासाठी कामगारांकरिता महत्वाची पायरी असेल. श्रमिक बाजारात समाविष्ट होण्यासाठी आणि रोजगारक्षम कुशलता अंगी बाणवण्यासाठी पीएमकेव्हीवाय शाळा सोडलेल्या मुलांसाठी अजून एक संधी उपलब्ध करुन देत आहे. तरीही, यासाठी श्रमिक बाजारामध्ये महत्वाकांक्षी कौशल्य प्रशिक्षण रुजवण्यास मोठे समर्थन वा प्रोत्साहन असावे लागणार आहे.

राष्ट्रीय कौशल्य विकास एजन्सी हस्तक्षेप करत आहे. उदा. राष्ट्रीय कौशल्य अर्हता आराखडा, जो गतिशीलता आणण्यास मदत करते. कौशल्यांना महत्वाकांक्षी करण्यात येते. केंद्र शासनाने चालवलेल्या कार्यक्रमांत खर्च, काल आणि पाठ या सर्व बाबतींत एकसमानता येण्यासाठी नियमावली तयार केली जाते, श्रमिक बाजार माहिती प्रणालीने सर्व सभासदांबाबतीतील विषमता दूर करण्याचा प्रयत्न करणे, देशभरातील कौशल्य विकसनाचे निरीक्षण करणे इ. राष्ट्रीय कौशल्य

विकास कार्पोरेशन, ज्याप्रमाणे २०१५ च्या धोरणात ठरवलेली ध्येये मिळवण्याद्दृष्टीने प्रशिक्षण सक्षम करत आहे, त्याचप्रमाणे पायाभूत सोयीसुविधांसाठी खासगी क्षेत्रांची तयारी करण्यास प्रेरणा देत आहेत. क्षेत्र कौशल्य मंडळे आणि उद्योगसमूहांनी चालवलेल्या संस्था मूल्यांकन आणि प्रमाणपत्रासाठी मदतशील असणाऱ्या पाठ्क्रमाची प्रशिक्षणासोबत सांगड घालून देत आहेत. गरीब विद्यार्थ्यांना कौशल्य विकास कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी कौशल्य कर्ज देण्याचा शासनाने पुढाकार घेतला आहे.

आवश्यक धोरणे आणि कार्यक्रमांचा दिखावा कितीही जोरकस असला तरी खरी गरज आहे ती युवाशक्तीला किती प्रमाणात लाभ होतो हे पाहण्याची आणि योग्य कुशलतेने आर्थिक विकासाची कास धरण्याची. पुढील भागात युवा शक्तीला उद्धारासाठी आखलेल्या धोरणाचे ११ महत्वाचे मुद्दे विस्ताराने पाहूया.

१. **युवकांच्या आकांक्षाना समजून घेणे-** तरुणांच्या इच्छा आकांक्षांना समजून घेण्याचा प्रयत्न करणे म्हणजे शाश्वत कौशल्य विकासाची गुरुकिल्ली होय. ज्याचा थेट फायदा सामाजार्थिक समावेशनाचा अभ्यास करण्यासाठी किंवा रोजगाराच्या अद्ययावत संधी पुरवण्यासाठी होतो. इयुएस २०११-१२ या प्रशिक्षणार्थ उपलब्ध महितीचे विश्लेषण पुढील आकडेवारी मांडतेः २२.३% ग्रामीण तरुण (पुरुष) वाहन चालन आणि यांत्रिकी कामाचे व्यावसायिक शिक्षण घेत होते,२६.३% शहरी पुरुष संगणक व्यापारात व्यस्त होते. त्याचप्रमाणे ३२.२% ग्रामीण स्त्रिया ह्या वस्त्रोद्योग आणि कौशल्यकामात व्यग्र असून शहरी स्त्रियांपैकी ३०.४ टक्के संगणकीय कामांत आहे. मात्र या राष्ट्रीय कौशल्य विकास कार्पोरेशनचा 'स्किल गॅप' अहवाल म्हणतो तेव्हा प्रशिक्षणाची गरज आणि प्रशिक्षणाचे साध्य यांमध्ये तफावत आहे. या अहवालानुसार रोजगार निर्मितीचा उच्चदर असणारी क्षेत्रे कुशल कामगारांचा ओघ सहन करतात, हे खरेतर आव्हानच आहे. द स्किल गॅप रिपोर्ट नुसार कौशल्य मांडणीचे परिशिष्ट १ उपरोक्त विधानाला दुजोरा देते वा युवाजनतेच्या आशाआकांक्षांना समजून घेण्याची विलक्षण गरज असल्याचे अधोरेखित करते. मांडणीमध्ये समाविष्ट माहिती हेच सांगते की, बहुतांश राज्यांत बांधकाम, दळणवळण आणि वाहतूक, कृषी आणि संबंधित उपक्रम (अन्न प्रक्रिया उद्योग) यास मोठी मागणी आहे मात्र कित्येक राज्यांत या व्यवसायधंद्यांना व रोजगाराला जराही मागणी नाही.

---

**२०२२ सालापर्यंत भारताला ११० दशलक्ष लोकांनी कौशल्य प्राप्त करायला हवे तर २९० दशलक्ष लोकांसाठी पूर्णकौशल्य किंवा कौशल्यांत वाढ करणे गरजेचे आहे. हे फार मोठे आव्हान असून याकरिता विद्यार्थ्यांनी गतीशील होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर प्रांताप्रांतातील तरुणांनी कौशल्य प्राप्त करुन घेणे गरजेचे आहे. आपण तरुणांना कशाप्रकारे गतीशील करु शकतो यावर कौशल्य प्रशिक्षणाचा कार्यक्रम अवलंबून आहे. आजच्या घडीला असे चित्र आहे की, प्रशिक्षार्थीचे गतीमान होणे हे , प्रशिक्षकाच्या हाती आहे.**

---

हे असंतुलन भरुन काढणे आणि अर्थव्यवस्थेची गरज समजून घेणे यासाठी युवाकांक्षांना समजून घेणे खूपच गंभीर गोष्ट आहे. या कौशल्यांना मिळालेली स्वत:ची ओळख आणि त्यातील प्राविण्याबद्दल मिळालेला पुरस्कार तरुणांना कौशल्य प्रशिक्षणासाठी खूप उमेद देतो, प्रेरणा देतो. लहानपणापासूनच श्रमांबद्दलचा आदर मनात आकारास आला की, कामगारपेशाबद्दलचे समज बदलण्यात मदत होते. कौशल्य कार्यक्रम प्रसिध्दीस आणे आणि आशेचे अंकूर फोडण्यासाठी निराळी यंत्रणा राबवली पाहिजे. ज्यामुळे गतिशीलता प्राप्त होईल.

२. **गतीशीलता** राष्ट्रीय कौशल्य विकास आणि उद्दयोजकता धोरण २०१५च्या म्हणण्यानुसार २०२२ सालापर्यंत भारताला ११० दशलक्ष लोकांनी कौशल्य प्राप्त करायला हवे तर २९० दशलक्ष लोकांसाठी पूर्णकौशल्य किंवा कौशल्यांत वाढ करणे गरजेचे आहे. हे फार मोठे आव्हान असून याकरिता विद्यार्थ्यांनी गतीशील होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर प्रांताप्रांतातील तरुणांनी कौशल्य प्राप्त करुन घेणे गरजेचे आहे. आपण तरुणांना कशाप्रकारे गतीशील करु शकतो यावर कौशल्य प्रशिक्षणाचा कार्यक्रम अवलंबून आहे. आजच्या घडीला असे चित्र आहे की, प्रशिक्षार्थीचे गतीमान होणे हे , प्रशिक्षकाच्या हाती आहे.

व्यावसायिक कोर्सची माहिती नसणे आणि रोजगाराच्या येऊ घातलेल्या संधी यांच्याबद्दलची अनभिज्ञता यामुळे युवक गतीशील होत नाहीत. त्याचबरोबर स्थलांतराबद्दल अनुत्सुक असणे आणि कालबाह्य कौशल्ये ही कारणेही विचारात घ्यायला हवीत.

आजच्या घडीची गरज ही की, खास धोरणात्मक प्रशिक्षण मिळणे.द स्किल सखी मॉडेल अर्थात आदर्श कुशल महिला हा महाराष्ट्र शासनाचा अभिनव प्रयोग आहे. या अंतर्गत महिलांना गतीशील होण्याकरिता प्रशिक्षण देण्यात येते. स्थानिक

पातळीवरील महिलांचा कौशल्य विकास कार्यक्रम सहभाग वाढावा हा यामध्ये हेतू आहे. स्थानिक महिलांना कौशल्य विकासात पुढे घेऊन जाण्याचा हा एक मार्ग आहे. स्थानिक मंडळे सक्रीय होऊन हा कार्यक्रम राबवू शकतात. यामधील तरुण तरुणी संपूर्ण माहिती अद्ययावत करुन त्यांना रोजगाराभिमुख बनवून त्यांच्यातील उद्योजक जागवून प्रोत्साहन देऊन आपण आपले उद्दीष्ट्य गाठू शकू. वर उल्लेखलेली माहिती या तरुण तरुणींच्या आधार खात्याशी तसेच बँक खात्यांशी जोडून एसएसडीएम या शासकीय पोर्टलवर अपलोड करता येईल. यातील कार्यरत मंडळी दारोदारी जावून याचा प्रसार करु शकतात. तरुण तरुणींच्या पालकांशी संवाद साधू शकतात. त्याचप्रमाणे बेरोजगारांच्या व्यथा ऐकणे व त्याना कौशल्य विकासाचे महत्व सांगणे हे उल्लेखनीय ठरेल.

राष्ट्रीय जागृती मोहिम अंतर्गत, शाळा, महाविद्यालये, तसेच शैक्षणिक संस्था यांच्याशी संवाद साधण्याचा कार्यक्रम राबवून, प्रशिक्षण देणाऱ्या कार्यकर्त्यांनी या क्षेत्रातील येऊ घातलेल्या रोजगाराच्या संधींबद्दल जागृत करणे महत्वाचे आहे.

**३. रोजगारांतील विविधता-**

भारतामध्ये रोजगाराच्या संधींचा विचार करता क्षेत्रनिहाय, लिंगनिहाय याचप्रमाणे विशेष विविधता दिसून येते. भारतीय रोजगाराच्या संधीकडे पहाता ९३% रोजगार अनौपचारिक क्षेत्रात तर केवळ ८% रोजगार औपचारिक क्षेत्रात आहे. दोन्हींच्या प्रशिक्षणात बदल आहेत. अनौपचारिक रोजगाराच्या संधीमध्ये असे दिसून येते की, श्रमविभागणीमुळे कौशल्याचा अभाव आहे त्याच प्रमाणे उत्पादकतेमध्ये घट येते. या क्षेत्रात अल्पसाक्षरता तसेच अकुशल कामगार दिसून येतात. राष्ट्रीय औद्योगिक प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत अधिकाधिक कौशल्य प्राप्त करता येऊ शकते.

आपल्या एकूण लोकसंख्येचा विचार करता ४८% महिलांचा सहभाग आहे मात्र रोजगाराच्या संदर्भात मात्र हेच प्रमाण २२% इतके आहे. पंतप्रधानांनी असे म्हटले

**भारतीय रोजगाराच्या संधीकडे पहाता ९३% रोजगार अनौपचारिक क्षेत्रात तर केवळ ८% रोजगार औपचारिक क्षेत्रात आहे. दोन्हींच्या प्रशिक्षणात बदल आहेत. अनौपचारिक रोजगाराच्या संधीमध्ये असे दिसून येते की, श्रमविभागणीमुळे कौशल्याचा अभाव आहे त्याच प्रमाणे उत्पादकतेमध्ये घट येते. या क्षेत्रात अल्पसाक्षरता तसेच अकुशल कामगार दिसून येतात. राष्ट्रीय औद्योगिक प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत अधिकाधिक कौशल्य प्राप्त करता येऊ शकते. आपल्या एकूण लोकसंख्येचा विचार करता ४८% महिलांचा सहभाग आहे मात्र रोजगाराच्या संदर्भात मात्र हेच प्रमाण २२% इतके आहे. पंतप्रधानांनी असे म्हटले आहे की, 'महिलांची क्षमता वाढवून त्यांना जर विकास कामांशी निगडीत केले तर कोणत्याही देशाचा विकास गतिशील होऊ शकतो.'**

आहे की, 'महिलांची क्षमता वाढवून त्यांना जर विकास कामांशी निगडीत केले तर कोणत्याही देशाचा विकास गतिशील होऊ शकतो.'

या करिता आपल्याला पश्चिम आणि दक्षिण विभागात उद्योगाची वातावरण निर्मिती करावी लागेल. सोयी सुविधा पुरवाव्या लागतील. त्यांचे कौशल्य त्यांना ते अद्ययावत करावे लागेल. याचे कारण रोजगाराच्या निमित्ताने त्यांचे स्थलांतर झालेले आहे. रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याने ते आलेले आहेत. खाजगी उद्योग जगताची मदत या ठिकाणी होऊ शकते. त्यांच्या सामाजिक जबाबदारी या माध्यमातून किंवा त्यांचा वातावरण निर्मितीत सरळ सहभाग करुन काम करत असताना प्रशिक्षण देणे, औद्योगिक विद्यावेतन, प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षण, काम करत असतानाच प्रशिक्षण देणे, अस्तित्वात असलेल्या ज्ञानाचा उपयोग भविष्यकालीन रोजगारासाठी करून ठेवणे. इ. हे उपक्रम राबवता येतील.

**४. कौशल्यावर भर तसेच पूर्वशिक्षणाची दखल.**

माध्यमिक शिक्षण पूर्ण होण्याआधीच फार मोठया प्रमाणात मुलांची गळती होते. १२ व्या पंचवार्षिक योजनेप्रमाणे ४७% मुलांची गळती ते माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्याआधीच होते. साहाजिकच ही मुले जेव्हा रोजगार मिळविण्यासाठी जातात तेव्हा त्यांच्याकडे अल्पकौशल्य असते आणि त्यांना कमी पैशाच्या रोजगारावर काम करावे लागते. याकरिता त्यांच्या कौशल्यात वाढ करणे, त्यांना अधिक प्रशिक्षीत करणे गरजेचे आहे. त्यांच्यात चांगली क्षमता निर्माण करणे गरजेचे आहे. राज्य तसेच केंद्र शासनाकडे याकरिता उत्तमोत्तम कार्यक्रम आहे. रोजगारक्षम असे कार्यक्रम आहेत. परंतु राष्ट्रीय धोरणानुसार आपल्याला उद्दीष्ट्य गाठण्याकरिता कौशल्य, पूर्णकौशल्य आणि वाढीव कौशल्य यामध्ये स्पष्टता असायला हवी. अशा तऱ्हेच्या कारागिरांना शोधणे हेच एक आव्हान आहे. 'स्कील गॅप ॲनॅलेसिस' हीही एक गरज बनली आहे. कौशल्य

| परिशिष्ट | | | | |
|---|---|---|---|---|
| **जनबाहुल्याचा फायदा घेणारी राज्ये** | **क्षेत्रनिहाय मनुष्यबळाची मांगणी** | **युवाशक्तीच्या महत्वाकांक्षा** | | |
| | | **जास्त** | **सरासरी** | **कमी** |
| उत्तर प्रदेश | गृहबांधणी, स्थावर मालमत्ता, 'संघटित रिटेल क्षेत्र' तसेच बँकींग, विमा क्षेत्र | माहिती तंत्रज्ञान, संघटित रिटेल क्षेत्र तसेच प्रसारमाध्यमे आणि मनोरंजन | बीएफएस आय, आरोग्य क्षेत्र त्याचप्रमाणे अन्न प्रक्रीया | गृहनिर्माण, बांधकाम, वाहतूक, शेती वस्त्रोद्योग, इतर उत्पादन क्षेत्र आणि औषधे. |
| दिल्ली | रिटेल, बांधकाम वाहतूक, गृहोपयोगी, मदत, माहिती तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, शिक्षण बँकींग, अर्थसेवा विमा. | रिटेल, माहिती तंत्रज्ञान, बीपीओ, शिक्षण, वाहनाधारित सार्वजनिक व्यवस्थापन, वीज, उपकरणे, वस्त्रोद्योग, इलेक्ट्रॉनिक तसेच हार्डवेअर. | बांधकाम वाहतूक, आदरातिथ्य बीएफएसआय, वाहन देखरेख, आरोग्य, प्रसारमाध्यमे, मनोरंजन, धातू उत्पादने, छापखाने, अन्नप्रक्रिया तसेच रसायन उद्योग | घरगूती मदत, सुरक्षा कर्मचारी, घाऊक व्यापार, लाकूड व्यवसाय, रियल इस्टेट |
| झारखंड | गृहनिर्माण, पर्यटन, आदरातिथ्य, व्यापार, प्रवास, अन्न प्रक्रीया, बँकींग, अभियांत्रिकी, वाहतूक, मालपुरवठा | अन्न प्रक्रीया, बँकींग, अभियांत्रिकी, वस्त्रोद्योग, तयार कपडे, प्रवासी वाहतूक, आरोग्यसेवा, शिक्षण, कौशल्य विकास तसेच माहिती तंत्रज्ञान. | पर्यटन, आदरातिथ्य, प्रवास व व्यापार, रिअल इस्टेट व वाणिज्य प्रसार माध्यमे, दळणवळण, वीज गॅस व पाणीपुरवठा | गृहनिर्माण, व बाधकाम, खाण व्यवस्थापन, हस्तमाग तसेच संघटित व्यापार क्षेत्र , चामडे, चामड्याच्या वस्तू, रसायन व औषधे. |
| मध्यप्रदेश | बांधकाम, रिटेल शेती व पुरक व्यवसाय,वस्त्रोद्योग, मालवाहतूक, खाण उद्योग | माहिती तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, शिक्षण आणि कौशल्य विकास, मोटारगाडयांचे सुटे भाग, प्रसार माध्यमे, मनोरंजन | आदरातिथ्य, बँकींग तसेच आर्थिक सेवा, खाण उद्योग, वस्त्रोद्योग, मालवाहतूक | बांधकाम व्यवसाय, रिटेल, कृषी व कृषीपूरक,वस्त्रोद्योग, मालवाहतूक, खाण उद्योग |
| राजस्थान | वीजकारागीर, संगणक आधारित लेखाशास्त्र, माहिती व तंत्रज्ञान, भ्रमणध्वनी दुरुस्ती, घरगुती दुरुस्ती, कुरिअर वितरण, वाहन तंत्रज्ञान, विक्री व पणन हिरे दागिने तसेच हस्त व्यवसाय. | वीज कारागीर | हस्तकौशल्य आणि हस्तकला | मोबाइल दुरुस्ती, संगणकाधारित लेखाशास्त्र, माहिती व तंत्रज्ञान, वायरिंग, रिपेअरींग, कुरिअर वितरण, विक्री व पणन, हिरे दागिने. |
| पश्चिम बंगाल | बांधकाम, रिटेल, कृषी आणि कृषी पूरक, एमएसएमइ, ज्यूट, वस्त्रोद्योग, कृषी अन्नप्रक्रिया. | माहिती तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, बँकींग, रिपेअर्स , मेंटेनन्स, अभियांत्रिकी वाहनासंबंधी शिक्षण वा प्रशिक्षण, हिरे दागदागिने | पर्यटन, प्रवास, आदरातिथ्य, वाहतूक व मालवाहतूक, संपर्कशास्त्र, रबर व प्लॅस्टिक, इलेक्ट्रॉनिक व हार्डवेअर | बांधकाम, रिटेल, कृषी व पूरक, एम एस एम इ, ज्यूट वस्त्रोद्योग, अन्न प्रक्रिया |
| महाराष्ट्र | माहिती तंत्रज्ञान, संघटित रिटेल, बांधकाम, कृषी व कृषीआधारित व्यवसाय, रसायन वा औषधे, हिरे, दागदागिने | माहिती व तंत्रज्ञान संघटित रिटेल, पर्यटन आणि प्रवास आदरातिथ्य अन्नप्रक्रिया, वाहनोद्योग वाहनांचे सुटे भाग | प्रसारमाध्यमे, मनोरंजन, बीएफएसआय, वाहतूक, मालवाहतूक शिक्षण कौशल्य विकास, वस्त्रोद्योग | गृहनिर्माण, बांधकाम, इतर उत्पादन क्षेत्र, शेती व पूरक व्यवसाय, रसायन, औषधे, हिरे दागिने. |
| तामिळनाडू | बांधकाम, रिटेल आणि प्रवास, आदरातिथ्य- पर्यटन आणि प्रवास, बीएफएसआय, वाहनोद्योग | वाहनोद्योग, माहिती तंत्रज्ञान, पर्यटन, प्रवास, आदरातिथ्य, रिटेल, बीएफएसआय, इलेक्ट्रॉनिक्स, हार्डवेअर, शिक्षण. | वस्त्रोद्योग, प्रसारमाध्यमे व मनोरंजन, वाहतूक व मालवाहतूक आरोग्यसेवा, रिअल इस्टेट. | चर्मोद्योग बांधकाम अन्नप्रक्रिया, हिरे दागदागिने रसायने, औषधे, फर्निचर, शेती, हस्तकला. |
| स्त्रोत एनएसडीसी स्कील गॅप रिपोर्ट - २०१२, | | | | |
| डॉ. सखी खुराना, नीती आयोग यांनी संकलित केली आहे. | | | | |

विकासाकरिता कौशल्यांतर्गत बाबींचा विकास, आणि स्थूल पातळीवर काम करता असताना प्रशिक्षण देणे हाही स्किल गॅप ॲनॅलिसिसचा भाग आहे. खूप परखडपणे कौशल्य प्रशिक्षण समजून घेऊन पृथकरण करुन यासाठी खर्च केलेल्या पैशाचा उत्तमोत्म विनियोग करणे आणि रोजगाराच्या चांगल्या संधी मिळवणे, चांगला रोजगार चांगली उत्पादकता आणि शेवटी जीवनमान उंचावणे अपेक्षित आहे.

याठिकाणी आणखी एका बाबीची दखल घेणे गरजेचे आहे. खास करुन पूर्व शिक्षण घेतलेल्यांची. ही मंडळी रोजगाराच्या शोधात लहान वयातच कामाला लागतात, अनुभव मिळवतात पण प्रमाणपत्र नसते. पिढ्यानपिढ्या हे चालू आहे. विशेषकरुन हस्तकला कारागारींसाठी ही समस्या जास्त प्रमाणात भेडसावते. रोजगार क्षमता वाढविण्यासाठी पूर्व शिक्षणाची दखल अर्थात आर पी एल ला प्रचंड वाव आहे. त्याचप्रमाणे गतिशीलता, आयुष्यभराचे शिक्षण, सामाजिक समरसता आणि स्वाभिमान याही गोष्टी आहेत. भारतामध्ये २९८.५ दशलक्ष कामगारांना कौशल्य देण्याची गरज आहे. त्यांच्या कौशल्यात वाढ करणे आवश्यक आहे. कौशल्य विकास मंत्रालयाच्या राष्ट्रीय धोरणामध्ये यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. आणि असेही प्रयत्न चालू आहेत की, हे आव्हान स्विकारुन आरपीएलला मदत करता येईल.

कोणत्याही एकाच स्थितीत आणि कोणत्याही एका पात्रतेत यशस्वी ठरेल असे आरपीएल मॉडेल नाही. विशेषत: वेगवेगळी क्षेत्र वेगवेगळ्या आरपीएल मॉडेलला प्रोत्साहन देतात. स्थानिक पातळीवर आरपीएल यशस्वी होण्याकरिता धोरण आत्मसात करायला हवे. धोरणाबद्दल उतावळेपणा नसावा. इतर अनेक गोष्टींबरोबर आरपीएल चे यश त्याच्या जागृतीमध्येच लपलेले आहे. प्रभावी व्यवसाय मार्गदर्शन, सेवा सल्लामसलत याही बाबी महत्वाच्या आहेत. एकात्मिक धोरण, शिक्षण तसेच प्रशिक्षण याकरिता कायद्याच्या तसेच नियमिततेची चौकट, यात सहभागी असणाऱ्यांचा सक्रीय सहभाग, प्रभावी संस्थात्मक चौकट याचा अंतर्भाव आरपीएल मध्ये आहे. व्यवसायातील दर्जा सांभाळणे आणि पदव्यांचा दर्जा (एका विशिष्ट स्तरावर याचा ताळमेळ घालायला हवा) विशिष्ट गटांसाठी, त्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्याची परिणामकारक आणि प्रभावी हत्यारे आरपीएलच्या खर्चात भागीदारी तसेच शाश्वत अर्थ पुरवठ्याची सोय, त्याचप्रमाणे, कौशल्यामध्ये सातत्याने संधी शोधून अद्ययावत करणे हे आरपीएल मध्ये अपेक्षित आहे.

### ५. स्थित्यंतराचे सर्वेक्षण - शाळांचा सहभाग (SWTS)

१५ ते २९ वयोमानातील युवकासाठी श्रमिक बाजाराच्या माहितीचा दर्जा आणि संख्या वाढवणे ही आत्यंतिक महत्वाची गोष्ट आहे. ही सर्वेक्षणे रोजगार, बेरोजगारी आणि मनुष्यबळ यांबाबत माहिती देतात. ज्यातून बेरोजगारीचे प्रमाण, रोजगाराची स्थिती आणि क्षेत्रीय रोजगार उपलब्धता हे निकष निघतात. मात्र ही सर्वेक्षणे कार्यसंक्रमणाच्या कार्यशाळापासून मिळणारे समाधान, सुलभता किंवा काठिण्य यावर जराही भाष्य करत नाहीत. विशिष्ट कामे ही तरुण मुले वा मुलींना आव्हानात्मक भासतात, त्यांचा परामर्श घेण्यासाठी राष्ट्रीय रोजगार कार्यक्रम आढावा घेत असतात. या कार्यक्रमांची रचना वा अंमलबजावणीचे धोरण ठरवण्यासाठी SWTS योग्य आणि संदर्भित माहितीचा पुरवठा करते. समाजातील संवेदनशील घटकांना शोधून त्यांना योग्य ती मदत पोहचावी याकरिता धोरणकर्त्यांना मदत होते. राष्ट्रीय करिअर सेवेला ही सर्वेक्षणे सहाय्यक ठरतात. ज्यामुळे तरुण उमेदवारांना समाधानी आणि सुरक्षित कामे शोधण्यात सुलभता येते. श्रमिक बाजारातील विविधता आणि शासनाच्या दृष्टीने कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाच्या योग्य जागा शोधून देणे, वंचितांना लाभ देणे या गोष्टीही साध्य होतात. औद्योगिक क्रांती ४.० मुळे येणारी भविष्यातील आव्हाने सोपी होतात.

निष्कर्ष हाच की, गतिमान आर्थिक बदल आणि येत्या काळातील रोजगाराच्या संधी तरुण मुलामुलींसाठी आव्हाने आणि संधी सोबतच घेऊन येईल. रोजगारक्षमतेची वृध्दी कामाबाबतीत सुरक्षितता आणि प्रगतीचा मार्ग खुला करेल. ज्यामुळे युवकांचा आर्थिक प्रगतीला, विकासाला हातभार लागेल. बरेच कार्यक्रम आणि पुढाकार शासनातर्फे कौशल्यविकासासाठी घेतले जाऊ शकतात. त्यांची पुनरावृत्ती सर्व राज्यांत झाल्यास युवक हा बदलाचा अग्रदूत मानला जाईल हे निसंशय.

■■■

*लेखिका निती आयोगामध्ये सल्लागार पदी कार्यरत आहेत.*

email : sunita sanghi1960@gmail.com

# शिक्षणाच्या माध्यमातून तरुणांचे सक्षमीकरण

डॉ. राकेश के. वत्स / डॉ. मीनू वत्स



**लोकसंख्येचा लाभांश हा कोणत्याही राष्ट्रावर कधीही बोजा नसतो तर संधीची खिडकी असते. अशा वेगवेगळय़ा लोकसंख्येच्या लाटा ज्याला लोकसंख्यीय लाभांश असे म्हटले जाते त्याने अनेक पूर्व आशियाई देशांत जसे की कोरियन प्रजासत्ताक, अलिकडच्या काळात आर्थिक विकासाला चालना दिली असून आमच्या बाबतीतही जर त्यांचे मजबुतीकरण आणि सक्षमीकरण केले तर हेच सिद्ध होईल.**

जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या लोकसंख्येचा देश असलेल्या भारतात अगदी ताज्या मोजणीनुसार ६० कोटी म्हणजे एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के लोक हे २५ वर्षे वयाच्या आतील असून आणखी दोन वर्षांतच भारत जगातील सर्वात तरुण देश होईल ज्यात तीन चतुर्थांश लोकसंख्या ही २५ व वर्षे वयाच्या आतील असेल. आमच्या लोकसंख्येची सोन्याची खाण आणि भारताच्या ३४ टक्के सकल राष्ट्रीय उत्पन्नास जबाबदार असलेला हा भाग योग्य शैक्षणिक पायाभूत सुविधा, योग्य कौशल्याचा विकास आणि रोजगार मिळवण्यासाठी अथवा आपल्या वैयक्तिक, सामाजिक आणि देशाच्या विकासासाठी व्यवसाय करण्यासाठी पुरेशा संधी यांची निश्चितच मागणी करणार आहे.

लोकसंख्येचा लाभांश हा कोणत्याही राष्ट्रावर कधीही बोजा नसतो तर संधीची खिडकी असते. अशा वेगवेगळय़ा लोकसंख्येच्या लाटा ज्याला लोकसंख्यीय लाभांश असे म्हटले जाते त्याने अनेक पूर्व आशियाई देशांत जसे की कोरियन प्रजासत्ताक, अलिकडच्या काळात आर्थिक विकासाला चालना दिली असून आमच्या बाबतीतही जर त्यांचे मजबुतीकरण आणि सक्षमीकरण केले तर हेच सिद्ध होईल. सक्षमीकरण म्हणजे मूल्ये अंगी बाणवण्याची प्रक्रिया असून ती मूल्ये आत्मसात करणाऱ्या व्यक्ती म्हणून समाजाने बाळगलेली मूल्ये आणि आदर्शांनुसार समाधानकारक आयुष्य जगणे शक्य होईल. विशेषतः भारतीय परिस्थितीत युवकांचे सक्षमीकरण केवळ राष्ट्राच्याच नव्हे तर वैयक्तिक विकासाकरताही आवश्यक असून युवकांच्या हक्कांना प्रोत्साहन, युवक उपक्रम आणि त्यांचा सामुदायिक निर्णयातील सक्रीय सहभाग याद्वारे त्याचा पाठपुरावा करता येईल.

युवक सक्षमीकरणाची गुरूकिल्ली ही त्यांना शिक्षित करून रोजगारक्षम बनवणे ही आहे. कोणत्याही देशातील युवकांचे सक्रीय हात आणि मेंदूच्या भूमिकेशिवाय आपण त्या देशाच्या शाश्वत विकासाबाबत बोलू शकत नाही. संधीचा अभाव म्हणजे त्यांना समाजाच्या समासाच्या बाहेर बसवण्यासारखे असून जी गाडी कधीच येणार नाही त्या गाडीसाठी रुळांवर वाट पहायला लावण्यासारखे आहे.

**युवक सक्षमीकरणाचे आधारस्तंभ**

भारतातील तरुणांचे शाश्वत सक्षमीकरण मूलतः खालील चार स्तंभांवर स्थिर राखता येईल.

-शिक्षण

-कौशल्य आणि रोजगार

-स्वभावात मूलगामी बदल

-सरकारी धोरणे आणि पुढाकार

परिवर्तनशील भारताचा दृष्टीकोन केवळ मनुष्यबळ आणि विकास (MHRD) मंत्रालयाच्या सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण या बोधवाक्यानेच साकार होणार असून आपल्या शिक्षण व्यवस्थेत कोणत्याही शिक्षण व्यवस्थेचे मूलभूत गुणधर्म जसे की उपलब्धता, समानता आणि दर्जाच्या मागोमाग बुद्धीमत्ता आणि कौशल्य चालना यांचा योग्य समावेश असेल तर आपल्या  विकसनशील राष्ट्राला नव्याने आकार देता येईल.

सध्याच्या परिस्थितीत उच्च शिक्षणातील (HE)भारतातील नावनोंदणीचा दर खूपच खाली म्हणजे जागतिक २८ टक्के दराच्या तुलनेत अवघा २२ टक्के असून चीन (२८ टक्के), ब्राझील (३६टक्के), इंग्लंड (५९टक्के) या इतर विकसनशील देशांच्या तुलनेतही खूप कमी आहे. आणखी दोन वर्षांत म्हणजे २०२० मध्ये जेव्हा देशाची लोकसंख्या (२५ वर्षांच्या आतील) जगातील सर्वोच्च असेल तेव्हा आपला जीईआर फक्त ३० टक्के इतका वाढवण्याचा आपला उद्देश्य  असून उच्च शिक्षण उपलब्ध करुन देणाऱ्या तृतीय शिक्षणाच्या सध्याच्या संस्थांची संख्या किमान दुप्पट केल्यासच साध्य होऊ शकतो. आपले स्वप्न साकार करण्यास ही जी तफावत आहे ती खरोखर त्रस्त करणारी आहे. खासगी अभियांत्रिकी संस्था आणि विद्यापीठांची संख्या भूछत्राप्रमाणे वाढत असतानाही देशातील वैज्ञानिक आणि अभियंत्यांची घनता मात्र जगातील सर्वात खाली आहे. दर्जेदार शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ सर्वांसाठी शिक्षण याच मार्गाने साध्य करता येणार आहे.

भारत धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही देश असल्याने जात, लिंग, प्रांत, वय आदी मुद्यांवर तुकडे पडले असून त्यामुळे सर्व नागरिकांना उपलब्ध शिक्षण स्त्रोतांची संधी समानरित्या मिळण्यास अडथळा होतो आणि व्यवस्थेला त्याची इच्छित फलप्राप्ती होऊ देत नाही. दर्जेदार शिक्षणाबाबत आम्ही बोलण्यापूर्वी हे खड्डे बुजवण्याची गरज आहे. दुसऱ्या बाजूनेही असमानता आहे. जेव्हा उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून विषयांची निवड केली जाते. सर्वाधिक मागणी असलेले विषय म्हणजे कला व मानवता (सुमारे ३५ ते ४० टक्के) असून त्याखालोखाल वाणिज्य व व्यवस्थापन (अंदाजे २० ते २५ टक्के) आहे तर मूलभूत व उपयोजित विज्ञानाला (अंदाजे १९ ते २१ टक्के आणि १५-१६ टक्के) सर्वात शेवटी प्राधान्य दिले जाते. विद्यार्थ्यांच्या या विषय निवडीतील विषमतेबाबत चौकशी केल्यावर समोर आलेली कारणे आश्चर्यकारक आणि सरकार तसेच शिक्षण क्षेत्रातील धुरीणांसाठी निश्चितच डोळे उघडणारी आहेत. अभ्यासक्रमातील लवचिकता, कौशल्य वर्धनाची- मग ते सोपे असो वा कठीण- संधी, विद्यार्थ्यांना कॅम्पसमध्ये अंतर्गत आणि इतर कॅम्पसमध्ये सहज जाण्याची सोय, कामाच्या जगातील उपयुक्तता व सर्वांच्या वर रोजगारक्षमता यावर विषयांचा प्राधान्यक्रम आधारित आहे.

**देशाचा आर्थिक विकास हा आज मूलतः सेवा क्षेत्रावर आधारित (६६.१ टक्के)असून ज्यात सर्वोच्च दर्जाचे संभाषण वगैरे सॉफ्ट स्किलची (कौशल्य) आवश्यकता असून तंत्रज्ञान क्षेत्रातील आगामी योगदानात (९.२ टक्के) सॉफ्ट आणि हार्ड अशा दोन्ही कौशल्यांची गरज असते जेथे आजचे युवक मालकांचे समाधान करतील इतक्या आवश्यक कौशल्याने परिपूर्ण नाहीत. एक तृतीयांशाहून कमी भारतीय अभियांत्रिकी पदवीधर व मूलभूत विज्ञान व इतर शाखांमधील फक्त ५ टक्के विद्यार्थी रोजगारक्षम आढळले आहेत, ही गोष्ट पचनी पडण्यास अवघड आहे.**

गेल्या दोन दशकांत व्यावसायिक पदवी घेण्यासाठी देशात लाट आली असून त्याचा परिणाम एआयसीटीई, यूजीसी आणि इतर नियामक संस्थांकडून उदारहस्ते सुमार दर्जाचे व्यावसायिक शिक्षण पसरवणाऱ्या इमारतींची प्रवेशद्वारे बळजबरीने बंद करणाऱ्या उत्पादन प्रतिबंध चक्र तयार होण्यात झाला आहे. तांत्रिक आणि व्यावसायिक संशोधन व सर्जनशीलता या मार्गाने देशाचा विकास घडवण्यासाठी सरकारने घेतलेल्या  पुढाकारानेच या लाटेला स्वाभाविकपणेच चालना देण्यात आली होती परंतु दर्जेदार शिक्षणाच्या अभावामुळे देशाला इच्छित उद्दिष्ट साध्य करण्यास काहीच मदत झाली नाही. देशाचा आर्थिक विकास हा आज मूलतः सेवा क्षेत्रावर आधारित (६६.१ टक्के)असून ज्यात सर्वोच्च दर्जाचे संभाषण वगैरे सॉफ्ट स्किलची (कौशल्य) आवश्यकता असून तंत्रज्ञान क्षेत्रातील आगामी योगदानात (९.२ टक्के) सॉफ्ट आणि हार्ड अशा दोन्ही कौशल्यांची गरज असते जेथे आजचे युवक मालकांचे समाधान करतील इतक्या आवश्यक  कौशल्याने परिपूर्ण नाहीत. एक तृतीयांशाहून कमी भारतीय अभियांत्रिकी पदवीधर व मूलभूत विज्ञान व इतर शाखांमधील फक्त ५ टक्के विद्यार्थी रोजगारक्षम आढळले आहेत, ही गोष्ट पचनी पडण्यास अवघड आहे. यामुळे आमच्या शिक्षणाच्या दोन प्रतिष्ठित शाखा आपली चमक घालवून बसल्या आहेत.

शिक्षणापर्यंत प्रवेश आणि समानता या दोन प्रमुख संख्यात्मक मुद्यांनंतर तिसरा मुददा शिक्षणाचा गुणात्मक पैलू हा येतो. आमच्या देशातील सुमार दर्जाचे शैक्षणिक मानक प्रचलित असलेल्या परिस्थितीचा फायदा उठवण्यासाठी विकसित देशांनी भारतीय अर्थव्यवस्थाच नव्हे तर इथली बुद्धीमत्ताही पळवून नेऊन आपला संधीसाधूपणा सिद्ध केला आहे. दरवर्षी दर्जेदार शिक्षणाच्या शोधात परदेशी जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. विद्यमान शैक्षणिक पद्धतीत विशिष्ट सुधारणा करून हे मागे फिरवता येईल. सर्वात जुनी आणि विशाल अशी शिक्षण व्यवस्थेची स्टेट ऑफ द आर्ट पद्धतीने फेररचना करण्यासाठी थोडय़ाशा नावीन्यपूर्ण संशोधन व सर्जनशीलतेची गरज आहे.

भारताची विद्यमान शिक्षण व्यवस्था अगणित मर्यादांसह अडथळय़ांची शर्यतीत अडकली आहे.

**समस्या**

- **दर्जेदार व प्रेरित शिक्षक आणि गुरूंचा अभाव** : देशातील सर्वात जास्त निराशादायक, कमी वेतनमान असलेले आणि सर्वात कमी मान्यता असलेला व्यवसाय

- **प्राध्यापकांचा अभाव अथवा तात्पुरती नियुक्ती** : देशातील बहुतेक अगदी अग्रगण्य संस्थांमध्येही नियमित प्रमुख, मुरब्बी प्राध्यापक आणि अनुभवी संशोधकांच्या खुर्च्या रिकाम्या असून एक तृतीयांश शिक्षकांची पदे रिक्त आहेत.

- **विशेषतः सरकारी संस्थांमध्ये निधीचा अभाव** : ही सर्वात मोठी त्रुटी असून सांघिक संस्थांमधील एकूण जागांपेक्षाही अधिक संख्येने युवक सरकारी संस्थांमध्ये नोंदणी करत आहेत.

- जीडीपीत (३.३ टक्के) सर्वात शेवटी प्राधान्यक्रम असलेले क्षेत्र असल्याने जगातील सर्वात मोठी शिक्षण व्यवस्था म्हणजे केवळ जास्त आवाज करणारे पोकळ जहाज झाले आहे.

- राजकीय व नोकरशाही रचनेचा हस्तक्षेप व ताबा

- -ज्येष्ठ शिक्षणतज्ञ आणि संशोधकांची आपला दृष्टीकोन अंमलात आणण्यातील अक्षमता

- कालबाह्य आणि बंदिस्त अभ्यासक्रम, अभ्यासक्रमात एकसंधतेचा अभाव, पारंपरिक अध्यापनशास्त्राची असमर्थता

---

**आमच्या देशातील सुमार दर्जाचे शैक्षणिक मानक प्रचलित असलेल्या परिस्थितीचा फायदा उठवण्यासाठी विकसित देशांनी भारतीय अर्थव्यवस्थाच नव्हे तर इथली बुद्धीमत्ताही पळवून नेऊन आपला संधीसाधूपणा सिद्ध केला आहे. दरवर्षी दर्जेदार शिक्षणाच्या शोधात परदेशी जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. विद्यमान शैक्षणिक पद्धतीत विशिष्ट सुधारणा करून हे मागे फिरवता येईल. सर्वात जुनी आणि विशाल अशी शिक्षण व्यवस्थेची 'स्टेट ऑफ द आर्ट' पद्धतीने फेररचना करण्यासाठी थोडय़ाशा नावीन्यपूर्ण संशोधन व सर्जनशीलतेची गरज आहे**

---

आजच्या तंत्रज्ञानस्नेही युवकांना मागे खेचते, विशेषतः मूलभूत विज्ञानात प्रयोगशाळेवरील किमान आधारित शिक्षण यामुळे शिक्षण केवळ काळय़ापांढऱ्या रंगातील होते आणि युवकांचा अशा व्यवस्थेत शिक्षण घेण्यातील मूळचा रस संपतो. मूलभूत विज्ञानातील उच्च शिक्षण घेण्याच्या जीईआरमध्ये झपाटय़ाने घट होण्याचे हे मुख्य कारण आहे.

- **बंदिस्त दृष्टीकोन** : तयार करण्यात आलेल्या अभ्यासक्रमामुळे आजचा युवक साक्षर होतो परंतु समग्र विकासाने शिक्षित होत नाही. शिक्षण प्रदान करताना अंतःविषयांच्या अभावामुळे अभावामुळे तरुण आपले ज्ञान वास्तविक जगात अमलात आणण्यास असमर्थ ठरतात.

- सांघिक निधीपुरवठा होत असलेल्या संस्था वगळता उच्च शिक्षणसंस्थांना साधनसंपत्तीचा अपुरा पुरवठा

**सहभागाचा अभाव**

- **कर्मचारी व मालकाचा सहभागातील अभाव** : अभ्यासक्रम तयार करण्याचे काम शतकांपासून सुरू असून ते ज्येष्ठ शिक्षणतज्ञ अथवा नोकरशहा करत असतात ज्यांना शिक्षण व्यवस्थेच्या उत्पादनांशी काही देणेघेणे नाही. उद्योग, प्रयोगशाळा, वाणिज्य आणि व्यवसाय व कोणत्याही भागधारकाशी अभ्यासक्रमाची रचना करताना चर्चाविनिमय केला जात नाही. याची परिणती अधिकाधिक रोजगारास अक्षम अशा शिक्षित तरुणांमध्ये होते जे देशाची संपत्ती ठरण्याऐवजी देशावर बोजा ठरू शकतात.

वरील सर्व गोंधळाची परिस्थिती असतानाही विज्ञान व तंत्रज्ञान आणि कला व मानवता यातील आमचा युवक प्रगती करत आहे. आयआयटी, ऐम्स, आयआयएसईआर, आयएमटेक, आयआयएससी. आयआयएम्स या देशातील सर्वोच्च संस्था जगातील सर्वोच्च संस्था म्हणून क्रमवारी शिक्षकांमुळे नव्हे तर विद्यार्थ्यांमुळे राखून आहेत. २००२ ते २०१६ या काळात देशातील वैज्ञानिक प्रकाशनांची संख्या जवळपास पाच पटींनी वाढली

आहे. अंतराळ संदेशवहन, आयटी क्षेत्र, संशोधन आणि नाविन्यपूर्ण शोध, औषधीशास्त्र आणि रोगनिदानशास्त्र यासारख्या अनेक क्षेत्रांत आपण मजबूत पाय रोवून एतद्देश्यीय तंत्रज्ञान प्रस्थापित करत असून जेथे प्राथमिक विज्ञानातील मूलभूत तत्वे अत्यंत महत्वपूर्ण भूमिका निभावत आहेत. वैविध्याने नटलेल्या देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात असलेल्या तरुणांना अंतर्गत आणि बाहेरचे दर्जेदार शिक्षण देऊन मजबूत करण्यासाठी सर्वोत्कृष्ट शक्य धोरणे, सुधारणा, पुढाकार, योजना, मोहीम याद्वारे बदल करण्यास कठीण असलेल्या व्यवस्थेची चौकट पुन्हा नव्याने आखण्यात सरकार सक्रीय भूमिका बजावत आहे. सर्वांना प्रवेश, समानता आणि दर्जा याच तीन प्रमुख घटकांवर विविध उपाययोजना आधारित आहेत. यातील बहुसंख्य उपाययोजना मूलभूत विज्ञान आणि मानवजातीचा अभ्यास या देशातील उच्च शिक्षणाच्या पर्यावरणीय व्यवस्थेच्या प्रमुख घटकांच्या विद्यार्थ्यांना समान लाभ मिळवून देत आहे.

आयआयटी, आयआयएम्स, आयआयआयटी, आयआयएसईआर, ऐम्स, केंद्रीय विद्यापीठे, महाविद्यालये आदी नव्या संस्था आणि संस्थात्मक क्षमता वाढवण्याच्या उपायांसह सरकारकडून प्रत्येक स्तरावर युवकांसाठी शिक्षणाचा विस्तार हाती घेण्यात आला आहे.

देशाची वैज्ञानिक आणि तांत्रिक क्षमता जागतिक स्तरावरील सर्वोत्कृष्टतेच्या बरोबरीने वाढवण्यासाठी देशाच्या सध्याच्या शैक्षणिक स्त्रोतांमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ ॲकेडेमिक नेटवर्क्स (GIAN) स्थापन करण्यात आले असून त्याचा हेतू आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक व व्यावसायिकांच्या गटांचा देशातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये सहभाग वाढवण्यास प्रोत्साहन देण्याचा आहे.

**संशोधनातील नावीन्यपूर्ण शोध आणि तंत्रज्ञानावर प्रभाव (IMPRINT) :** देशातील प्रमुख संस्थांमध्ये सामाजिक महत्वाच्या क्षेत्रांत संशोधनाला दिशा देण्याचा हेतू

**उच्चतर आविष्कार अभियान (UAY) :** जागतिक बाजारपेठेत भारतीय उद्योगांची स्पर्धात्मकता टिकवण्यासाठी उद्योगविशिष्ट गरजेवर आधारित संशोधनास चालना देण्यासाठी सुरू करण्यात आले.

**राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट**

---

**अभ्यासक्रम तयार करण्याचे काम शतकांपासून सुरू असून ते ज्येष्ठ शिक्षणतज्ञ अथवा नोकरशहा करत असतात ज्यांना शिक्षण व्यवस्थेच्या उत्पादनांशी काही देणेघेणे नाही. उद्योग, प्रयोगशाळा, वाणिज्य आणि व्यवसाय व कोणत्याही भागधारकाशी अभ्यासक्रमाची रचना करताना चर्चाविनिमय केला जात नाही. याची परिणती अधिकाधिक रोजगारास अक्षम अशा शिक्षित तरुणांमध्ये होते जे देशाची संपत्ती ठरण्याऐवजी देशावर बोजा ठरू शकतात.**

---

**(NIRF) :** उद्देश्य आणि दर्जेदार शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी बदलत्या निकषांवर आधारित उच्च शिक्षण संस्थांची वार्षिक क्रमवारी ठरवण्यासाठी

**उच्च शिक्षण वित्तपुरवठा संस्थेची स्थापना (HEFA) :** देशात मजबूत उच्च शिक्षण संस्था उभारण्यास जोरदार चालना देण्यासाठी भांडवली मालमत्ता निर्माण करण्यासाठी स्थापन

**राष्ट्रीय शैक्षणिक कोठार (NAD) :** शैक्षणिक पुरस्कार आणि पदके ऑनलाईन पोहच आणि पुनर्प्राप्ती प्रणाली तसेच बनावट प्रमाणपत्रे, गुणपत्रके आदी गैरव्यवहार दूर करण्यासाठी आणि प्रमाणीकरणाची सुविधा मिळण्यासाठी डिजिटल कोठार.

**स्वयंम प्रभा :** ३२ डीटीएच वाहिन्यांद्वारे चोवीस तास उच्च दर्जाचे शैक्षणिक कार्यक्रम प्रसारित करण्यासाठी प्रकल्प

**स्वयंम :** देशाच्या अगदी दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही सर्व विषयांचा समावेश असलेले सर्वोत्कृष्ट दर्जाचे शिक्षण पुरवण्यासाठी व्यापक प्रमाणावर ऑनलाईन अभ्यासक्रम शिकवणारे एतद्देश्यीय बनावटीचे आयटी व्यासपीठ.

**राष्ट्रीय डिजिटल ग्रंथालय :**

पुस्तके, ई-शिक्षण साहित्य, ज्ञानकोश, नियतकालिके, प्रबंध, रिव्ह्यूज, संशोधन कार्य, लेख आदी संदर्भात ज्ञानाचे भांडार विद्यार्थी, व्यावसायिक, स्कॉलर्स आणि इतर रस असलेल्या लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी राष्ट्रीय मालमत्ता उभारणे.

**कॅम्पस कनेक्ट :**

विद्यापीठ परिसरात १ जीबीपीएस कनेक्टिव्हिटी आणि महाविद्यालयांत १० एमबीपीएस कनेक्टिव्हिटी पुरवून कॅम्पस परिसर वायफाय सुविधेने सज्ज करणे

**उच्च शिक्षणावरील अखिल भारतीय सर्वेक्षण (AISHE) :**

देशातील सर्व उच्च शिक्षण संस्थांना समाविष्ट करून खात्रीलायक धोरणात्मक निर्णय आणि संशोधन करण्यासाठी सर्वेक्षण केले जाते.

**रचनात्मक शोधासाठी राष्ट्रीय पुढाकार :** शिक्षणाचा आराखडा आणि

पद्धती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचाव्यात यासाठी अभ्यासक्रमाचा इंटरनेटद्वारे मोफत प्रसार

**पोस्ट डॉक्टरल फेलोशिप्स** : विज्ञान आणि मानवजात अभ्यास विषयांतील तरुण संशोधकांना नवीन कौशल्ये आत्मसात करून आपले क्षितीज विस्तारित करतानाच विविध क्षेत्रांत संक्रमण करुन शैक्षणिक/संशोधन कारकीर्द सुरू करण्यासाठी तयार करणे

**युजीसी-बीएसआर प्राध्यापक फेलोशिप कार्यक्रम** : निवृत्तीकडे झुकलेल्या बुद्धीमान विज्ञान व तंत्रज्ञान शिक्षकांनी आपले संशोधनातील योगदान कायम राखण्यासाठी संधी म्हणून विद्यापीठातील मूलभूत विज्ञान संशोधन मजबूत करणे


**विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये विज्ञानाधारित उच्च शिक्षण व संशोधन मजबूत करण्यासाठी योजना** : संशोधन कार्यक्रमांना बळकटी देऊन उच्च शिक्षणातील संशोधनात सर्वोत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्याचा उद्देश्य

**स्किल इंडिया** : आमच्या पंतप्रधानांची ही अत्यंत सुरेख योजना असून बेरोजगार युवक, उपेक्षित महिला आणि ग्रामीण लोकांना रोजगाराच्या संधीची शक्यता पडताळून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शाश्वत उपजीविकेची साधने पुरवण्याच्या दृष्टीने योग्य ते कौशल्य पुरवण्यात येते.

**राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA)** : शिक्षण ही राज्य सरकारची जबाबदारी असली तरीही राज्याच्या शैक्षणिक व्यवस्थेत दर्जेदार शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी RUSA अंतर्गत सांघिक निधीपुरवठा करण्यात येतो.पारितोषिक व शिक्षा या तत्वानुसार ते काम करते.

**पर्याय आधारित कर्जव्यवस्था (CBCS)** : अभ्यासक्रमाची फेररचना करण्याकडे पाहण्याचा अत्यंत उत्कृष्ट असा दृष्टीकोन असून विद्यार्थीकेंद्रित असा असेल तसेच विद्यार्थ्यांना राज्य, देश आणि जगाच्या शिक्षण व्यवस्थेत बहुदिशात्मक पर्याय निवडीसह अंतःविषयांसाठी भरपूर संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच या शिक्षण व्यवस्थेची मदत मूल्यांकन आणि रोजगारक्षमतेचे अडथळे दूर करण्यासही होणार आहे.

**भारतीय युवक सक्षमीकरणाचे चार सूत्री मॉडेल**




यावरुन युवक आणि शिक्षण व्यवस्था विशेषतः मूलभूत विज्ञान आणि मानवजातीचा अभ्यास या विषयांसाठी गणनात्मक सुधारणांची गरज आहे, असे दिसते. विकसनशील देशाच्या मर्यादित साधनसंपत्तीच्या अंतर्गत सध्याची व्यवस्था आणि धोरणांचे योग्य मिश्रण केल्यास आश्चर्यकारक परिणाम दिसून येणार आहेत. विद्यार्थीकेंद्रित शिक्षण व्यवस्था (CBCS), , मालकांच्या गरजांवर आधारित अभ्यासक्रम(NBCS), आपली धोरणे आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून सरकारने देऊ केलेला मदतीचा हात तसेच अशा प्रशिक्षित व बुद्धीमान तरुणांचा समाज आणि कामाच्या जगाने केलेला स्वीकार हा चार सूत्री सकारात्मक पवित्रा तरुण व देशाला सक्षम करू शकतो.आपल्या सर्वोत्कृष्ट बुद्धीमत्तेसह भारतीय युवकांच्या सक्षमीकरणासाठी तयार केलेल्या चार सूत्री मॉडेलने आम्ही समारोप करत आहोत.

■■■

*लेखक राकेश वत्स चंदिगड नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नीकल टिचर्स ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च येथे प्राध्यापक आहेत.*

*मीनू वत्स या चंदिगड येथील पंजाब विद्यापीठाच्या डीएव्ही महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक आहेत.*

email : rakeshwats@gmail.com

# युवा सबलीकरण आणि योग

ईश्वर व्ही बसवारेड्डी



**युवा सबलीकरण आणि युवा विकास यात फरक आहे. युवा विकास हा व्यक्तीकेंद्री आहे, तर सबलीकरण ही व्यापक प्रक्रिया आहे. युवा सबलीकरणाकडे ढोबळमानाने तीन टप्प्यात पाहता येईल. वैयक्तिक सबलीकरण, संघटनात्मक सबलीकरण आणि सामुदायिक सबलीकरण.**

युवा सबलीकरण ही प्रक्रिया आहे, ज्यात बालक आणि तरुण आपल्या आयुष्याची दिशा ठरवतात. परिस्थिती हाताळून, आपल्या स्रोतांचा योग्य वापर करुन, मुल्ये, श्रद्धा आणि वर्तणूक यावर आधारित ही प्रक्रिया आहे. जीवनमानाचा दर्जा उंचावणे हे युवा सबलीकरणाचे ध्येय आहे. युवा सबलीकरण कार्यक्रमांमध्ये युवकांच्या जास्तीत जास्त सहभागाने युवा सबलीकरण शक्य आहे.

युवा सबलीकरण आणि युवा विकास यात फरक आहे. युवा विकास हा व्यक्तीकेंद्री आहे, तर सबलीकरण ही व्यापक प्रक्रिया आहे. युवा सबलीकरणाकडे ढोबळमानाने तीन टप्प्यात पाहता येईल. वैयक्तिक सबलीकरण, संघटनात्मक सबलीकरण आणि सामुदायिक सबलीकरण.

1. **वैयक्तिक सबलीकरण:** जेंव्हा एखादा युवक स्पर्धात्मक आयुष्यात आपले कौशल्य वृद्धींगत करतो, यामुळे आपसूकच संस्था आणि समुदायांचा विकास होतो.

2. **संस्थात्मक सबलीकरण:** तरुणांना आवश्यक ते कौशल्य पुरवणाऱ्या संस्था त्यांना आयुष्यावर नियंत्रणासाठी उपयुक्त मार्गदर्शन करतात. पर्याय शोधण्यास शिकवतात, तसेच धोरणात्मक योजनांवर परिणाम करणारे निर्णय घेण्यास शिकवतात.

3. **सामुदायिक सबलीकरण:** समुदायाचा विकास करण्यासाठी प्रयत्नरत असणे, गुणात्मक आयुष्यासाठी प्रयत्न करणे, स्थानिक, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर नागरिकांचा सहभाग वाढवणे.

**युवकांच्या आरोग्यावर परिणाम करणारे घटक**

प्राप्त पुराव्यांवरुन दिसून येते की, तरुण अनेक प्रकारच्या आरोग्य समस्येला बळी पडतात. यात वैयक्तिक आवडी-निवडी, पर्यावरणीय आणि दैनंदिन आयुष्यातील घटनांचा समावेश आहे. यात संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य रोगांचा समावेश आहे. युवकांच्या समस्या केवळ सामाजिक आणि आर्थिक नाहीत तर मानसिक सुद्धा आहेत. नातेसंबंध, एकाकीपणा, ड्रग्स आणि मद्य याचा परिणाम. तर, इतर मुद्यांमध्ये सहकाऱ्यांचा दबाव, कौटुंबिक दायित्व आणि कामाचा ताण आहे. योग्य समुपदेशना अभावी युवक आपले आयुष्य संपवताना दिसतात.

**युवकांमध्ये आढळून येणाऱ्या समस्या:**

- अनावश्यक वजन आणि लठ्ठपणा
- तणाव
- चिंता आणि नैराश्य
- हिंसक वृत्ती
- आत्महत्येची प्रवृत्ती
- तंबाखूजन्य पदार्थांचा वापर
- मद्य आणि ड्रग्जचे व्यसन
- असंसर्गजन्य रोग

**युवा सबलीकरणासाठी योग**

आसने आणि प्राणायम शारिरीक

आणि मानसिक आरोग्यावर परिणाम करतात. शारिरीक ताकद वाढते, शरीरातील विषारी पदार्थांचा निचरा होतो, शरीराला आराम मिळतो, ताण-तणाव कमी होतात आणि चेतासंस्थेवर परिणाम होऊन संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. म्हणून आसने आणि प्राणायाम केल्याने इतरही मदत होते ती अशी

- तणाव आणि चिंता कमी होते
- सकारात्मक ऊर्जा आणि मनस्थिती प्राप्त होते
- रक्तदाब सुरळीत राहतो
- पचनक्रीया व्यवस्थित राहते
- शांत आणि प्रसन्नतेची भावना वाढीस लागते
- तणावाच्या प्रसंगी शांत राहण्यासाठी शरीर तयार होते
- ह्रदयाच्या ठोक्यांचा वेग कमी करुन श्‍वसनावर नियंत्रण ठेवता येते
- ऑक्सिजनचा अधिक प्रभावीपणे वापर करता येतो
- मूत्रपिंडाच्या ग्रंथी कॉर्टिसॉल हे संप्रेरक निर्माण करतात
- रोगप्रतिकारक क्षमता वाढते

**तणाव दूर करण्यासाठी योग**

पॅरासिम्पॅथेटीक (अनिच्छावर्ती स्नायूंवर नियंत्रण ठेवणाऱ्या मज्जातंतूंच्या संदेशानंतर त्या स्नायूंकडून काम करून घेणारे मज्जातंतू) यांच्या कमतरतेमुळे मज्जातंतूवर परिणाम होऊन तणाव निर्माण होते. एखादी मागणी पूर्ण करण्याची एखाद्याची क्षमता नसणे म्हणजे तणाव. यात भावनिक आणि मानसिक प्रतिसादाचा समावेश होतो. जर एखादी व्यक्ती कायम तणावात राहत असेल मग तो तणाव वास्तविक असो वा मानलेला, त्याची मज्जासंस्था तेवढी परिणामकारक राहत नाही.

योगासनामुळे मज्जासंस्था तंदुरुस्त ठेवली जाते. आपल्या शरीरावर सकारात्मक वा नकारात्मक दोन्ही तणावांचा परिणाम होतो. याचा परिणाम शरीरातील रक्तप्रवाहावर होतो. याला शास्त्रीय भाषेत व्हासोकोनस्ट्रक्शन असे म्हणतात. योगासनामुळे शारिरीक आणि मानसिक दोन्हीच्या माध्यमातून मज्जासंस्था नियंत्रित ठेवली जाते. त्याला हायपोथॅलेमिक-पीट्युरी-ॲडरनल ॲक्सिस (एचपीए) असे म्हणतात. योगामुळे दीर्घ श्‍वसन आत्मसात करुन मन शांत ठेवले जाते. तसेच रक्तदाब कमी होतो, पल्स रेट आणि रेस्पिरेटरी रेट कमी होतो त्यामुळे शरीर तणावाला शांतपणे समोर जाते.

**व्यसनमुक्तीसाठी योग**

एखादे व्यसन सोडवण्यासाठी योग अत्यंत महत्वाची उपचारपद्धती


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ______________________ date ______________

Name (in block letters) : ______________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______________________

Phone No. / email : ______________________

PIN : □□□□□□

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

(थेरेपी) आहे. योगासनामुळे शरीर सुदृढ तर होतेच शिवाय अध्यात्मिक जागृती निर्माण होते, तणाव निवारण होते, श्वसनाच्या योग्य पद्धतींची माहिती मिळते, दृढशक्ती वाढते, शरीर-मन समतोल राखला जातो.

**लठ्ठपणा दूर करण्यासाठी योग**

योगासनासाठी योग्य आहार आवश्यक आहे. योग्य आहारासोबतच योग्य सराव आणि श्वसनावर नियंत्रणाच्या पद्धती शिकवल्या जातात. योगामुळे शक्ती आणि लवचिकता वाढते. योगामुळे समतोल साधला जातो. सूर्यनमस्कार हा पूर्ण व्यायाम आहे. कारण सूर्यनमस्कारामुळे अंतःस्रावी ग्रंथी आणि मज्जासंस्थेवर सकारात्मक परिणाम होतो. लठ्ठपणा दूर करण्यासाठी भस्त्रिका, कपालभाती आणि सूर्यभेदना हे प्राणायामाचे प्रकार सांगितले जातात.

**असंसर्गजन्य रोग आणि युवक**

बालपण आणि प्रोढत्व यामधला काळ म्हणजे तरुण. देखावा, ताजेपणा, जोम, उत्साह ही तरुणाईची लक्षणे सांगितली जातात.

एकूणच वर्तन आणि जीवनशैली यावर असंसर्गजन्य रोगाचा प्रभाव अवलंबून आहे. भारतात, तरुणांमध्ये आहारातील बदल घडून येताना हा प्रकार आढळून येतो. यामुळे उच्च रक्तदाब, ताण, मधुमेह आणि फुफ्फुसाचे रोग आढळून येतात.

**असंसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी योग**

असंसर्गजन्य रोगासाठी प्रामुख्याने बदलती जीवनशैली कार्यरत आहे. तंबाखूजन्य पदार्थांचा वापर, सुस्त जीवनशैली, नियमित व्यायामाचा अभाव, अस्वस्थ्य आहार, तीव्र मानसिकतेमुळे निर्माण होणारा तणाव. योगामुळे या सर्व परिणामांवर विजय मिळवला जातो. नूकत्या झालेल्या संशोधनानूसार असे दिसून आले आहे की, योगामुळे शरीर अनेक बाबतीत सकारात्मक राहते. रक्तातील ग्लुकोजचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यापासून ते मानसिक स्थितीवर नियंत्रण मिळवण्याबाबत योग उपयुक्त आहे. योगामुळे दक्षता वाढते.

योगामुळे जीवनातील अनेक आव्हानांना यशस्वीरित्या सामोरे जाता येते. आजच्या व्यस्थ जगातील तणाव बाजूला सारुन असंसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव टाळायचा असेल तर योगासनासारखे उत्तम काही नाही.

■■■

*लेखक 'आयुष' मंत्रालय संचालित मोरारजी देसाई नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ योग या संस्थेचे संचालक आहेत.*

email : ibasavraddi@yahoo.co.in

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting**
**Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**
**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

# नवोद्योगः आव्हाने व भविष्यातील वाटचाल

सौरभ सन्याल / डॉ. रंजीत मेहता



**भारतात स्टार्टअप्सच्या माध्यमातून उद्योजकतेला चालना देण्यासाठी आवश्यक वातावरणनिर्मिती आणि त्याबरोबरच नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 16 जानेवारी 2016 रोजी विज्ञान भवन, नवी दिल्ली येथून "स्टार्ट-अप इंडिया" उपक्रमाची घोषणा केली. या योजनेचे प्रमुख उद्‌दिष्ट भारताला रोजगारनिर्मिती करणारे राष्ट्र बनवणे हे आहे. स्टार्टअप इंडियाने भारतातील उद्योजकांमधे सकारात्मकता निर्माण केली आहे. सद्यपरिस्थितीतही स्टार्ट अप्सच्या संख्येत भारताचा जगात तिसरा क्रमांक लागतो.**

भारताला दरवर्षी एक कोटी रोजगारांची आवश्यकता आहे आणि जागतिक सर्वेक्षण अहवालातून असे निरिक्षण नोंदवण्यात आले आहे की, कोणत्याही देशात मोठया उद्योगांपेक्षा नव्याने स्थापन झालेल्या स्टार्ट-अप व्यवसायांतून सर्वाधिक नवीन रोजगारनिर्मिती होते. कोणत्याही अर्थव्यवस्थेत स्टार्ट अप्स ही नवनिर्मितीची व रोजगारसंधींची केंद्र मानली जातात. भारतात स्टार्टअप्सच्या माध्यमातून उद्योजकतेला चालना देण्यासाठी आवश्यक वातावरणनिर्मिती आणि त्याबरोबरच नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १६ जानेवारी २०१६ रोजी विज्ञान भवन, नवी दिल्ली येथून "स्टार्ट-अप इंडिया" उपक्रमाची घोषणा केली. या योजनेचे प्रमुख उद्‌दिष्ट भारताला रोजगारनिर्मिती करणारे राष्ट्र बनवणे हे आहे. स्टार्टअप इंडियाने भारतातील उद्योजकांमधे सकारात्मकता निर्माण केली आहे. सद्यपरिस्थितीतही स्टार्ट अप्सच्या संख्येत भारताचा जगात तिसरा क्रमांक लागतो. त्यामुळे जागतिक स्तरावरच्या उद्योग जगतालाही भारतीय स्टार्टअप्स कडून खूप अपेक्षा आहेत. देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी नवकल्पनांना चालना देणे व त्यासाठी पूरक वातावरण निर्मिती करणे या दोन बाबी अतिशय महत्वाच्या असून यासाठी आपल्या देशाला अजून बराच मोठा पल्ला गाठायचा आहे. स्टार्ट अप इंडिया योजनेच्या पुढाकारातून भारत सरकारने देशाला नवनिर्मिती, नवकल्पना व उद्योजकतेचे प्रमुख केंद्र बनवण्याच्या वचनपूर्तीच्या दिशेने एक महत्वाचे पाउल टाकले आहे.

स्टार्ट अप व्यवसाय म्हणजे असा व्यवसाय जो नुकताच सुरू झाला आहे. ही एक अशी कंपनी आहे जीला सुरूवातीचे भांडवल



सहसंस्थापकच देतात. हे असे व्यवसाय आहेत, जे बाजारात सहजपणे उपलब्ध नसलेल्या पण जरूरी असलेल्या उत्तम प्रतीच्या सेवा देऊ करतात. स्टार्ट अप व्यवसायिकांना सुरूवातीच्या काळातील खर्च हा त्यांच्या एकूण उत्पनांहून अधिक असतो. त्यामुळे स्टार्टअप्सना सतत निधीची आवश्यकता भासते. पारंपारिक व्यावसायिक बँक

कर्जयोजना इ.कडून स्टार्ट अप्स निधीची सोय करतात. स्टार्ट अप्स हे सर्वसाधारणपणे दोन प्रकारचे आहेत. एक प्रकार म्हणजे अतिशय नाविन्यपूर्ण व उपयुक्त कल्पनेवर आधारित व्यवसाय. तर दुसऱ्या प्रकारचे स्टार्ट अप जुन्याच कल्पनेला पुढे चालू ठेऊन व्यवसाय वृध्दीसाठी काम करतात. स्टार्ट अप ही आपल्या देशासाठी एक नवीन संकल्पना आहे. प्रारंभीच्या काळात अनेक देशांत स्टार्ट अप्सद्वारे लाभ मिळण्याऐवजी आव्हाने व अपयशच इ.चाच खूप फटका बसला. स्टार्ट अप व्यावसायिकांनी अपयश पचवण्याच्या मानसिकतेनेच व्यवसायात उतरणे आवश्यक ठरते. एक स्टार्टअप म्हणून व्यवसायिकाकडे सहसंस्थापक व्यावसायिक साथीदार असतील, परंतु, जरूरी नाही की तो स्टार्ट अप व्यवसाय करण्याचे, तो व्यवसाय पुढे न्यायचे इ. कौशल्ये असतीलच. तसेच नवीन व्यवसायाची उत्तम कल्पना वेगळी व प्रत्यक्षात त्या कल्पनेवर आधारित व्यवसाय चालवणे व तो व्यवसाय यशस्वी करणे या वेगळ्या बाबी आहेत. यासाठी स्टार्ट अप्सना तज्ञ व अनुभवी अशा व्यवसाय मार्गदर्शकांची गरज असते.

**भारतातील स्टार्टअप्ससमोरील व्यवसायनिधी उभारणीबाबत उद्‌भवणारी प्रमुख आव्हाने**

आताची पिढी ही भारतातील स्टार्ट अप्सची पहिलीवहिली पिढी आहे. स्टार्ट अप इंडिया या योजने अंतर्गत सरकारने देऊ केलेल्या विविध प्रकारच्या प्रोत्साहनांचे या पिढीने आनंदाने स्वागत केले आहे. तरिही व्यवसाय निधी उभारणी, पेटंट बनवणे व बौध्दिक संपदा अधिकार इ.सारख्या बाबतीतील आव्हाने स्टार्ट अप्स समोर आहेतच. याशिवाय पेटन्ट नोंदणी, संशोधन व विकास



कार्यासाठी आर्थिक सहाय्यता निधीची कमतरता इ.मुळे अनेक स्टार्ट अप्सना परदेशस्थ व्हेंचर कॅपिटलमधून व्यवसाय निधी प्राप्त होत आहे. एका अभ्यासातून असा निष्कर्ष काढण्यात आला की, ९० टक्क्यांहून जास्त व्यवसाय हे त्या व्यवसायांच्या पहिल्या वर्षातच बंद पडतात. याचे प्रमुख कारण निधीची कमतरता हे

**एका अभ्यासातून असा निष्कर्ष काढण्यात आला की, ९० टक्क्यांहून जास्त व्यवसाय हे त्या व्यवसायांच्या पहिल्या वर्षातच बंद पडतात. याचे प्रमुख कारण निधीची कमतरता हे होय. कारण कोणताही व्यवसाय चालू ठेवण्यासाठी तसेच व्यवसायाच्या विविध टप्प्यांत अखंड वित्त पुरवठ्याची आवक असणे ही एक अत्यावश्यक गरज आहे. तसेच भांडवलाशिवाय कोणत्याही व्यवसायाची सुरूवातच होऊ शकत नाही. निधी व्यवसाय निधीचे व निधी उभारणीच्या अनेक पर्यायी पध्दती भारतात अस्तित्वात आहेत.**

होय. कारण कोणताही व्यवसाय चालू ठेवण्यासाठी तसेच व्यवसायाच्या विविध टप्प्यांत अखंड वित्त पुरवठ्याची आवक असणे ही एक अत्यावश्यक गरज आहे. तसेच भांडवलाशिवाय कोणत्याही व्यवसायाची सुरूवातच होऊ शकत नाही. निधी व्यवसाय निधीचे व निधी उभारणीच्या अनेक पर्यायी पध्दती भारतात अस्तित्वात आहेत. व्यवसायाच्या सुरुवातीच्या काळात पुढे दिलेले काही फंडिंग पर्याय आहेत जे त्यांना त्यांच्या व्यवसायासाठी भांडवल उभारण्यास सहायक ठरतात.

**१. प्रधान मंत्री मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट अँड रिफायनान्स एजन्सी लिमिटेड (मुद्रा) -** देशातील लघु उद्योगांना सहज कर्ज पुरवठा व्हावा, या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ एप्रिल २०१५ रोजी २०,००० करोड रुपये भांडवल असलेली 'मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट अँड रिफायनान्स एजन्सी' अर्थात मुद्रा बँकेचे उद्घाटन केले. या बँकेतून लघु उद्योजकांना १० लाखांपर्यंतचं कर्ज सहज उपलब्ध होण्याची सोय आहे. यासाठी सरकारने एकूण २० हजार कोटींची तरतूद केली आहे. या बँकेच्या मध्यमातून लघु उद्योगांना कर्ज देण्यासाठी देशातील इतर बँकांना प्रोत्साहनही देण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी उद्योजकांना प्रथम आपल्या व्यवसाय योजनेचा प्रस्ताव मुद्रा बँकेकडे सादर करावा लागतो. हा प्रस्ताव मंजूर झाल्यास, त्यासाठी लागणारे कर्जही मंजूर केले जाते. नंतर मुद्रा बँकेकडून उद्योजकाला एक मुद्रा कार्ड मिळते, जे क्रेडिट कार्डसारखे असते. या कार्डाचा वापर व्यावसायिक त्याच्या व्यवसायासाठी आवश्यक कच्चा माल, इतर खर्च इत्यादी खरेदी करण्यासाठी करू शकतो. या योजनेअंतर्गत शिशू, किशोर आणि तरुण हे तीन प्रकारची कर्जे उपलब्ध आहेत.

**२. बूटस्ट्रॅपिंग किंवा सेल्फ फायनांसिंग -** खासकरुन जेव्हा व्यावसायिक एकट्याने आपला स्वतंत्र व्यवसाय सुरू करतो तेव्हाच्या सुरूवातीच्या टप्प्यांत बूटस्ट्रॅपिंग किंवा सेल्फ फायनांसिंग, निधीची जमवाजमव करतो. हा प्रारंभिक वित्तपुरवठ्याचा एक प्रभावी मार्ग आहे. नवद्योजकांना बाह्य स्त्रोतांकडून त्यांच्या व्यवसायाच्या संभाव्य यशाची योजना दर्शविल्याशिवाय निधी मिळविण्यास त्रास होतो. त्यामुळे स्वतः जवळचे भांडवल गुंतवतात.

**३. क्राउड फंडिंग-** या प्रकारचा निधी एकाच वेळी एकापेक्षा अधिक व्यक्तींमधून कर्ज, पूर्व-मागणी, योगदान किंवा गुंतवणूक या रूपात घेतला जातो. यामध्ये एका विशिष्ट फंडिंग प्लॅटफॉर्मवर एक स्टार्टअप त्याच्या व्यवसायाचे विस्तृत वर्णन करून जसे, व्यवसायातील उद्दिष्टे, नफा मिळविण्याच्या योजना, निधीची गरज व कारणे इत्यादी माहितीतून ग्राहकांना त्याच्या व्यवसायाबद्दल ओळख करून देतो. ग्राहकांना त्याची कल्पना आवडल्यास ते त्यांचे पैसे स्टार्टअपच्या व्यवसायात गुंतवतात. भारतातील काही लोकप्रिय क्राउड फंडिंग साइटमध्ये Indeigogo, wishberry, ketto, fundlined इत्यादींचा समावेश होतो.

**४. एंजेल इनवेस्टमेंट -** एंजेल इनव्हेस्टर्स म्हणजे अशा व्यक्ती किंवा संस्था ज्यांच्याजवळ अतिरिक्त रक्कम असून ते ती रक्कम नवीन उद्योगांत किंवा आगामी स्टार्ट अपमध्ये गुंतवण्यात इच्छूक आहेत. तसेच त्यासाठी स्वतःहून पुढाकार घेऊन तसा प्रस्ताव ते स्टार्टअप्सना देतात. असा प्रस्ताव देण्यापूर्वी तीन-चार गुंतवणूकदारांच्या गटांत एकत्र येऊन स्टार्टअपच्या व्यवसायाच्या प्रस्तावाचे बारकाईने परिक्षण करतात. आर्थिक गुंतवणूकीबरोबरच ते स्टार्टअप्सना व्यावसायिक व आर्थिक सल्लागार म्हणूनही सहाय्यता करतात. एंजेल इन्वहेस्टर्सनी आजवर Google, Yahoo आणि Alibaba यांसह अनेक प्रमुख कंपन्या सुरू करण्यासाठी मदत केली आहे. गुंतवणूकीचा हा पर्याय सामान्यतः व्यवसायाच्या वाढीच्या प्रारंभिक टप्प्यामध्ये होतो आणि एंजेल इन्व्हेस्टर्सना त्यांनी गुंतवणूक केलेल्या स्टार्टअप मधून ३० टक्के पर्यंतची इक्विटी मिळण्याची अपेक्षा असते. ते उच्च परताव्यासाठी गुंतवणुकीमध्ये अधिक जोखीम घेण्यास प्राधान्य देतात.

**अल्पपत किंवा मायक्रोफायनान्स ही सेवा ज्यांना पारंपारिक बँकींग सेवांचा लाभ मिळू शकत नाही अशा उद्योजकांसाठी आहे. ही सेवा ज्यांच्या गरजा मर्यादित आहेत आणि बँकांकडून अपेक्षित असलेले क्रेडिट रेटिंग बँकांकडून स्वीकारले जात नाहीत, अशा व्यावसायिकांना विशेष सोईची ठरते. त्याचप्रमाणे, एनबीएफसी म्हणजे नॉन-बँकिंग फायनान्शिअल कॉरपोरेशन अशा पतसंस्था आहेत ज्या सर्वप्रकारच्या पारंपारिक बँकींग सेवा पुरवतात परंतु ज्यांचे स्वरूप कायदेशीररित्या सर्वसामान्य बँकांप्रमाणे नसते.**



**५. व्हेंचर कॅपिटल-** व्हेंचर कॅपिटल्स व्यावसायिकरित्या व्यवस्थापित केलेल्या निधी पर्याय देणाऱ्या गुंतवणूकदार संस्था असतात. या प्रकारचे गुंतवणूकदार अशाच कंपन्यांमध्ये गुंतवणूक करतात ज्यांच्यात प्रचंड वाढीची क्षमता असते. ते साधारणपणे एका व्यवसायात इक्विटीच्या विरोधात गुंतवणूक करतात आणि आयपीओ किंवा प्राप्तीनंतर बाहेर पडतात. हे गुंतवणूकदार तज्ञ मार्गदर्शनासह वेगवेगळ्या परिस्थितीचे योग्य मूल्यमापन करून व्यवसाय स्थिरतेबाबत योग्य बदल करण्यासाठी सल्लागार म्हणूनही सहाय्य करतात.

**६. व्यवसाय इन्क्यूबेटर्स आणि एक्सीलरेटर्स-** नवद्योजकांसाठी हा निधी उभारणीचा एक उत्तम पर्याय आहे. या प्रकारची व्यवसाय निधी उभारणीसाठी सहाय्य करणारी योजना जवळजवळ प्रत्येक महत्त्वाच्या शहरामध्ये अस्तित्वात आहे. या प्रकारच्या योजनेतून दरवर्षी शेकडो नवीन व्यवसाय चालविण्यास मदत होते. इन्क्यूबेटर्स एखाद्या मुलासाठी आईवडिलांप्रमाणे असतात, जे व्यवसायांना आश्रयस्थाने पुरवितात आणि एखाद्या व्यवसायासाठी प्रशिक्षण आणि नेटवर्कींग इ.बाबत मार्गदर्शन देतात. इन्कयुबेटर उभारणी व व्यवसाय स्थिरतेसाठी मदत देतात तर एक्सीलरेटर्स व्यवसायात एखादा महत्वाची झेप घेण्यात प्रोत्साहित करतात.

**७. अल्पपत पुरवठादार किंवा एनबीएफसी -** अल्पपत किंवा मायक्रोफायनान्स ही सेवा ज्यांना पारंपारिक बँकींग सेवांचा लाभ मिळू

शकत नाही अशा उद्योजकांसाठी आहे. ही सेवा ज्यांच्या गरजा मर्यादित आहेत आणि बँकांकडून अपेक्षित असलेले क्रेडिट रेटिंग बँकांकडून स्वीकारले जात नाहीत, अशां व्यावसायिकांना विशेष सोईची ठरते. त्याचप्रमाणे, एनबीएफसी म्हणजे नॉन-बँकिंग फायनान्शिअल कॉरपोरेशन अशा पतसंस्था आहेत ज्या सर्वप्रकारच्या पारंपारिक बँकींग सेवा पुरवतात परंतु ज्यांचे स्वरूप कायदेशीररित्या सर्वसामान्य बँकांप्रमाणे नसते.

**स्टार्टअप उद्योगजगतेला प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारचा पुढाकार:**

स्टार्ट-अप कृती योजनेत स्टार्टअप उद्योगांशी संबंधित विविध बाबींचा अंतर्भाव होईल अशी एकूण १९ कलमे तयार करण्यात आली आहेत. यामध्ये कामगार आणि पर्यावरणविषयक नियमांचे पालन करण्याकरिता सेल्फ सर्टिफिकेशन कंम्प्लायन्सची सुविधा, बौध्दिक संपत्ती संबंधी अर्ज व पेटन्ट करण्यासाठीच्या प्रक्रियेत तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन, बी-बियाणे खरेदीच्या निधीवर कर सूट, भांडवली लाभ आणि तीन वर्षांची आयकर सवलत तसेच चार वर्षांसाठी विशेष सरकारी निधीतून १०,००० कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य इ.चा समावेश आहे.

**भारताची १९ कलमी कृती योजना पुढीलप्रमाणे :**

१. स्वयं प्रमाणित मान्यता किंवा सेल्फ सर्टिफिकेशन कंम्पायन्स

२. स्टार्टअप इंडिया हबच्या माध्यमातून केंद्रिय संपर्क आणि सहायक कक्ष

३. नोंदणीसाठी, नोंदणी करण्याबद्दल आणि माहिती मिळवण्यासाठी मोबाईल ॲप्स आणि पोर्टल सेवांमार्फत प्रक्रिया सुलभ करणे

४. कायदेशीर मदत, सपोर्ट, फास्ट ट्रॅकिंग व पेटंट नोंदणी फी मध्ये ८० टक्के सवलत

५. सार्वजनिक खरेदीच्या नियमांत सूट

६. सोपे आणि जलद निर्गमन

७. १०००० कोटी रुपयांच्या विशेष निधीच्या माध्यमातून आवश्यक भांडवलाची उपलब्धता

---

**आगामी स्टार्टअप एंटरप्रायझेसला पाठिंबा देण्यासाठी सरकार २५०० कोटी रुपयांच्या प्रारंभिक निधीसह चार वर्षांत १०००० कोटी रुपयांचा निधी उभारणार आहे. भारतीय जीवन विमा निगम या कॉर्पसच्या विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल. स्टार्ट-अप इंडस्ट्रीतून निवडलेल्या खाजगी व्यावसायिकांच्या एका गटावर या निधीच्या योग्य व्यवस्थापनाची जबाबदारी असेल.**

---

८. क्रेडिट गॅरंटी फंडिंग

९. भांडवली नफ्यावर कर सूट

१०. तीन वर्षांसाठी आयकरात सूट

११.बाजार हमी भावाच्या गुंतवणूकीवर कर सूट.

१२.राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर वार्षिक स्टार्टअप मेळावे

१३.अटल इनोव्हेशन मिशन (एआयएम) अंतर्गत वर्ल्ड क्लास इनोव्हेशन हबची सुरूवात.

१४. देशव्यापी इन्क्यूबेटर नेटवर्क तयार करण्यावर भर

१५. इनोव्हेशन सेंटरच्या माध्यामातून इनक्यूबेशन आणि संशोधन विकासावर भर

१६. नवकल्पना उत्तेजन देण्यासाठी संशोधन उद्याने

१७. जैवतंत्रज्ञान मध्ये उद्योजकता वाढवणे

१८. विद्यार्थ्यांसाठी नवीन कल्पना मांडण्यासाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम

१९. वार्षिक इनक्यूबेटर ग्रँड चॅलेंज स्पर्धा

**१. स्व प्रमाणन - Self certification**

नियामक दायित्वे कमी करण्यासाठी स्टार्ट-अप स्वयं-प्रमाणाचा लाभ घेऊ शकतात. ग्रॅच्युइटी, श्रमिक करार, प्रॉव्हिडंट फंड व्यवस्थापन, जल आणि वायू प्रदूषण इ. संबंधीच्या कायद्याबाबत स्वयंप्रमाणन लागू होईल.

**२. स्टार्टअप इंडिया हब**

अखिल भारतीय स्तरावर एक स्टार्ट-अप हबची स्थापना करण्यात येईल. देशभरातल्या सर्व स्टार्ट अप्ससाठी मध्यवर्ती संपर्क व सहायक केंद्र म्हणून काम पाहिल. तसेच नवीन उद्योजकांना माहितीचे आदानप्रदान व आर्थिक मदत मिळवण्यासाठी या केंद्राद्वारे विशेष मदत केली जाईल.

**३. मोबाईल ॲपद्वारे नोंदणी**

मोबाईल ॲप्लीकेशन्सच्या स्वरूपात असणाऱ्या ऑनलाइन पोर्टलची सेवा नुकतीच सुरू करण्यात आली. या पोर्टल द्वारे स्टार्ट-अप्सना व्यवसायाची ऑनलाईन नोंदणी करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**४. पेटंट संरक्षण**

केंद्र सरकार कमी खर्चात पेटंट परिक्षणाच्या जलदगती प्रणाली

विकसित करण्यावर काम करित आहे. या प्रणालीद्वारे स्टार्टअप फाउंडेशनच्या सहयोगातून बौद्धिक संपत्ती अधिकारांबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर दिला जाईल.

**५. दहा हजार कोटी रूपयांच्या विशेष निधीची तरतूद**

आगामी स्टार्टअप एंटरप्रायझेसला पाठिंबा देण्यासाठी सरकार २५०० कोटी रुपयांच्या प्रारंभिक निधीसह चार वर्षांत १०००० कोटी रुपयांचा निधी उभारणार आहे. भारतीय जीवन विमा निगम या कॉर्पसच्या विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल. स्टार्ट-अप इंडस्ट्रीतून निवडलेल्या खाजगी व्यावसायिकांच्या एका गटावर या निधीच्या योग्य व्यवस्थापनाची जबाबदारी असेल.

**६. राष्ट्रीय क्रेडिट गॅरंटी ट्रस्ट कंपनी**

स्टार्ट अप्सना निधीची कमतरता भासू नये यासाठी नॅशनल क्रेडिट गॅरंटी ट्रस्ट कंपनी या संकल्पनेवर काम सुरू आहे. पुढील चार वर्षांकरिता दरवर्षी ५०० कोटी रूपयांची आर्थिक तरतूद यात करण्यात आली आहे.

**७. भांडवली नफ्यावर कर सूट**

सध्या, व्हेंचर कॅपिटल फंडांद्वारे केलेल्यावरील भांडवली मिळकतीवर कर लागू होत नाही. हेच समान धोरण स्टार्ट- प्रारंभ-अप्सच्या प्राथमिक-स्तरातील गुंतवणुकीवर लागू करण्यात आले आहे.

**८. तीन वर्षांसाठी आयकरात सूट**

स्टार्ट-अप्सना पहिल्या तीन वर्षांसाठी आयकरात १०० टक्के सूट देण्यात आली आहे. हे धोरण भविष्यात स्टार्टअप्सची संख्या वाढण्यात उपयुक्त ठरेल, असा शासनाला विश्वास आहे. .

**९. उच्च मूल्याच्या गुंतवणुकीवर कर सवलत**

बाजारातील किंमतीपेक्षा जास्त मूल्याच्या गुंतवणूकीवर स्टार्टअप्सना कर सवलत देण्यात येईल.

**१०. उद्योजकता प्रोत्साहन**

देशभरातल्या पाच लाख शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी स्टार्टअपसंबंधी जागरूकता व प्राथमिक ज्ञान पोचवण्यासाठी नवीन उपक्रम संबंधित विशेष अभ्यासक्रमाची मांडणी करण्याची सरकारची योजना आहे. याशिवाय, जागतिक दर्जाचे इन्क्यूबेटर्स विकसित करण्यासाठी वार्षिक इनक्यूबेटर ग्रॅंड चॅलेंज ही स्पर्धा ही आयोजित करण्यात येईल.

**११. अटल अभिनव मिशन**

स्टार्टअप संबंधी नवीन कल्पनांना वाव मिळण्यासाठी आणि प्रतिभावान युवकांना प्रोत्साहित करण्यासाठी अटल अभिनव मोहिमेचा शुभारंभ केला जाईल.

**१२. स्टार्ट अप इनक्यूबेटर्सची स्थापना**

देसभरात 35 नवीन इन्क्युबेटर्स व 31 नवोपक्रम केंद्रांसाठी खासगी-सार्वजनिक भागीदारी मॉडेलचा विचार केला जात आहे.

**१३. रिसर्च पार्क**

इंडियन इंस्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॅम्पसमध्ये सहा आणि इंडियन इंस्टीट्युट ऑफ सायन्स कॅम्पसमध्ये प्रत्येकी एक अशी 100 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह सात नवीन संशोधन केंद्राने उभारण्याची सरकारची योजना आहे.

**१४. जैवतंत्रज्ञान मध्ये उद्योजकतेला प्रोत्साहन**

सरकार देशाभरात पाच नवीन बायोटेक क्लस्टर्सची स्थापना करणार आहे. त्याबरोबरच 50 नवीन जैव इन्क्युबेटर्स, 150 तंत्रज्ञान हस्तांतरण कार्यालये आणि 20 जैव-कनेक्ट कार्यालयेही स्थापन केली जातील.

**१५.शाळांमध्ये स्टार्टअपसंबंधी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम**

देशभरातील पाच लाखाहून अधिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी नवीन उपक्रमांशी संबंधित मार्गदर्शनपर कार्यक्रम सादर केले जातील.

**१६. कायदेशीर सहाय्य**

तज्ञांच्या एका विशेष गटामार्फत पेटंट ॲप्लिकेशन्स आणि अन्य अधिकृत कागदपत्रे सादर करण्याच्या प्रक्रियेत कायदेशीर मार्गदर्शन व सहाय्य पुरवण्यात येईल.

**१७. सवलत**

पेटंटच्या अर्ज दाखल करणाऱ्या उद्योजकांना एकूण मूल्यावर ८० टक्के सवलत देऊ केली जाईल.

**१८. नियमांचे सुलभीकरण**

स्टार्टअपसाठी सार्वजनिक खरेदी आणि व्यापारासंबंधीचे नियम सुलभ करण्यात आले आहेत.

**१९. जलद निर्गमन**

स्टार्ट-अप अपयशी ठरल्यास, सरकार अशा उद्योजकांना त्यांच्या समस्यांचे योग्य निराकरण करण्यासाठी सर्वतोपरी मदत करेल. जर ते पुन्हा अयशस्वी झाले तर सरकार मार्फतच अशा उद्योगांना बंद करण्याची सोपी प्रक्रिया उपलब्ध करून दिली जाईल.

भारतात स्टर्ट अप योजने अंतर्गत २०१६ यावर्षातील पहिल्या व शेवटच्या तिमाईत सुमारे ३.५ अब्ज रूपयांचे व्हेंचर कॅपिटल ८१५ व्यवहारांत गुंतवण्यात आले होते. जे मागील वर्षातील याच कालावधीतील गुंतवलेल्या एकूण मूल्यापेक्षा फार

कमी आहे. युवर स्टोरी रिसर्चनुसार, जानेवारी ते सप्टेंबर २०१५ दरम्यान, ७.३ अब्ज डॉलर एवढे ६३९ व्हेंचर कॅपिटल ६३९ व्यापारी सौद्यात गुंतवण्यात आले होते. या वर्षी, व्यापारी व्यवहारांच्या संख्येत २७ टक्के वाढ झाली आहे, परंतु, करार मूल्य मात्र कमी आहे.

**निष्कर्ष**

कोणत्याही अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी स्पर्धात्मकता व गतिशीलता या दोन घटकांची प्रमुख्याने गरज असते. स्टार्ट अप्स देशाच्या आर्थिक प्रणालीमध्ये नव्याने अतिरिक्त स्पर्धात्मक चैतन्य व आवेग प्रदान करणाऱ्या औद्योगिक संस्था आहेत. स्टार्ट अप्स आर्थिक बदलाचे उत्प्रेरक बनून साखळी पध्दतीने औद्योगिक बदलाला संपूर्ण अर्थव्यवस्थेत रूजवतात. एकदा उद्योगाची स्थापना झाली की, औद्योगीकरणाच्या प्रक्रियेला गती प्राप्त होते. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत मोजणाऱ्या सर्व उपक्रमांमुळेही त्यासंबंधी पूरक अशा उद्योगांची गरज उद्भवते. साखळी पध्दतीने ही गरज मागणीत रूपांतरित होऊन त्याचे परिणामस्वरूप अधिक नव्या उद्योगांची स्थापना होते. अशा प्रकारे अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्राचा विकास होण्यास हातभार लागतो. या बरोबरीने विविध उद्योगांत नवनव्या नोकरीच्या संधीही तयार होत जातात.

स्थानिक स्टार्ट अप्स अतिशय चांगल्या प्रतीच्या व वाजवी दरात सेवा पुरवतात त्यामुळे नागरिकांना त्यांच्या गरजांसाठी देशाबाहेरील उद्योगांच्या सेवांवर अवलंबून रहावे लागणार नाही. वस्तू व सेवांच्या सहज उपलब्धतेने देशातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होण्याबरोबरच देशाच्या आर्थिक प्रगती व विकास प्रक्रियेला गती लाभेल. स्टार्ट अप्सची व्याप्ती मोहिम यशस्वी होऊन त्याची व्याप्ती सर्व क्षेत्रांपर्यंत पोहचल्यास देशाच्या

**स्थानिक स्टार्ट अप्स अतिशय चांगल्या प्रतीच्या व वाजवी दरात सेवा पुरवतात त्यामुळे नागरिकांना त्यांच्या गरजांसाठी देशाबाहेरील उद्योगांच्या सेवांवर अवलंबून रहावे लागणार नाही. वस्तू व सेवांच्या सहज उपलब्धतेने देशातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होण्याबरोबरच देशाच्या आर्थिक प्रगती व विकास प्रक्रियेला गती लाभेल. स्टार्ट अप्सची व्याप्ती मोहिम यशस्वी होऊन त्याची व्याप्ती सर्व क्षेत्रांपर्यंत पोहचल्यास देशाच्या आर्थिक व्यवस्थेला संपन्नता प्रदान होईल असा सरकारला दृढ विश्वास आहे.**

आर्थिक व्यवस्थेला संपन्नता प्रदान होईल असा सरकारला दृढ विश्वास



आहे.

देशातील अनेक उद्यमी युवकांना आपला स्वतःचा व्यवसाय स्थापन करण्याची तीव्र इच्छा असते परंतु त्यांच्याजवळ व्यवसायासाठी आवश्यक संसाधने नसतात. परिणामी त्यांच्या व्यवसाय कल्पना, कौशल्य व क्षमता अव्यक्त राहतात त्याबरोबरच देशही आर्थिक वाढ व रोजगार निर्मितीच्या संधीपासून दूरावतो.

स्टार्ट अप इंडिया ही योजना उद्योगकतेला प्रोत्साहन देणे व देशाच्या सर्वांगिण आर्थिक विकासाला चालना देणे या प्रमुख उद्दिष्टांवर आधारित आहे. नवउद्योजकांना त्यांच्या व्यवसाय स्थापनेच्या नवीन कल्पनांना वाव देण्यासाठी सर्व स्तरांवर सक्रिय सहाय्य व आर्थिक सवलती प्रदान करून स्टार्ट अप्सचा भविष्यातील मार्ग सुकर करण्यासाठी सरकार कटिबध्द आहे.

■■■

*सौरभ सन्याल हे संरक्षक दले आणि कॉर्पोरेट या क्षेत्रांत ३३ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव असलेले तज्ञ आहे. ते अभियंता असून भारतीय तंत्रज्ञान संस्था मद्रास येथील पदव्युत्तर पदवीधारक आहेत. रणजीत मेहता पीएचडी, चेंबर ऑफ कॉमर्स एण्ड इंडस्ट्री येथे सरचिटणीस म्हणून कार्यरत आहेत.*

email : saurabh.sanyal@phdcci.in

ranjeet mehta@gmail.com

**आगामी अंक**

'सामाजिक सुरक्षा'
जुलै २०१७
विशेषांक

# भारतीय युवकः उदयोन्मुख शक्ती

ए. के. दुबे



**युवक कामकाज व क्रीडा मंत्रालयाच्या २०१६-१७ च्या वार्षिक अहवालानुसार युवक हा प्रशासनातील एक उत्साही घटक आहे. त्यांच्या गतीशील व बहुआयामी दृष्टिकोनातून पाहिले तर भारत हा तरूणांचा देश आहे कारण पस्तीशीच्या आतील युवकांची संख्या ६५ टक्क्यांच्या जवळपास आहे. मंत्रालयाच्या २०१६-१७ च्या वार्षिक अहवालानुसार २०२० पर्यंत भारताचे सरासरी वय हे २८ वर्षे असेल जे दक्षिण आशियायी देश व चीनमध्ये ३८ असणार आहे.**

युनेस्कोने युवक या संज्ञेची व्याख्या केली आहे. त्यानुसार युवक काही निश्चित वयोगटाशी संबंधित नाही. बालपणातील अवलंबित्व, प्रौढपणातील स्वतंत्रता व समाजातील एक घटक म्हणून स्वतंत्रतेची जाणीव असे स्थित्यंतराचे मुद्दे त्यात येतात. युवक कामकाज व क्रीडा मंत्रालयाच्या २०१६-१७ च्या वार्षिक अहवालानुसार युवक हा प्रशासनातील एक उत्साही घटक आहे. त्यांच्या गतीशील व बहुआयामी दृष्टिकोनातून पाहिले तर भारत हा तरूणांचा देश आहे कारण पस्तीशीच्या आतील युवकांची संख्या ६५ टक्क्यांच्या जवळपास आहे. मंत्रालयाच्या २०१६-१७ च्या वार्षिक अहवालानुसार २०२० पर्यंत भारताचे सरासरी वय हे २८ वर्षे असेल जे दक्षिण आशियायी देश व चीनमध्ये ३८ असणार आहे. भारतीय लोकसंख्या १५-२९ या वयोगटातील असेल व युवकांचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण २७.५ टक्के राहील. त्यामुळे लोकसंख्येचा लाभांश जास्त मिळेल. त्यासाठी युवकांना देशाच्या उत्पादनशीलतेत भर टाकणारे काहीतरी अभिनव करण्यास भाग पाडावे लागेल. किंबहुना त्यांनी तसे करणे अपेक्षित आहे. त्यांच्याकडून सकारात्मक कल्पनांवर आधारित गोष्टी झाल्या पाहिजेत. युवकांमध्ये जगात भारताला मोठे स्थान मिळून देण्याची ताकद आहे पण त्याला तशा अनुकूल धोरणाची जोड दिली पाहिजे. युवक हे काही तयार प्रयोगशाळा नाही की, जिथे सरकारने प्रयोग करीत बसावे, त्याउलट युवकांचा वापर नवीन संधी तयार करण्यासाठी करता येईल. त्यांच्या समकालीन कौशल्यांचा वापर देशासाठी करून घेता येईल. मायकेल ग्रीन यांनी 'युथ ॲज ॲक्टीव्ह एजंटस ऑफ सोशल चेंज' या शोधनिबंधात असे म्हटले होते की सकारात्मक युवक विकासाची प्रभावशाली व विस्तारणारी चळवळ ही आपल्यातील उणिवा दूर करण्यासाठी व प्रश्नांची उकल करण्यासाठी आवश्यक आहे. सामाजिक, राजकीय व नागरी चळवळींचा विचार केला तर युवक हे या चळवळींचे केंद्र आहेत. महिलांना समान हक्कांच्या चळवळी तसेच पर्यावरणापासून मानवी हक्कांपर्यंत युवकांनी अनेक चळवळीत भाग घेतला आहे, सार्वजनिक जीवनातील बहुपेडी क्षेत्रात ते सक्षमपणे वावरत आहेत. एक चांगला दबाव गट म्हणूनही ते काम करीत आहेत. त्यांना विविध बाबीत रस आहे व तो वाढतोच आहे. नवमाध्यमांचा वापर ते सतत व जास्त प्रमाणात करीत

आहेत. या माध्यमांमधून काही चर्चा, मते पुढे नेली जातात. त्यातून काही संकल्पना तयार होतात. त्यांतून या संकल्पनांच्या मूर्त रूपासाठी सहकार्य व माहितीची देवाणघेवाण होते. त्या संकल्पनांना समाजात व्यापाक मान्यता मिळते. समाजातील गतीशील बदल आत्मसात करण्याची क्षमता युवकांमध्ये असल्याने त्यांना आर्थिक व सामाजिक धोरणे व कृतींमध्ये केंद्रस्थान दिले पाहिजे. युवक हे दोन पिढयांना जोडणारा सेतू म्हणून काम करीत आहेत. त्यांच्या विकास व वाढीत सहजता व लवचिकता असली पाहिजे. ती युवकांना समजून दिली तर ते आत्मसात करू शकतात. संकल्पानात्मक ताठरता व पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधानुकरण या दोन टोकाच्या गोष्टी आहेत, त्याचा देशावर प्रदीर्घ काळात सकारात्मक परिणाम होणार नाही. आजचा युवक हा हे समजून घेणारा आहे की, केवळ स्वायत्तता म्हणजे सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळवण्याचे हुकमी साधन नाही. त्यासाठी अशा काही गोष्टींची गुंफण करावी लागेल ज्या एकत्रितपणे समस्या सोडवू शकतील. नवीन सामाजिक विचार, आर्थिक विकास व राजकीय कृतीशीलता यात युवक हे मुख्यत्वेकरून उत्प्रेरकासारखे आहेत. भारतीय लोकशाहीच्या चौकटीत राहून विविधतेला धक्का न लावता एखाद्या अनुभवाचा योग्य अर्थ युवक लावू शकतात. ताठर समाजव्यवस्थेच्या भिंतीवर जी गोष्ट सतत आघात झेलत आहे ती म्हणजे तर्क, युक्तीवाद व शोध. या तीनही बाबींचा वापर युवक करीत आहेत. आजचे युवक हे ताठर नाहीत त्यांना आंतर जातीय विवाह चालतात. ते पंक्तीप्रपंच करीत नाहीत. आजूबाजूच्या समाजातील लोकांचा जात, वंश, लिंग याबाबतचा जो असंवेदनशील दृष्टिकोन आहे त्याला ते आव्हान देत आहेत. त्याचे प्रमाण फार मोठे नसले तरी समाजाला योग्य दिशा देण्याची ताकद त्यांच्यात आहे. तंत्रज्ञानाच्या वापरात युवकांना त्यांचे मूळ सापडत आहे. सरकारने डिजिटलायझेशनचा पुरस्कार केला तेव्हा रोखविहीन अर्थव्यवस्थेचा मुद्दा पुढे आला, डिजिटल इंडियाचे एक स्वप्न साकारू लागले. आर्थिक क्षेत्रातील प्रश्नांवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उकल करण्याचे प्रयत्न झाले.तंत्रज्ञान आता आपल्या रोजच्या

**नवीन सामाजिक विचार, आर्थिक विकास व राजकीय कृतीशीलता यात युवक हे मुख्यत्वेकरून उत्प्रेरकासारखे आहेत. भारतीय लोकशाहीच्या चौकटीत राहून विविधतेला धक्का न लावता एखाद्या अनुभवाचा योग्य अर्थ युवक लावू शकतात. ताठर समाजव्यवस्थेच्या भिंतीवर जी गोष्ट सतत आघात झेलत आहे ती म्हणजे तर्क, युक्तीवाद व शोध. या तीनही बाबींचा वापर युवक करीत आहेत. आजचे युवक हे ताठर नाहीत त्यांना आंतर जातीय विवाह चालतात.**

जीवनात सकारात्मक बदल घडवित आहे, अनेक अशक्य गोष्टी त्यातून शक्य झाल्या आहेत. रोज आपण एकेक मैलाचा दगड पार करीत आहोत. लोकांच्या कल्याणासाठी तंत्रज्ञानाचा वापर होत आहे, विकसनशील देशात हे प्रमाण अधिक आहे. भारतात डिजिटल क्षेत्रातील वातावरण आता भारलेले आहे, युवकांचे त्यातून सक्षमीकरण अधिक जोरकसपणे होत आहे. त्यातून दळणवळण, चटकन ज्ञानार्जन, दोन लांबवरच्या ठिकाणी असलेल्या लोकांचा संवाद शक्य झाला आहे. समविचारी मनांच्या संकल्पना, समस्यांवर उकल व त्याची फलनिष्पत्ती याला महत्व आले आहे. एका क्लिकवर आपण संकल्पनांची देवाणघेवाण करू शकतो, एकमेकांशी सल्लामसलत, सहकार्य व कृती हे सगळं शक्य झाले आहे. विद्यार्थ्यांना आता बरीच साधने इंटरनेटमुळे उपलब्ध आहेत. ते चांगल्या केंद्रांमध्ये प्रवेशासाठी अर्ज करू शकतात. तंत्रज्ञानाने समान संधी निर्माण केल्या. किमान साधनांच्या उपलब्धतेत तरी कुणी मागे राहत नाही. आजच्या युवकांची शिकण्याची. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची इच्छा खूप आहे. युवक व तंत्रज्ञान यांच्या सहयोगातून नवीन स्टार्ट अप येत आहेत, युवक जोमाने काम करीत आहेत. विशिष्ट कौशल्ये आत्मसात केली जात आहेत. उद्योगात पुढाकार सुरू आहे. सेवा क्षेत्रातही युवक मागे नाहीत. तंत्रज्ञानाची जोड मिळाल्याने युवक उद्यमशील बनले आहेत. सरकारचे युवक कामकाज व क्रीडा मंत्रालय भारतीय युवकांची प्रगती व विकास यावर लक्ष ठेवत आहे. त्याचे परिशीलन वेळोवेळी करून अहवाल दिले जात आहेत. युवकांना कुठली नियमिक कौशल्ये हवी आहेत व जीवनशैली व नेतृत्वाची कुठली कौशल्ये हवी आहेत याचा विचार केला जात आहे. २०१६-१७ च्या अहवालानुसार २०१४ मधील राष्ट्रीय युवक धोरण हे संपूर्ण देशातील युवकांच्या सर्वांगीण विकासास बांधील आहे, कारण त्यामुळे देशउभारणीच्या प्रक्रियेत युवकांचा सहभाग अधिक चांगल्या पद्धतीने शक्य आहे.

२०१४ मधील युवा धोरणाची काही वैशिष्ट्ये सांगता येतील ती खालीलप्रमाणे आहेत.

**अ) देशाच्या आर्थिक विकासात शाश्वत योगदान देऊ शकेल असे सक्षम मनुष्यबळ तयार करण्यास प्राधान्य आहे, त्यातील महत्वाचे घटक खाली दिले आहेत**

१. शिक्षण,

२. उद्यमशीलता ,

३. रोजगार व कौशल्यविकास

**ब) आगामी पिढ्या सक्षम करणारे बलशाली व आरोग्यवान तरूण घडवणे**

१) आरोग्य व जीवनशैली

२) क्रीडा

**क) सामाजिक मूल्ये रूजवताना समाजसेवेला प्राधान्य देणे त्यातून विवेकी नेतृत्व तयार करणे**

१) सामाजिक मूल्यांना प्रोत्साहन

२) सामाजिक कार्यक्रम

**ड) नागरी कार्यक्रमात सहभाग वाढवणे व प्रशासनाच्या सर्व केंद्रांमध्ये त्याचा अवलंब करणे.**

१) राजकारण व प्रशासनात सहभाग

२) युवकांचे सहकार्य

**इ) जोखमीच्या काळात युवकांना प्रोत्साहित करून वंचितांना समान संधी उपलब्ध करणे**

१) सर्वसमावेशकता

२) सामाजिक न्याय

सध्याच्या सरकारने विविधांगी कार्यक्रम हाती घेतले असून युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न सुरू आहेत. नेहरू युवा केंद्र संघटन यांच्या वतीने युवकांना देशउभारणीच्या कामाचे धडे दिले जातात व 'द नॅशनल सर्व्हिस स्कीम' म्हणजे एनएसएसच्या माध्यमातून नैतिकता व मानवतावादी व्यक्तीमत्वे घडवून स्वयंसेवी सामाजिक कार्य केले जाते. राष्ट्रीय युवक व प्रौढ विकास कार्यक्रम सध्या सुरु आहेत. त्याला राष्ट्रीय युवा महोत्सव व पुरस्कार यांची जोड आहे. त्यातून युवकांना उत्तेजन मिळत आहे. २०११ च्या जनगणनेनुसार ४१ टक्के युवक हे विशीच्या आतील आहेत. वय हे व्यक्तीमत्व विकासात महत्वाचे असते. त्यात योग्य मार्गदर्शन, दिशा हवी असते. आजचे युवक वेगाने वाढणाऱ्या शहरी संस्कृतीला बळी पडत आहेत. काहीवेळा ते गुन्हेगारीत ओढले जात आहेत. या नकारात्मक बाबींचे कारण असमानता हे आहे.

**शिक्षणतज्ञांच्या पातळीवर व्यापक विचार होत नसल्याने युवकांच्या समस्या कशा सोडवाव्यात याबाबत अनभिज्ञता आहे. शिक्षण क्षेत्रातील लोक हे पूर्ण संवेदनशील नाहीत व युवकांच्या अस्मितेचा, वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रश्न त्यांनी विचारात घ्यायला हवा. खरेतर शिक्षण तज्ञ हे करू शकतात. त्यामुळे आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन व इतर सुधारणातून बदल करता येईल. युवक जे काम करतात त्याचे योग्य तिथे कौतुक झाले पाहिजे.**

उपलब्धता असणे व एखादी गोष्ट प्रत्यक्षात मिळणे यात फरक आहे त्यामुळे नकारात्मकता वाढीस लागते. सरकारने या समस्यांच्या निराकरणासाठी अनेक कार्यक्रम राबवले आहेत पण प्रत्येक वेळी योग्य पद्धतीचा अवलंब करण्याचे ज्ञान युवकांना असतेच असे नाही. आर्थिक अडचणी व सामाजिक रचना यामुळे हा भेदभाव तयार होतो. शिक्षणतज्ञांच्या पातळीवर व्यापक विचार होत नसल्याने युवकांच्या समस्या कशा सोडवाव्यात याबाबत अनभिज्ञता आहे. शिक्षण क्षेत्रातील लोक हे पूर्ण संवेदनशील नाहीत व युवकांच्या अस्मितेचा, वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रश्न त्यांनी विचारात घ्यायला हवा. खरेतर शिक्षण तज्ञ हे करू शकतात. त्यामुळे आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन व इतर सुधारणातून बदल करता येईल. युवक जे काम करतात त्याचे योग्य तिथे कौतुक झाले पाहिजे. आपली ताठर व कठोर मानसिकता बाजूला ठेवून कौतुक करण्याचा उदारपणा दाखवला पाहिजे. एनएसएस व एनवायकेएस या योजनातून अनेक प्रश्नांवर तोडगा काढण्यात यश आले आहे. २०१६-१७ च्या अहवालानुसार राष्ट्रीय युवा धोरण २०१४ ची यशस्वी अंमलबजावणी करण्याकरिता अग्रक्रम ठरवले पाहिजेत.

१) यात कुठल्याही व्यवस्थेची क्षमता व शिक्षणाचा दर्जा सुधारणे

२) युवकांशी दूरसंपर्क ठेवून त्यांच्यात जागृती वाढवणे, रोजगार व कौशल्य विकासाला प्राधान्य देणे.

३) उद्योजकतेसाठी विशिष्ट गरजानुसार तयार केलेले कार्यक्रम राबवणे

४) आरोग्य क्षेत्रातील सेवा सुधारणे

आरवायएसकेचा उद्देश अधिक सर्वकष विकास साधणे हा आहे. त्यात विभागनिहाय दृष्टिकोन न ठेवता आंतरशाखीय प्रयत्न गरजेचे आहेत. यात सरकारचे काही उपक्रम खालीलप्रमाणे आहेत.

**अ) कौशल्य सुधारणा कार्यक्रम (एसयूटीपी)-** यात व्यवसाय प्रशिक्षण कौशल्ये दिली जातात. जादा उत्पन्न कमावण्याची क्षमता व आत्मविश्वास निर्माण केला जातो. स्थानिक गरजा लक्षात घेऊन प्रशिक्षण दिले जाते.

**ब) लोककला, संस्कृती व युवा कीर्ती यांना प्राधान्य-** नवी पिढी पाश्चिमात्य जगाकडे बघते आहे त्यामुळे आताच्या काळात ग्रामीण युवकांना त्यांची कला, संस्कृती जोपासण्याची दिशा दिली पाहिजे.

**क) महात्मा गांधी युवा स्वच्छता अभियान व श्रमदान कार्यक्रम-** यात युवकांना स्वच्छता व जलसंवर्धनाच्या कामात सहभागी केले जाते. अपुरा सहभाग ही एक समस्या यात आहे सरकारचे चांगले हेतू , सर्वसमावेशक विकास धोरण यांची माहिती युवकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे.

**ड) प्रौढांसाठी जीवन कौशल्य प्रशिक्षण-** युवकांची मानसिक घसरण रोखणे यात महत्वाचे आहे. आरोग्य, जीवनशैली व रोजचे ताणतणाव यांचे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य त्यांना यात शिकवले जाते. आरोग्याचे चांगले पर्याय निवडण्याची क्षमता निर्माण केली जाते. युवक व प्रौढांना लैंगिक शिक्षण दिले जाते.

भौगोलिक व सामाजिक अडथळे सोडून दोन कार्यक्रम राबवले जात आहेत ते खालीलप्रमाणे

**१) आदिवासी युवक आदानप्रदान कार्यक्रम-** यात आदिवासी समाजातील नक्षलवादाकडे झुकणाऱ्या तरूणांना निवडून त्यांना देशाच्या इतर भागाचे दर्शन घडवणे महत्वाचे मानले आहे व त्यात त्यांच्या स्थानिक विचारसरणीला धक्का न लावता त्यांची मनोवृत्ती राष्ट्रीय दृष्टिकोनात परिवर्तित करणे आवश्यक आहे. यात अनुभवातून शिक्षण दिले जाते. विकास, पायाभूत विकास व कौशल्य विकासाचे फायदे सांगितले जातात.

**२) ईशान्य युवक आदानप्रदान कार्यक्रम-**

नेहरू युवा केंद्र संघटन हे युवक कामकाज व गृह कामकाज मंत्रालयाच्या सहकार्याने ईशान्येकडील युवकांना मदत करीत आहे. यात ईशान्येकडील युवक व महाराष्ट्रातील युवक यांचे सहकार्य केले जाते आहे व त्यातून सामाजिक आर्थिक प्रगती साधतानाच सांस्कृतिकदृष्ट्या वेगळ्या जीवनशैलींचे संवर्धन केले जात आहे. यात तामिळनाडूत

**२०१२ मधील कायद्याच्या अंमलबजावणीनंतर राजीव गांधी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ यूथ डेव्हलपमेंट ही संस्था स्थापन करण्यात आली. त्याचा हेतू जगात मान्यता असलेले उत्कृष्ट युवा शिक्षण केंद्र निर्माण करणे हा आहे. यात एमएस्सी पदव्युत्तर पदवी, मानसिक समुपदेशनात एमए, सामाजिक नवकल्पना व उद्योजकतेतील पदव्युत्तर पदवी, लिंगभेद अभ्यासात एमए, धोरण विकास व वापर यात एमए पदवी अशा सुविधा यात दिल्या आहेत. आंतरविद्याशाखीय डॉक्टरेटही तेथे करता येते.**

श्रीपेरूम्बदूर येथे एक संस्था युवक व क्रीडा कामकाज मंत्रालयाच्या अंतर्गत स्थापन करण्यात आली. २०१२ मधील कायद्याच्या अंमलबजावणीनंतर राजीव गांधी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ यूथ डेव्हलपमेंट ही संस्था स्थापन करण्यात आली. त्याचा हेतू जगात मान्यता असलेले उत्कृष्ट युवा शिक्षण केंद्र निर्माण करणे हा आहे . यात एमएस्सी पदव्युत्तर पदवी, मानसिक समुपदेशनात एमए, सामाजिक नवकल्पना व उद्योजकतेतील पदव्युत्तर पदवी, लिंगभेद अभ्यासात एमए, धोरण विकास व वापर यात एमए पदवी अशा सुविधा यात दिल्या आहेत. आंतरविद्याशाखीय डॉक्टरेटही तेथे करता येते. आर्थिक पातळीवर सुयोग्य, सामाजिक पातळीवर विश्वासार्ह व सहज उपलब्ध या उद्देशाने सरकार युवक वसतीगृहे शहरात उपलब्ध करून देत आहे. पर्यटन केंद्रे, ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्व असलेल्या ठिकाणीही ही सुविधा दिली आहे. देशपातळीवर बहुविध संस्कृतीचा अनुभव घेण्यासाठी, राहण्यासाठी व्यवस्था केली जात आहे. युवकांची क्षमता पूर्णपणे वापरण्यासाठी सरकार प्रयत्न करीत आहे त्यातून व्यक्तीमत्व विकास होत असतानाच जागतिक पातळीवर भारतीय युवकांचा आवाज बुलंद होत आहे. हे युवक संवेदनशील व विचारशील तसेच सुसंवादी जगात आपले प्रतिनिधित्व करणार आहेत. युवक व त्यांची अमर्याद शक्ती यावर स्वामी विवेकानंदांचा विश्वास होता. ते म्हणतात की, उठा, जागे व्हा व उद्दिष्ट साध्य होईपर्यंत थांबू नका.

■■■

*लेखक भारत सरकारच्या युवक कल्याण आणि क्रीडा खात्याचे सचिव आहेत.*

email : sec-ya@nic.in

# युवापिढीच्या आरोग्यदायी, तणावमुक्त जीवनासाठी योगाभ्यास

डॉ. ईश्वर एन. आचार्य / डॉ राजीव रस्तोगी.




**भारताच्या प्राचीन शास्त्रांपैकी प्रमुख शास्त्र असलेल्या योगशास्त्राची मूळ संकल्पना मानवाला शरीर तंदुरूस्तीबरोबरच मन व आत्मज्ञानाचे एक स्थिर अधिष्ठान मिळवून देण्यावर आधारित आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर, योग म्हणजे एक प्रकारचे आध्यात्मिक अनुशासन आहे ज्याद्वारे शरीर व मनाचे योग्य संतुलन साधण्याची कला आत्मसात करण्याचे कौशल्य साधले जाते. भारतात ऋषीमुनींच्या काळात योगाभ्यासाचे विविध पैलू विकसीत झाले.**

निरोगी व तंदुरूस्त जीवन जगण्यासाठी जगभरात ज्या विविध प्रकारच्या चिकित्सा, व्यायामशैली तसेच शास्त्रांचा अवलंब केला जातो, त्यामध्ये सर्वात लोकप्रिय व जगन्मान्यतेने स्वीकारली गेलेली आरोग्यपध्दती म्हणजे योग. भारताच्या प्राचीन शास्त्रांपैकी प्रमुख शास्त्र असलेल्या योगशास्त्राची मूळ संकल्पना मानवाला शरीर तंदुरूस्तीबरोबरच मन व आत्मज्ञानाचे एक स्थिर अधिष्ठान मिळवून देण्यावर आधारित आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर, योग म्हणजे एक प्रकारचे आध्यात्मिक अनुशासन आहे ज्याद्वारे शरीर व मनाचे योग्य संतुलन साधण्याची कला आत्मसात करण्याचे कौशल्य साधले जाते. भारतात ऋषीमुनींच्या काळात योगाभ्यासाचे विविध पैलू विकसीत झाले. आज एकविसाव्या शतकात प्रदेश, धर्म, जात, पंथ आणि राष्ट्रीयता अशा सर्व प्रकारच्या सीमांच्या मर्यादा ओलांडून योगाभ्यासाचे विविध प्रकार, शैली तसेच योगाभ्यासाचे महत्व जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत जाऊन पोहचले आहे. निरोगी आयुष्य मिळवून देण्याबरोबरच विविध आजारांना प्रतिबंध करणे तसेच प्रभावी पद्धतीने जीवनशैली संबंधित विकारांवर ठोस उपचारात्मक उपाय देणारे शास्त्र म्हणून योगाभ्यासाला जगभरात मान्यता लाभली आहे.

सध्याच्या आधुनिक काळात विविध क्षेत्रांतील तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवी जीवन तांत्रिक स्तरावर आरामदायी बनले आहे. परंतु त्याबरोबरच चुकीची जीवनशैली, गुंतागुंतीची व निसर्गनियमांच्याविरूध्द जाणारी आधुनिक कार्य संस्कृती, वाढते पर्यावरणीय असंतुलन, प्रदूषण, इ.मुळे नैसर्गिक स्तरावर मात्र जीवन अधिकाधिक असह्य व जटिल बनले आहे. म्हणजेच मानवाच्या शारिरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक, सामाजिक आणि अध्यात्मिक अशा सर्वच पैलूंवर सातत्याने प्रतिकूल परिणाम होतो आहे. योगशास्त्र मानवी जीवनाच्या सर्व गुंतागुंतीच्या समस्यांवर प्रभावी उपाय मिळवून देण्यात, विशेषतः जीवनाच्या भौतिक व मानसिक स्तरावर समतोल साधून जीवनाला योग्य दिशा देण्याची भूमिका बजावते. योगशास्त्राचे वैशिष्टय असे की, इतर सर्व प्रकारच्या आरोग्य चिकित्सा प्रणालींत योगाभ्यास ही एक पूरक चिकित्सा पध्दती ठरते. त्यामुळे इतर आरोग्य पध्दतींचे तज्ञ चिकित्सकही रुग्णांना औषधांबरोबरच नियमित योगाभ्यास करण्याची शिफारस करतात.

२७ सप्टेंबर २०१४ रोजी ६९ व्या संयुक्त राष्ट्राच्या महासभेतील

आपल्या भाषणादरम्यान, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगशास्त्राबाबत अतिशय सुंदर शब्दांत भाष्य केले. पंतप्रधान म्हणाले की, योगशास्त्र ही भारताच्या प्राचीन परंपरेकडून जगाला मिळालेली बहुमोल देणगी आहे. योगशास्त्राची मूळ संकल्पना उलगडून सांगताना पंतप्रधान म्हणाले की,मन आणि शरीर; विचार, भावभावना आणि कृतींत संयम आणि पूर्ततेचा योग्य मिलाफ साधत मनुष्य जीवन आणि निसर्गा दरम्यान एक अनोखा सामंजस्यपूर्ण आयाम देऊ करणारे शास्त्र म्हणजे योगशास्त्र. पंतप्रधान असेही म्हणाले की, योगशास्त्र म्हणजे कोणता व्यायाम प्रकार नसून हे शरीर व मनाचे संतुलन साधत स्वतःशी, सभोवतालच्या भौतिक जगाशी व निसर्गाशी तादात्म किंवा एकरूपता साधण्याचे एक सहजसोपे पण तितकेच अनोखे असे शास्त्र आहे. नियमितपणे योगाभ्यासाच्या विविध शैली आत्मसात करून आपण सर्वांनी आपआपल्या जीवनपध्दती योग्य करण्याबरोबर आपल्यातील सामाजिक जाणीवांच्या कक्षा रूंदावल्यास आपण सर्व जागतिक हवामान बदलासारख्या गंभीर समस्येवरही मात करू शकू, असा विश्वासही पंतप्रधानांनी व्यक्त केला. संपूर्ण जगात योगशास्त्राची उपयुक्तता अधिक चांगल्या प्रकारे वापरता येण्याची गरज स्पष्ट करत, योगशास्त्राचे महत्व येणाऱ्या काळातही जागतिक स्तरावर रूजवण्यासाठी दरवर्षी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात यावा असा महत्वाचा प्रस्ताव पंतप्रधानांनी या भाषणात मांडला.

या प्रस्तावाचा स्वीकार करत ११७ देशांच्या संमतीने संयक्त राष्ट्र संघटनेने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला.

त्यानुसार संपूर्ण जगात हा दिवस अतिशय उत्साहाने साजरा केला गेला. भारतामध्ये आयुष मंत्रालयावर देशभरात योग्य पद्धतीने आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. यंदा आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे तिसरे वर्ष आहे.

---

**योग ही औषधाविना असलेली एक अशी चिकित्सा पध्दती आहे जिचे काही विशिष्ट नियम व संकल्पना आहेत. योगनियमांचे काटेकोर पालन करून योगसाधना केल्यास अनेक तऱ्हेचे आजार पूर्णपणे बरे होऊ शकतात व व्यक्ती निरोगी आयुष्य जगू शकते. योगसाधनेच्या मूळ संकल्पनेत मानवी आरोग्याच्या सर्व घटकांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. योगसाधना जीवनाच्या शारीरिक, मानसिक, नैतिक, सामाजिक, भावनिक आणि आध्यात्मिक अशा विविध पैलूंवर आधारलेली आहे.**

---

**योग म्हणजे काय?**

योग हे प्राचीन भारतीय ऋषीमुनींनी विकसीत केलेले एक आध्यात्मिक शास्त्र आहे. योगशास्त्राची पाळेमुळे प्राचीन भारतीय परंपरा व तत्कालीन जीवनशैलीत खोलवर रूजलेली असल्याची नोंद आधुनिक संशोधन अहवालांत आढळते. एकाप्रकारे योगशास्त्र समग्र सजीव जीवनव्यवस्थेशीच जोडलेले आहे. भारतीय ऋषी-मुनींनी हजारो वर्षांपूर्वी योगशास्त्र विकसित केले. भारतातल्या जवळजवळ सर्व प्राचीन ग्रंथांमध्ये योगिक साहित्य सापडले आहे. योगशास्त्राबाबतच्या अनमोल माहितीचा स्त्रोत मध्यकालीन, आधुनिक आणि समकालीन साहित्यांतही सापडला आहे. यामध्ये विशेषतः इ.स.पू. ४०० मध्ये लिहले गेलेल्या पातंजली हा ग्रंथ व त्यात दिलेल्या योगसूत्रांच्या सविस्तर माहितीचा जगभरातल्या अनेक योगगुरू व योगप्रचारकांनी तपशीलवार अभ्यास करून त्याबाबत अधिक विस्ताराने लेखन व टिप्पणी केली आहे. पातंजली योगग्रंथात मांडलेली अष्टांग योग या नावाने ओळखली जाणारी आठ योगसूत्रे मानवी जीवनाच्या सर्व टप्प्यांशी संबंधित आहेत.

योग ही औषधाविना असलेली एक अशी चिकित्सा पध्दती आहे जिचे काही विशिष्ट नियम व संकल्पना आहेत. योगनियमांचे काटेकोर पालन करून योगसाधना केल्यास अनेक तऱ्हेचे आजार पूर्णपणे बरे होऊ शकतात व व्यक्ती निरोगी आयुष्य जगू शकते. योगसाधनेच्या मूळ संकल्पनेत मानवी आरोग्याच्या सर्व घटकांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. योगसाधना जीवनाच्या शारीरिक, मानसिक, नैतिक, सामाजिक, भावनिक आणि आध्यात्मिक अशा विविध पैलूंवर आधारलेली आहे. योगसाधनेत दैनंदिन जीवनात सहजपणे करता येतील अशा पध्दती सांगितलेल्या आहेत. ज्यांच्या नियमित सरावामुळे तब्येत चांगली राहून रोगांना प्रतिबंध करणे सहज शक्य ठरते. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत सातत्याने बदलत जाणाऱ्या आरोग्यविषयक उपचारपध्दती व गरजांची पूर्तता करण्यासाठी जगभरातल्या आरोग्यसंशोधकांनी नियमित योगसाधनेला पूरक अशा निसर्गोपचारासारख्या इतर काही पूरक उपचार पध्दतींवरही प्रदिर्घ संशोधन करून त्या अधिक प्रभावी प्रकारे

उपयोगात आणण्यास सुरूवात केली आहे. आज योगसाधनेला जागतिक स्तरावर मान्यता लाभली आहे. विविध देशांतल्या सर्व स्तरांतील व्यक्तींमध्येही नियमित योगाभ्यास करण्याबाबत जागरुकता निर्माण झाली असून केवळ आरोग्यासाठीच नव्हे तर वयपरत्वे भविष्यात उद्भवू शकणाऱ्या रोगांवर किंवा शारिरीक व्याधींवर अतिशय प्रभावी ठरणारी जीवनशैलीपध्दती या रूपात योगशास्त्राचा जगभरातील अनेक व्यक्तीं अंगिकार, प्रसार व प्रचार करत आहेत. स्पर्धात्मक जगातले ताणतणाव व मानसिक आरोग्याच्या स्वास्थ्यासंबंधी विविध तक्रारी असणाऱ्यांसाठी अनेक योगगुरू तसेच वैद्यकिय व्यावसायिक योगसाधना मार्गदर्शक शिबिरे, सामूदायिक योगसाधना सत्र इ. चे आयोजन करून योगाचा प्रभावी पध्दतीने जागतिक स्तरावर प्रसार व प्रचार करित आहेत.

योगिक पध्दतींच्या नियमित सरावामुळे चांगल्या आरोग्याची वाढ होते, रोगांना प्रतिबंध घालता येतो तसेच अनेक गुंतागुंतीच्या मनोविकारांवरही प्रभावीपणे मात करता येते.

विविध योगसाधना पध्दती या व्यक्तीच्या सर्वांगिण आरोग्याशी संबंधित असून व्यक्तीला संपूर्णपणे निरोगी करण्यावर या पध्दतींत भर दिला जातो. योगाच्या लोकप्रिय पद्धतींमध्ये शुद्धी-क्रिया, सूर्य नमस्कार, योगासने, प्राणायाम, विश्रांती तंत्र, बंध आणि मुद्रा, ध्यानधारणा इत्यादींचा समावेश आहे.

**सूर्य नमस्कार:**

सूर्य नमस्कार हा योगिक व्यायामातील एक सर्वांगसुंदर अत्यंत उपयुक्त आणि लोकप्रिय प्रकार आहे. सूर्यनमस्कारात १२ प्रकारच्या शरीरस्थिती केल्या जातात. सर्वसाधारणपणे सकाळी सूर्य उगवायच्यावेळी पूर्व दिशेला तोंड करून सूर्यनमस्कार केले जातात. सूर्याच्या १२ नावांबरोबर बीजमंत्र उच्चारणासह किमान १२ सूर्यनमस्कार तरी दररोज घातल्यास आरोग्यास अनेक लाभ होतात. वैज्ञानिक संशोधनातून हे सप्रमाण सिध्द झाले आहे की, नियमित सूर्यनमस्कार केल्याने मानवी मेंदूच्या विविध ग्रंथींची कार्यक्षमता वाढण्यास मदत होते तसेच मेंदूच्या पेशी व कोशिकांना उत्तम प्रकारे रक्तपुरवठा व ऑक्सीजन मिळून त्यांचे कार्य सुरळीत होते व परिणामी संपूर्ण शरीराच्या अंतर्गत प्रणालीचा समतोल राखला जाउन मानसिक व बौध्दिक क्षमतांचा योग्य विकास होतो.

**शरीराच्या विविध अवयवांना सहजपणे ताण देऊन अतिशय संथपणे योगासने केली जातात. योगासनांमुळे मुख्यतः शरीरीतील सर्व स्नायूंना लवचिकता प्राप्त होते तसेच शरीराचे जडत्व कमी होण्यास मदत होते. नियमितपणे योगासने करण्याचे अनेक लाभ आहेत. मन शरीर व मेंदूची कार्यक्षमता वाढण्यासाठी योगासने खूप उपयुक्त ठरतात. योगासने अतिशय सहजतेने केली पाहिजेत व अंतिम आसनस्थितीत काही काळ स्थिर राहून मंद श्वसन करणे हे योगासने करण्याचे प्राथमिक तंत्र आहे.**

**योगासने- (शारीरिक आसन):**

शरीराच्या एका विशिष्ट स्थितीतून संथपणे श्वासोच्छवास करत दुसरी शारिरीक स्थिती करण्याची क्रिया विविध प्रकारच्या योगासनांतून केली जाते. मन आणि शरीराचे समन्वय साधायची किमया योगासनांच्या माध्यमांतून अतिशय सहजसोप्या पध्दतीने साधली जाते. शरीराच्या विविध अवयवांना सहजपणे ताण देऊन अतिशय संथपणे योगासने केली जातात. योगासनांमुळे मुख्यतः शरीरीतील सर्व स्नायूंना लवचिकता प्राप्त होते तसेच शरीराचे जडत्व कमी होण्यास मदत होते. नियमितपणे योगासने करण्याचे अनेक लाभ आहेत. मन शरीर व मेंदूची कार्यक्षमता वाढण्यासाठी योगासने खूप उपयुक्त ठरतात. योगासने अतिशय सहजतेने केली पाहिजेत व अंतिम आसनस्थितीत काही काळ स्थिर राहून मंद श्वसन करणे हे योगासने करण्याचे प्राथमिक तंत्र आहे.

**प्राणायाम:**

प्राणायामाचे विविध प्रकार व पद्धती आहेत. सोप्या शब्दांत सांगायचे झाले तर प्राणायाम म्हणजे श्वसनाच्या आवेगांवर नियंत्रण आणण्याचे तंत्र. संथ गतीने श्वास घेणे त्यानंतर काही काळासाठी हा श्वास रोखून धरणे व नंतर एकसंथ लयीत श्वास सोडणे या तीन क्रियांचा अंतर्भाव प्राणायामाच्या प्राथमिक प्रकारात होतो. प्राणायामाचा मुख्य उद्देश व्यक्तीच्या स्वायत्त मज्जासंस्थेवर नियंत्रण मिळवून त्याद्वारे व्यक्तीच्या मानसिक अवस्थेच्या कार्याचे नियंत्रण व नियमन करणे हा होय. ध्यानधारणेसारख्या उच्च योग पद्धतींमध्ये प्राणायामाचाही अंतर्भाव असतो.

**ध्यान (चिंतन):**

ध्यान करणे म्हणजे शरीराबरोबरच मनाची एकाग्रता साधणे. ध्यान म्हणजे मनातल्या सर्व विचारांचा प्रवाह थांबवून मन शांत करून एकस्थिर करणे होय. ध्यान करण्याचे मूलभूत तत्त्व हे अंतर्गत जागरूकता विकसित करण्यावर आधारित आहे. ध्यान करताना बाह्य वातावरण विसरून अंतर्मनाशी एकरूप होत आपल्या मानसिक कार्यांवर नियंत्रण मिळवण्याचे कसब साधले जाते. ध्यान ही एक अशी प्रक्रिया आहे, ज्यामध्ये व्यक्ती आपले संपूर्ण चित्त अनुभवांवर स्थिर करत आत्मज्ञानाची अनोखी अनुभूती घेते. ध्यानधारणेच्या नियमित सरावाने, मनाची एकाग्रता वाढून व्यक्तीच्या मानसिक शक्ती वृध्दींगत होण्यास मदत होते. तसेच व्यक्तीच्या शारीरिक ऊर्जा, मानसिक कार्यक्षमता, सर्जनशीलता, मनःशांती, स्मरणशक्ती आणि अंतर्ज्ञानाच्या क्षमतांचाही परिपूर्ण विकास साधला जातो.

**आरोग्य म्हणजे काय?**

आरोग्याच्या अनेक परिभाषा आहेत, परंतु जागतिक आरोग्य संघटनेच्या घटनेत नोंदवण्यात आलेली व जगात सर्वत्र वापरली जाणारी अशी आरोग्याची आधुनिक परिभाषा १९ ते २२ जून १९४६ मध्ये भरलेल्या आंतरराष्ट्रीय आरोग्य परिषदेने ६१ प्रतिनिधी देशांच्या संमतीने मान्य केली. (संदर्भ- जागतिक आरोग्य संघटनेचा अधिकृत अहवाल २, पृष्ठ क्र. १०० चा ) या परिभाषेनुसार आरोग्य म्हणजे केवळ शारिरीक रोग व दुर्बलता नसणे नसून आरोग्य म्हणजे- व्यक्तीची संपूर्ण शारीरिक, मानसिक तसेच सामाजिक स्तरावरील निरामय स्थिती.'

**युवापिढीसाठी योगाभ्यासाचे महत्त्व :**

निरोगी जीवनशैलीचे आचरण करण्यास प्रोत्साहन देणारे शास्त्र व निरामय आयुष्य जगण्याची कला म्हणजे योगसाधना, जी तंदुरूस्त आणि आजारपणापासून दूर राहू इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी आहे. वास्तविकपणे योगशास्त्र ही एक अशी सहजसुंदर कला आहे जीच्या माध्यमातून व्यक्ती आपल्यातील आंतरिक कौशल्ये आणि आत्मविश्वास वाढवून आरोग्यसंपन्न जीवनमान प्राप्त करू शकते. त्यामुळे योगशास्त्रातील सर्व सूत्रांचा अंगिकार करणे म्हणजे एकाप्रकारे आपल्या जीवनशैलीत परिपूर्ण बदल घडवणे होय.

**सध्याच्या स्पर्धात्मक युगात तरूणवर्गाला नोकरी शिक्षण व इतरही बाबतीत अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते आहे. योगाभ्यासाच्या सहजसोप्या पध्दतींच्या नियमित सरावातून प्रत्येक युवा स्वतःच्या शारीरीक, मानसिक, बौध्दिक व सामाजिक क्षमतांचा विकास करून दैनंदिन जीवनातील समस्या, ताणतणाव इ. वर मात करू शकण्यात यशस्वी होऊ शकतो. योगाच्या सरावामुळे युवकांच्या व्यक्तिमत्वातील चांगल्या पैलूंचा विकास होतो.**

लोकसंख्येच्या बाबतीत १२५ कोटीहून अधिक लोकसंख्या असणारा भारत एक मोठा देश आहे. देशाचा विकास हा देशातील नागरिकांच्या आरोग्यावर अवलंबून असतो. नागरिकांचे आरोग्य जर कमकुवत असेल तर देशाचा विकास मंदावतो. भारताच्या बाबतीत एकूण लोकसंख्येत सर्वाधिक लोक तरूण वर्गात मोडतात. ही तरूण पिढीच भारताच्या सर्वांगिण विकासाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे जर युवा पिढीचे आरोग्य चांगले नसेल तर ही बाब देशाच्या प्रगतीला बाधक ठरते. सशक्त, कार्यक्षम व उत्साही युवापिढीला त्यांचे आयुरारोग्य जपण्यासाठी योगसाधनेची नितांत आवश्यकता आहे. आजच्या घडीला जगभरातील युवापिढी त्यांच्या आरोग्यविषयक अनेक समस्यांवर प्रभावी उपाय म्हणून योगशास्त्राचा आधार घेत आहे. सध्याच्या स्पर्धात्मक युगात तरूणवर्गाला नोकरी शिक्षण व इतरही बाबतीत अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते आहे. योगाभ्यासाच्या सहजसोप्या पध्दतींच्या नियमित सरावातून प्रत्येक युवा स्वतःच्या शारिरीक, मानसिक, बौध्दिक व सामाजिक क्षमतांचा विकास करून दैनंदिन जीवनातील समस्या, ताणतणाव इ. वर मात करू शकण्यात यशस्वी होऊ शकतो. योगाच्या सरावामुळे युवकांच्या व्यक्तिमत्वातील चांगल्या पैलूंचा विकास होतो. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर योगाच्या अंगिकारातून युवा पिढीच्या संपूर्ण जीवनशैलीत तसेच एकूणच व्यक्तिमत्वात अमूलाग्र बदल घडून येऊन शांत संयमी, विचारी व स्थितप्रज्ञ असे योगी गुण त्यांना प्राप्त होतात. अशी शारिरीक व मानसिकदृष्ट्या सशक्त युवापिढी देशाची खरी मानवसंपत्ती ठरते.

योग हे मूलत: एक आध्यात्मिक विज्ञान व निरामय आयुष्य जगण्याचे शास्त्र आहे. योगशास्त्राच्या नियमित सरावातून विविध आजार तसेच रोगांना प्रतिबंध घालता येतो. त्याबरोबरच चांगले आरोग्य अबाधित राहिल अशी जीवनशैलीही सहज अंगिकारता येते. योगसाधनेच्या परिपूर्ण आचरणातून जीवनाच्या

प्रत्येक बाबतीत समतोल साधता येतो व आपल्या दैनंदिन आयुष्यावरही सकारात्मक प्रभाव दिसून येतो. नियमित योगसाधनेमुळे व्यक्तीच्या वागणूकीसह त्याचे आचारविचार, सामंजस्य व जीवनाबाबतच्या एकूण दृष्टीकोनातही साधकबाधक विवेकीवृत्तीचा अंतर्भाव वाढीस लागतो. तसेच व्यक्तीचे त्याच्या कुटुंबियांशी, आसपासच्या लोकांशी, काम व व्यवसायाशी संबंधित लोकांशी असलेले परस्पर संबंध सुधारण्यास मदत होते. योगाचे उपचारात्मक लाभ देखील जगभरातील अनेक वैज्ञानिक संशोधनाद्वारे सप्रमाण सिध्द झाले आहेत. आज, शारीरिक आणि मानसिक विकार असलेल्या व जीवनशैलीशी संबंधित विकारांच्या प्रतिबंधात्मक उपचारपध्दतीत योगसाधनेला अनन्यसाधारण महत्व आहे.

**योगावरील संशोधन:**

वैद्यकिय प्रयोगांतून हे सप्रमाण सिध्द झाले आहे की, विविध मानसिक आणि जीवनशैली संबंधित विकारांच्या प्रभावी उपचारांत योगशास्त्र महत्वाची भूमिका बजावते. असंक्रमणीय रोगांच्या उपचारांसाठी कोणतेही दुष्परिणाम नसलेली चिकित्सापध्दती म्हणून योगिक उपचारपध्दतीकडे पाहिले जाते. दैनंदिन जीवनशैलीत काही सकारात्मक बदल स्वीकारून अनेक प्रकारच्या रोगांवर नियंत्रण मिळवता येते. योगिकपध्दती जसे, सूर्यनमस्कार, प्राणायाम, ध्यान, शत्कर्म इ.ना निसर्गोपचारातील उपवास पध्दती, आहार पध्दती, जल चिकित्सा, मसाज, इ.ची जोड देऊन व्यक्ती निश्चितपणे रोगमुक्त, निरोगी आणि सुखी जीवन जगू शकते.

आजकाल युवापिढीला उच्च रक्तदाब, हृदयरोग, मधुमेह, तणाव, चिंता, अनिद्रा इत्यादि सारख्या जीवनशैलीशी निगडीत समस्यांनी घेरले आहे. या संदर्भात करण्यात आलेल्या एका अभ्यासातून हे सिध्द झाले आहे नियमित योगसाधनेतून हृदयरोगासारख्या व्याधींवर पूर्णपणे नियंत्रण मिळवता येते. बायपास सर्जरी एन्जिओप्लास्टी सारखे क्लिष्ट उपाय टाळूनही योगोपचारातून हृदयरोग बरा करता येतो. योगिक जीवनशैली कोणालाही सहज स्वीकारता येण्यासारखी असून उच्च रक्तदाब, हृदयरोग तसेच धमन्यांचे विकार असलेल्या रूग्णांसाठी इतर आधुनिक चिकित्सा पध्दतींच्या तुलनेने योगचिकित्सा अधिक प्रभावी व कमी खर्चिक आहे.

युवकांच्या आरोग्यात आहाराला

**नियमित योगसाधनेतून हृदयरोगासारख्या व्याधींवर पूर्णपणे नियंत्रण मिळवता येते. बायपास सर्जरी एन्जिओप्लास्टी सारखे क्लिष्ट उपाय टाळूनही योगोपचारातून हृदयरोग बरा करता येतो. योगिक जीवनशैली कोणालाही सहज स्वीकारता येण्यासारखी असून उच्च रक्तदाब, हृदयरोग तसेच धमन्यांचे विकार असलेल्या रूग्णांसाठी इतर आधुनिक चिकित्सा पध्दतींच्या तुलनेने योगचिकित्सा अधिक प्रभावी व कमी खर्चिक आहे.**

अनन्या साधारण महत्त्व आहे. 'योगा: निरोगी व ताणमुक्त जीवन' या संशोधन प्रबंधात आचार्य आणि रस्तोगी यांनी असे निरिक्षण नोंदवले की, मोठया प्रमाणात आहाराच्या चुकीच्या सवयींमुळे युवा पिढीला आरोग्यविषक समस्या उद्भवतात. प्रक्रिया केलेले पदार्थ, फास्ट फूड, जंक फूड, उच्च कॅलरी आहार तसेच धूम्रपान, दारू व, ड्रग्सचे व्यसन आणि योग्य विश्रांती व व्यायामाचा अभाव इ.मुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, संधिवात, पाठदुखी तसेच मानसिक आजारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. असेही निरिक्षण मांडण्यात आले आहे की, मोठ्या संख्येने लोक उदासीनता, स्किझोफ्रेनिया, अल्कोहोल आणि ड्रग्सचा वापर संबंधिच्या विकारांनी ग्रस्त आहेत. योगिक उपचारांसह आसन, प्राणायाम, शक्तकर्म, सूर्य नमस्कार, आणि ध्यान यासारख्या विविध पद्धतींचा अवलंब करून शरीर आणि मनाचे प्रभावी संतुलन प्राप्त करून अनेक दुर्धर व्याधींवर मात करता येणे शक्य आहे.

म्हणूनच युवापिढीला योगसाधनेच्या माध्यमातून त्यांच्या आरोग्याच्या समस्यांवर प्रभावीपणे मात करून उत्तम कार्यक्षमता व निरामय आरोग्यासह देशाच्या प्रगतीत आपले योगदान देणे शक्य आहे. योगसाधनेवर आधारित सकारात्मक जीवनशैलीचा अवलंब केल्याने युवकांच्या सकारात्मक वृत्तींचा विकास होण्यास मदत होते. म्हणूनच युवापिढीने, शरीर आणि मन उत्तम प्रकारे निरोगी व संतुलित राखण्यासाठी विविध योगिक पध्दतींच्या नियमित सराव करणे अतिशय आवश्यक आहे.

■■■

*लेखक डॉ. आचार्य आणि डॉ. रस्तोगी हे नवी दिल्ली येथील सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन योग एन्ड नॅचरोपॅथी, येथे अनुक्रमे संचालक आणि सहाय्यक संचालक आहेत.*

*email:ccryn.goi@gmail.com*

*rrastogi.2009@gmail.com*

# बंडखोरीने ग्रासलेला प्रदेश : युवकांसाठी उपक्रम

रवी पोखर्णा



**अशांत प्रदेशातले युवक, असुरक्षित वातावरणात राहत असतात,हे लक्षात घेऊन,अशा प्रदेशात,विकासात्मक योजना आखणे आणि त्याची अंमलबजावणी करणे यावर केंद्र सरकारने विशेष लक्ष केंद्रित केले. सीपीआय (माओवादी) यांचे प्राबल्य असणाऱ्या ३४ जिल्ह्यांशिवाय भारताच्या ईशान्येकडच्या काही भागात आणि जम्मू काश्मीरलाही बंडखोरीच्या झळा बसत आहेत.या तीन अशांत भागातल्या युवकांसाठी, सरकार राबवत असलेल्या योजनांची विस्तृत माहिती या लेखात देण्यात आली आहे.**

पन्नास वर्षांपूर्वी, १८ मे १९६७ या घातक दिवशी, भूमिहीनांना जमिनीचे फेरवाटप करण्यासाठी सशस्त्र संघर्ष करण्याच्या नक्सलबारी या खेड्यातल्या काही जणांनी सुचवलेल्या मार्गाला, पश्चिम बंगालमधल्या सिलिगुडी किसान सभेने आपला पाठिंबा जाहीर केला. सध्या ज्याचा नक्षली चळवळ म्हणून उल्लेख केला जातो तो नक्षलवाद गेल्या काही वर्षात देशाच्या इतर राज्यात पसरला आणि क्रूरता आणि हिंसाचाराचे थैमान घालत राहिला.

अशा बंडखोरीने ग्रासलेल्या, अशांत प्रदेशातले युवक, असुरक्षित वातावरणात राहत असतात, हे लक्षात घेऊन, अशा प्रदेशात, विकासात्मक योजना आखणे आणि त्याची अंमलबजावणी करणे यावर केंद्र सरकारने विशेष लक्ष केंद्रित केले. सीपीआय (माओवादी) यांचे प्राबल्य असणाऱ्या ३४ जिल्ह्यांशिवाय भारताच्या ईशान्येकडच्या काही भागात आणि जम्मू काश्मीरलाही बंडखोरीच्या झळा बसत आहेत.या तीन अशांत भागातल्या युवकांसाठी, सरकार राबवत असलेल्या योजनांची विस्तृत माहिती या लेखात देण्यात आली आहे.

**अ - माओवादी कम्युनिस्टांचे प्राबल्य असणाऱ्या भागातल्या युवकांसाठी सरकारच्या योजना**

नक्षल प्रश्नाचे गांभीर्य सरकारने खूप आधी जाणले असले तरी याचा प्रभावी आणि समग्र मुकाबला करण्यासाठी गृह मंत्रालयाने २००९ मध्ये यासाठी लेफ्ट विंग एक्सट्रॅमिस्ट एल डब्लू इ तुकडी स्थापन केली. या भागात, विकासात्मक कामे आणि उपक्रमाबाबत राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध विभागात समन्वयाचे कामही या तुकडीकडे सोपवण्यात आले. परिणामी गेल्या काही वर्षात हा प्रश्न हाताळण्यासाठी अधिक एकीकृत, निर्णायक आणि खंबीर धोरण विकसित झाले आहे. नव्या एकीकृत कृती आराखड्यानुसार, आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्याबरोबरच, हिंसाचाराचा कठोर मुकाबला करण्याचे सरकारने ठरवले आहे.नक्षल विरोधातल्या लढ्यात अल्पावधीचे उद्दिष्ट गाठण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. जिल्हावार विकासाचा दृष्टिकोन बदलून आता विभाग स्तरावर विकासाचा आराखडा आखण्यात आला आहे. नक्षलवादाचे प्राबल्य असणाऱ्या जिल्ह्यात विकास

केंद्रे उभारण्याचेही नियोजन आहे. नक्षलग्रस्त भागात विकासाला चालना देण्याच्या आराखड्यानुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी,माओवाद्यांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या दंतेवाडाला भेट दिली. २४००० कोटी रुपयांच्या विकासात्मक प्रकल्पांचे उदघाटन करताना, खांद्यावर बंदुका नव्हे तर नांगर असेल तरच विकास होऊ शकतो असे, पंतप्रधान म्हणाले. यामुळे प्रत्येकजण देशाच्या मुख्य प्रवाहात येईल.हिंसाचाराला भविष्य नसते.शांततापूर्ण उपाय हेच भविष्य आहे, असे पंतप्रधान म्हणतात.याच अनुषंगाने सरकारने, नक्षलग्रस्त भागातल्या युवकांसाठी,अनेक उपाययोजना आखल्या आहेत.

नक्षलप्रभावीत भागात, युवकांसाठी, शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या क्षेत्रात, सरकारने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. एका बाजूने सरकारने, या भागात आधीपासून अस्तित्वात असलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला गती दिली आहे तर दुसऱ्या बाजूने,विशिष्ट गरजा भागवण्यासाठी, अनेक उपाययोजना हाती घेतल्या आहेत. अशिक्षित आणि बेरोजगार युवक हे या बंडखोरांचे अगदी सहजसाध्य सावज ठरू शकतात हे लक्षात घेऊन या भागातल्या युवकांना शिक्षण देण्यासाठी सरकारने एकात्मिक आराखडा तयार केला आहे. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत, सर्व मुलांना निवासी शाळा सुविधा पुरवण्यात आली आहे. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांमार्फत, परवडणारे आणि दर्जेदार प्राथमिक शिक्षण मुलींना दिले जात आहे. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाअंतर्गत माध्यमिक शिक्षणावर लक्ष पुरवले जात आहे. केंद्रीय विद्यालय आणि नवोदय शाळा उघडल्या जात आहेत.




**नक्षलवादाचा जोर असलेल्या बस्तर या भागाने २०१६ या वर्षात आयआयटीला २७ विद्यार्थी पाठवले. 'नक्षलवादाचा प्रभाव असलेल्या ३४ जिल्ह्यांत कौशल्य विकास' या योजनेअंतर्गत, नऊ राज्यातल्या ३४ जिल्ह्यांपैकी प्रत्येक जिल्ह्यात एक आय टी आय आणि दोन कौशल्य विकास केंद्रे कार्यान्वित करण्यासाठी कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय प्रयत्न करत आहे.**

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेद्वारे, नक्षल प्रभावित ३४ जिल्ह्यांपैकी प्रत्येक जिल्ह्यात १६० युवकांना कौशल्य विकास मंत्रालय, प्रशिक्षण देत आहे. राज्य सरकारही युवकांसाठी,सकारात्मक वातावरण आणि संधी निर्माण करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावत आहेत. छत्तीसगड सरकारने या भागात उपजीविकाविषयक महाविद्यालये सुरु केली आहेत. याशिवाय, प्रयास या आपल्या संस्थेमार्फत, स्पर्धात्मक परीक्षांसाठी युवकांना घडवले जात आहे. पाचही जिल्ह्यात नक्षलवादाचा जोर असलेल्या बस्तर या भागाने २०१६ या वर्षात आयआयटीला २७ विद्यार्थी पाठवले. 'नक्षलवादाचा प्रभाव असलेल्या ३४ जिल्ह्यात कौशल्य विकास' या योजनेअंतर्गत, नऊ राज्यातल्या ३४ जिल्ह्यापैकी प्रत्येक जिल्ह्यात एक आय टी आय आणि दोन कौशल्य विकास केंद्रे कार्यान्वित करण्यासाठी कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय प्रयत्न करत आहे.

झारखंड पोलिसांनी, नक्षलप्रभावीत पलामू या भागातल्या बालकांसाठी,अतिशय वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. 'तारे जमी पर' असे या उपक्रमाचे नाव असून पोलीस, त्याअंतर्गत, पुस्तके, वह्या, कपडे,बूट,अशा वस्तू पलामू जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या दालटोनगंज इथल्या रहिवाश्यांकडून गोळा करतात आणि वंचित स्थानिक मुलांना त्याचे फेर वाटप करतात.

कौशल्य विकासासह घेतलेले शिक्षण हे रोजगारासाठी आणि चरितार्थासाठीच्या संधींकरिता

पोषक असून त्यामुळे या भागातला युवक अशा हिंसक चळवळीकडे वळण्यापासून लांब राहतो हे केंद्र आणि राज्यसरकारांनी जाणले आहे. हा आराखडा अशा पद्धतीने योग्य रीतीने अमलात आणला जात आहे.

**ब- ईशान्येकडील बंडखोरीने ग्रासलेल्या भागातल्या युवकांसाठी सरकारच्या योजना**

भारताचा ईशान्य भाग हा भौगोलिक धोरणात्मक दृष्ट्या देशासाठी महत्वाचा आहे. दुर्दैवाने देशाच्या स्वातंत्र्यापासून या भागाला बंडखोरी, अस्थैर्य, आणि सामाजिक अशांततेने घेरले आहे.या पार्श्वभूमीवर ईशान्येकडच्या अशांत भागातल्या युवकांसाठी सरकारने अनेक उपाययोजना हाती घेतल्या आहेत. ईशान्येकडच्या भागाच्या विकासासाठीचे मंत्रालय,ईशान्य भागासाठीच्या योजनांसंदर्भात केन्द्र सरकारच्या संबंधित विभागांशी समन्वय साधत आहे. ईशान्येकडच्या काही राज्यात, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली, सुकाणू समिती आणि औद्योगिक प्रतिनिधींसह कौशल्य मंत्रालयाने राज्य कौशल्य विकास अभियान राबवण्याचे ठरवले आहे. सरकारी आय टी आय आणि खाजगी एजन्सीच्या मदतीने युवकांना प्रशिक्षित करण्यासाठी हे अभियान कार्यरत आहे.याशिवाय युवकांना कौशल्य प्रदान करण्यासाठी, राज्य उपजीविका अभियान आणि (राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान) एनयुएलएम योजनाही राबवण्यात येत आहे.

**प्रशिक्षणासाठी ही क्षेत्रे निवडण्यात आली आहेत: -**

- **आतिथ्य -** (पाक कला, अन्न आणि पेये, पेस्ट्री)
- **पर्यटन -** सहल संचालक,हॉटेल्स, राहण्याची घरगुती सोय, टॅक्सी, पर्यटन स्थळे इत्यादी
- सुश्रुषा, निम वैद्यकीय
- तंदुरुस्ती आणि सौंदर्य
- फॅशन डिझायनींग आणि कपडे, हातमाग विणकर
- **अत्यावश्यक तंत्रज्ञान -** इलेक्ट्रिशियन, नळ जोडणी आणि संबंधित कामे, ए सी दुरुस्त करणे, फ्रीझ, मोबाइल दुरुस्ती इत्यादी

**ईशान्येकडच्या राज्यात स्टार्ट अप्सना प्रोत्साहन मिळावे यासाठी ईशान्येकडच्या विभागासाठीचे मंत्रालय आणि नॉर्थ ईस्टर्न डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, १०० कोटी भांडवल असलेला निधी उभारत आहेत. अन्न प्रक्रिया, आरोग्य, पर्यटन, किरकोळ क्षेत्र, यासारख्या क्षेत्रातल्या स्टार्ट अप्सना या निधीमुळे चालना मिळेल. एस एस ए आणि रुसा अर्थात राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान यामार्फत अनेक शैक्षणिक सुधारणा सुरु करण्यात आल्या आहेत.**

- **ऑटोमोबाईल -** फिटर,टर्नर,जोडणी करणे
- कोणत्याही क्षेत्रात रोजगार मिळवण्यासाठी आवश्यक संवाद आणि इतर कौशल्य
- किरकोळ विक्री
- **हवाई क्षेत्र -** विमान कर्मचारी,हवाई सुंदरी,

याशिवाय ईशान्येकडच्या राज्यात स्टार्ट अप्सना प्रोत्साहन मिळावे यासाठी ईशान्येकडच्या विभागासाठीचे मंत्रालय आणि नॉर्थ ईस्टर्न डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, १०० कोटी भांडवल असलेला निधी उभारत आहेत. अन्न प्रक्रिया, आरोग्य, पर्यटन, किरकोळ क्षेत्र, यासारख्या क्षेत्रातल्या स्टार्ट अप्सना या निधीमुळे चालना मिळेल. एस एस ए आणि रुसा अर्थात राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान यामार्फत अनेक शैक्षणिक सुधारणा सुरु करण्यात आल्या आहेत.

ईशान्य विभागाच्या विकासासाठीचे मंत्रालय, या भागातल्या औद्योगिक आणि रोजगार निर्मिती करणाऱ्या अन्य कारखान्यांना अनुदानाच्या रूपाने प्रोत्साहन देत आहे.याच्या अंमलबजावणीसाठी,या मंत्रालयाने नॉर्थ ईस्टर्न डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशनला केलेल्या मदतीमुळे अशा कारखान्यांना उच्च व्याजदर अनुदान घटकामुळे अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

**क - जम्मू काश्मीर मधल्या दहशतवादी गटांमुळे बाधित झालेल्या युवकांसाठी सरकारी योजना**

जम्मू काश्मीरमधल्या तीन दशकांच्या अशांततेची, मूळे भारताच्या स्वातंत्र्याच्या आधीच्या काळात आहेत. इथल्या युवकांना कौशल्य प्रदान करण्यासाठी आणि त्यांना उपजीविकेची संधी उपलब्ध करून देण्यासाठी, केंद्र सरकार आणि राज्य सरकार सध्या एकत्रित काम करत आहेत.

**यापैकी लोकप्रिय काही उपाययोजना या आहेत:-**

**उडान -** जम्मू काश्मीरसाठी स्पेशल इंडस्ट्री इनिशिएटिव्ह (एस आय आय) याची अंमलबजावणी राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाकडून केली जात असून त्याला गृह मंत्रालयाचे आर्थिक

पाठबळ लाभले आहे. इथल्या युवकांना कॉर्पोरेट संधी मिळाव्यात आणि या राज्यात असलेल्या कौशल्याचा देशाला लाभ व्हावा हा याचा उद्देश आहे.या योजनेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला असून त्याचा लक्षणीय उत्तम परिणाम जाणवत आहे.

**सद्भावना -** हे आणखी एक अतिशय यशस्वी अभियान आहे सद्भावना आणि सैन्यदल हे अभियान चालवत आहे.या अभियानाअंतर्गत सैन्यदल, जम्मू काश्मीरच्या युवकांसाठी अनेक महत्वाचे कार्यक्रम राबवते. शैक्षणिक उपक्रमाअंतर्गत, सैन्यदल सदिच्छा शाळा, सुमारे एक लाखांहुन अधिक विद्यार्थ्यांना माध्यमिक स्तरावरचे शिक्षण पुरवत आहेत. राज्यात, लष्करामार्फत चालवल्या जाणाऱ्या शाळांत सध्या १४००० हुन अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत आणि राज्यातली १००० पेक्षा जास्त मुले लष्कराच्या स्कॉलरशिप द्वारे राज्याबाहेरच्या संस्थात अभ्यास करत आहेत. सद्भावना या उपक्रमाअंतर्गत सैन्यदल, राष्ट्रीय एकता सहल आयोजित करते.यामध्ये विद्यार्थ्यांना देशाच्या इतर राज्यांना भेट देण्याची संधी मिळते आणि तिथल्या संस्कृतीचा परिचय करून घेता येतो. देशाचे सुजाण नागरिक बनण्याच्या प्रेरणेने भारून हे विद्यार्थी परततात. या योजनेद्वारे २०० सहली आयोजित करण्यात आल्या ,त्याचा आतापर्यंत ५००० पेक्षा जास्त लोकांना लाभ झाला. सैन्यदल, या राज्यात पात्र आणि इच्छुक उमेदवारांना व्यावहारिक कौशल्य प्रदान करण्यासाठी,व्यावसायिक प्रशिक्षण केन्द्रे आणि महिला सबलीकरण केंद्रेही चालवते. राज्याच्या दुर्गम भागात राहणाऱ्या जनतेचे जीवनमान सुधारण्यासाठी, सैन्यदलाच्या स्वतःच्या निधीतून जनस्नेही प्रकल्प राबवले जातात.

जम्मू काश्मीर मधे आणखी महत्वाचा आणि अतिशय उपयुक्त

**युवकांना मार्गदर्शन करण्यासाठी सैन्यदल, प्रशिक्षणासाठीचा आपला भागीदार, सेन्टर फॉर सोशल रिस्पॉन्सिबीलीटी अँड लर्निंग आणि पेट्रोनेट एल एन जी यांच्या सहकार्याने काश्मीर सुपर ४० हा उपक्रम चालवत आहे. यावर्षी तर राज्यातल्या २६ मुले आणि २ मुलींनी आयआयटी - जेईई मुख्य परीक्षा २०१७ मध्ये यश मिळवून सुपर ४० चे आधीचे सर्व विक्रम मोडीत काढले.सैन्यदलाच्या, काश्मीर सुपर ४० चा ७८ टक्के निकाल ही देशातल्या आयआयटी मार्गदर्शन केंद्राची सर्वोत्कृष्ट कामगिरी आहे.**

असा उपक्रम फक्त सैन्यदलच राबवते.अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेसाठी, जम्मू काश्मीरच्या युवकांना मार्गदर्शन करण्यासाठी सैन्यदल, प्रशिक्षणासाठीचा आपला भागीदार, सेन्टर फॉर सोशल रिस्पॉन्सिबीलीटी अँड लर्निंग आणि पेट्रोनेट एल एन जी यांच्या सहकार्याने काश्मीर सुपर ४० हा उपक्रम चालवत आहे. यावर्षी तर राज्यातल्या २६ मुले आणि २ मुलींनी आयआयटी - जेईई मुख्य परीक्षा २०१७ मध्ये यश मिळवून सुपर ४० चे आधीचे सर्व विक्रम मोडीत काढले.सैन्यदलाच्या, काश्मीर सुपर ४० चा ७८ टक्के निकाल ही देशातल्या आयआयटी मार्गदर्शन केंद्राची सर्वोत्कृष्ट कामगिरी आहे.

**हिमायत -** ग्रामीण विकास मंत्रालयामार्फत चालवल्या जाणाऱ्या केंद्र सरकारच्या दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेतून, जम्मू काश्मीर मधल्या १.२४ लाख स्थानिक युवकांना रोजगारकेंद्री व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमाद्वारे प्रशिक्षण देण्याचे प्रयत्न आहेत.

बंडखोरीने ग्रासलेल्या भागातल्या युवकांच्या, सशक्तीकरणासाठी, ज्यायोगे हे युवक स्वतःच्या भागाच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात योगदान देण्यासाठी प्रेरित व्हावेत यासाठी, केंद्र आणि राज्य सरकार समन्वयाने काम करत आहेत.

■■■

*लेखक रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या दिल्ली कार्यालयाचे प्रमुख आहेत.*
*email:ravi.pokharna@gmail.com*

# सामाजिक प्रगती : आर्थिक वाढीच्या पलीकडचा विकास

नताशा भास्कर झा



**नोबेल पुरस्कार विजेते अमर्त्य सेन यांनी सातत्याने ही भूमिका मांडली आहे की वाढीचा दर हा आर्थिक प्रगती मोजण्याचा अत्यंत मूर्ख आणि बहिष्कृत असा मार्ग आहे. सेन आणि बेल्जियम मध्ये जन्मलेले भारतीय अर्थतज्ज्ञ जीन दिएझ यांनी १९९५ मध्येच असा इशारा देऊन ठेवला आहे की वाढीला चालना देणाऱ्या सुधारणा महत्वाच्या असल्या तरीही आत्यंतिक गरिबांचे राहणीमान सुधारण्यासाठी पुरेशा नाहीत, जात आणि लिंगभेदाची उतरंड उध्वस्त करून रोजगार निर्मितीची तर गोष्टच दूर.**

जेव्हा विद्यमान सरकारने सत्ता हाती घेतली तेव्हा अगणित अपेक्षांची अंतरप्रवाही कल्पना ही उत्तम प्रशासन हीच होती. या अपेक्षांमध्ये महागाई आणि किंमत वाढ, दैनंदिन व्यवहारामधील भ्रष्टाचार, निकटवर्तीयांचा भांडवलवाद अशा ज्वलंत प्रश्नांचा समावेश होता. अर्थमंत्र्यांनी आपल्या २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय भाषणात सांगितल्याप्रमाणे सरकारचे उद्‌दिष्ट खालीलप्रमाणे आहे

-प्रशासनाकडून तारतम्य ठेवून धोरण आणि प्रणाली आधारित प्रशासन

-पक्षपातीपणापासून लांब जात पारदर्शकता आणि निर्णय प्रक्रियेत वस्तुनिष्ठता

-सरसकट आणि ढिसाळ हक्कदारीकडून लक्ष्यीत वितरणाकडे

--अनौपचारिक अर्थव्यवस्थेकडून औपचारिक अर्थव्यवस्था

या परिप्रेक्ष्यात गेल्या काही वर्षांतील भारताच्या विकासाच्या मार्गक्रमणाचे विश्लेषण करावे लागेल. विकास म्हणजे नेमके काय? आपला विकास समावेशक आणि समन्यायी आहे का? विकासाचे धोरण अधिक समग्र आणि सर्वसमावेशक होण्यासाठी आपल्याला त्यावर पुन्हा काम करण्याची गरज आहे का? स्पष्टपणे सार्वजनिक गुंतवणुकीची दिशा आणि दर्जावर बरेच काही अवलंबून आहे.

नोबेल पुरस्कार विजेते अमर्त्य सेन यांनी सातत्याने ही भूमिका मांडली आहे की वाढीचा दर हा आर्थिक प्रगती मोजण्याचा अत्यंत मूर्ख आणि बहिष्कृत असा मार्ग आहे. सेन आणि बेल्जियम मध्ये जन्मलेले भारतीय अर्थतज्ज्ञ जीन दिएझ यांनी १९९५ मध्येच असा इशारा देऊन ठेवला आहे की वाढीला चालना देणाऱ्या सुधारणा महत्वाच्या असल्या तरीही आत्यंतिक गरिबांचे राहणीमान सुधारण्यासाठी पुरेशा नाहीत, जात आणि लिंगभेदाची उतरंड उध्वस्त करून रोजगार निर्मितीची तर गोष्टच दूर. राहणीमान सुधारण्यासाठी शिक्षण आणि आरोग्याबाबत सार्वजनिक धोरणात आमुलाग्र बदलाची जोड द्यायला हवी, असे त्यांनी लिहिले आहे.

मानवी विकास प्रत्येकापर्यंत पोहोचण्यासाठी विकास समावेशक

असायला हवा आणि एकमेकांना पाठींबा देणारे खालील चार खांब असले पाहिजेत- रोजगारप्रणीत विकास धोरणावर विचार करणे, आर्थिक सामावेशकतेत वृद्धी, मानवी विकासाच्या प्राधान्यमध्ये(शिक्षण आणि आरोग्य) गुंतवणूक आणि उच्च परिणाम घडवणाऱ्या बहुमितीय उपाययोजना.

मानवी विकास हा प्रत्येक नागरिकाची निरोगी व शिक्षित नागरिक म्हणून त्याच्या संपूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्याचे सामर्थ्य सुचवतो. युएनडीपी मानवी विकास अहवालात मानवी विकास निर्देशांकाच्या आधारावर देशांचे मूल्यमापन केले जाते (ज्यात पुढील घटकांचा उपयोग करून शिक्षण, आरोग्य आणि उत्पन्न यांचा नकाशा तयार केला जातो: शिक्षणासाठी लहान मुलांसाठी शाळेची अपेक्षित वर्षे आणि प्रौढांसाठी सरासरी शाळेची वर्षे, आरोग्यासाठी मुलांचे आयुर्मान आणि उत्पन्नासाठी एकूण राष्ट्रीय उत्पन्न), त्यात मध्यम मानवी विकास निर्देशांक वर्गवारीत भारताला १८८ देशांच्या यादीत १३० वे स्थान दिले आहे. भूतान १३२ तर बांगलादेश १४२ व्या स्थानी आहे. श्रीलंका आणि चीनमध्ये अत्यंत उच्च मानवी विकास निर्देशांक असून त्यांचे स्थान अनुक्रमे ७३ वे आणि ९० वे आहे. नेपाळ १४५ तर पाकिस्तान १४७ व्या स्थानी असून निम्न मानवी विकास निर्देशांक वर्गावारीत ते देश मोडतात. मानवी विकासात एक उदाहरण म्हणून दाखवण्यापासून भारत कित्येक मैल दूर आहे.

भारताच्या अत्युच्च विकासदराची चर्चा देशातील असमानता आणि गरिबीच्या उच्च दराला लपवणारी आहे. क्रेडीट सुईस्से ग्लोबल वेल्थ डेटाबुक २०१४ नुसार उर्वरित जगाच्या विपरीत देशातील एक टक्का श्रीमंतांच्या संपत्तीचा वाटा वाढत आहे आणि आता त्यांच्याकडे देशातील जवळपास निम्मी संपत्ती आहे. २००० पासून सर्वोच्च दहा लोकांच्या संपत्तीचा वाटा एक दशांशाने वाढला आहे.

**मानवी विकास निर्देशांक वर्गवारीत भारताला १८८ देशांच्या यादीत १३० वे स्थान दिले आहे. भूतान १३२ तर बांगलादेश १४२ व्या स्थानी आहे. श्रीलंका आणि चीनमध्ये अत्यंत उच्च मानवी विकास निर्देशांक असून त्यांचे स्थान अनुक्रमे ७३ वे आणि ९० वे आहे. नेपाळ १४५ तर पाकिस्तान १४७ व्या स्थानी असून निम्न मानवी विकास निर्देशांक वर्गावारीत ते देश मोडतात. मानवी विकासात एक उदाहरण म्हणून दाखवण्यापासून भारत कित्येक मैल दूर आहे.**

यावरून हे स्पष्ट होते की, मानवी विकासातील गुंतवणूकीशिवाय विकास हा अशाश्वत आणि अनैतिक आहे. शिक्षणासाठी नावनोंदणी करण्याचे प्रमाण वाढत असले तरी असर या संस्थेच्या वार्षिक अहवालात शिक्षणाचा परिणाम प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यामध्येही अजूनही दिसलेला नाही, असे चित्र स्पष्ट झाले आहे. स्वच्छता आणि आरोग्य सेवांकडे लक्ष देण्याची गरज आहे. सरकारने यासाठी योजना सुरु केल्या असल्या तरीही परिणामांच्या संदर्भात अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे.

**शिक्षण**

१० लाख ४० हजार शाळा, ४५,००० महाविद्यालये आणि ७०० हून अधिक विद्यापीठे असलेला भारत जगातील सर्वात मोठा देश असूनही एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या फक्त ४ टक्के खर्च शिक्षणावर करतो. भारत ३० कोटी विद्यार्थ्यांना शिक्षण पुरवतो जे देशाला मानवी भांडवलाचा लाभ मिळवून देण्यात मदत करतात.

धोरण ठरवणे आणि शिक्षणातील सुधारणांच्या अंमलबजावणीतील राज्यांची मध्यवर्ती भूमिका लक्षात घेऊन मनुष्यबळविकास मंत्रालय शिक्षणावरील केंद्रीय सल्लागार मंडळाची (CABE) नियमित बैठक घेत असून हे मंडळ संयुक्त व शिक्षणावरील सर्वोच्च सल्लागार मंडळ आहे.

CABEच्या माध्यमातून केंद्र व राज्ये यांच्यात सहमतीने सर्व सुधारणा उपाययोजना केल्या जातात.

**प्राथमिक व दुय्यम शिक्षण**

सध्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क देणारा कायदा (RTE), सर्व शिक्षा अभियान (SSA), राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (RMSA), शाळांमधून माहिती संप्रेषण तंत्रज्ञान, शिक्षक शिक्षणावरील केंद्र पुरस्कृत योजना (CSSTE), शाळा सिद्धी, राष्ट्रीय अविष्कार अभियान आदि राबवण्यात येत आहेत ज्यामध्ये प्राथमिक आणि दुय्यम शिक्षणातील सुधारणांची परिकल्पना केली जाते.

**उच्च शिक्षण**

देशातील उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, जागतिक शैक्षणिक महाजाल पुढाकार, संशोधन, नाविन्यपूर्ण उपक्रम व तंत्रज्ञान परिणाम, तांत्रिक शिक्षण दर्जा सुधारणा कार्यक्रम, शिक्षक व शिक्षणावरील पंडित मदनमोहन मालवीय राष्ट्रीय मोहीम, study webs of active Learning for Young Aspiring Minds (SWAYAM), Natiional Digital Library, कॅम्पस कनेक्टिंग कार्यक्रम, उच्चतर अविष्कार अभियान, उन्नत भारत अभियान असे कार्यक्रम अमलात आणले जात आहेत . उच्च आणि तंत्र शिक्षणातील दर्जा सुधारण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून तसेच AICTE कडून विविध पुढाकार घेतले जात आहेत.

स्वंयम हे व्यापक खुले ऑनलाईन अभ्यासक्रम शिकविण्यासाठी आईटी व्यासपीठ असून त्याद्वारे सर्वोत्कृष्ट ऑनलाईन शिक्षण पुरवले जात असून त्यात विषयांचा पल्ला व्यापक असून उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठ यामधून शिकवले जात आहेत आणि देशाच्या अतिदुरवर असलेल्या भागातील विद्यार्थी ते शिक्षण घेऊ शकतात. भारतातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये अभ्यासक्रम शिकवण्यासाठी परदेशी तज्ञांना आणून सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय अनुभवाचा फायदा करून देण्यासाठी भारत सरकारने Global Initiative for Academic Network (GIAN) उपक्रम सुरु केला आहे. राष्ट्रीय डिजिटल लायब्ररी (NDL) हा नुकताच सुरु केलेला उपक्रम असून त्याचा उद्देश्य देशातील सर्व उच्च शिक्षण संस्थांना ऑनलाईन शैक्षणिक स्त्रोत उपलब्ध व्हावेत हा असून त्यासाठी देशातील आणि परदेशातील सर्व डिजिटल लायब्ररी स्त्रोत एकमेकांशी जोडले गेले आहेत. देशातील हे सर्वात मोठे ज्ञान भांडार बनण्याची शक्यता आहे. सध्या NDL कडे भारत आणि परदेशातील मिळून ७० भाषांतील ६४ लाख २३ हजार पुस्तके, नियतकालिके, जर्नल्स, ऑडीओ बुक्स, १८,००० ई जर्नल्सचा साठा असून ३६१७ संस्था जोडल्या गेल्या आहेत, तर ५ लाख ७५ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. दर्जेदार शिक्षण पुरवण्यासाठी महत्वाचे असलेल्या प्राध्यापक आणि वाचनालय स्त्रोतांच्या अपुरा उपलब्धतेवर मात करण्यासाठी हे उपाय योजले आहेत.

**नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात ज्या घोषणा केल्या आहेत त्यांचा रोख युजीसीतील प्रशासकीय आणि शैक्षणिक अधिक स्वायत्ततेला चालना देण्याकडे आणि परिणामांवर आधारित प्रमाणन, प्रतिष्ठा आधारित कार्यक्रम यासाठी सुधारित चौकट, माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला लाभ व स्वंयमच्या माध्यमातून ३५० ऑनलाईन अभ्यासक्रम सुरु करून उच्च शिक्षण संस्थांमध्ये सर्व प्रवेश परीक्षा घेण्यासाठी एक राष्ट्रीय चाचणी संस्था स्थापन करण्याकडे होता.**

उच्च शैक्षणिक संस्थांमधील स्पर्धात्मकता सुधारण्यासाठी national institutional Ranking Framework (NIRF) सुरु केली आहे. नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात ज्या घोषणा केल्या आहेत त्यांचा रोख युजीसीतील प्रशासकीय आणि शैक्षणिक अधिक स्वायत्ततेला चालना देण्याकडे आणि परिणामांवर आधारित प्रमाणन, प्रतिष्ठा आधारित कार्यक्रम यासाठी सुधारित चौकट, माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला लाभ व स्वंयमच्या माध्यमातून ३५० ऑनलाईन अभ्यासक्रम सुरु करून उच्च शिक्षण संस्थांमध्ये सर्व प्रवेश परीक्षा घेण्यासाठी एक राष्ट्रीय चाचणी संस्था स्थापन करण्याकडे होता.

**नवीन शैक्षणिक धोरण**

सध्या नवीन शैक्षणिक धोरण ठरवण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली असून परीक्षा, प्रशासन, नियमन, शिक्षक, प्राध्यापक व शाळांचा दर्जा, साक्षरता आणि जीवनभर शिक्षण, कौशल्य व रोजगारक्षमता, दर्जाची हमी, आंतर्राष्ट्रीयीकरण, संशोधन, अभ्यासक्रम, नाविन्यपूर्ण संशोधन आदीमध्ये अनेक सुधारणा सुचवल्या जाण्याची शक्यता आहे. ज्यामुळे समाजाच्या सर्व थरातील लोकांना दर्जेदार शिक्षण समन्यायी पद्धतीने मिळू शकेल.

आर्थिक वाढ आणि सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षण हाच कळीचा घटक आहे. सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात शिक्षण केवळ सक्षमीकरण आणि सामाजिक न्याय यासाठी आवश्यक घटक म्हणून पाहिले जात नाही तर व्यक्ती आणि राष्ट्रे यांच्या अस्तित्वासाठी प्राथमिक गरज म्हणूनही पाहिले जात आहे.

**आरोग्य**

आरोग्य परिणामांबाबत आमची कामगिरी संमिश्र आहे. जागतिक तुलनेच्या साच्यात भारताने आयुष्मानाच्या बाबतीत वाजवीदृष्ट्या चांगली कामगिरी केली आहे तर मृत्युदर घटवण्यासाठी असामान्य कामगिरी केली आहे. परंतु बालमृत्यू दर, मातृ मृत्यू दर अशा कळीच्या आरोग्य परिणामांबाबत तुलना केली असता आम्हाला खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. शिक्षणाचा अभाव, लिंगभेद, आणि अफाट लोकसंख्या यांचे योगदान आजाराचे प्रमाण वाढण्यात लक्षणीय आहे.

सुरक्षित पिण्याचे पाणी आणि पर्यावरणीय स्वच्छतेचा अभाव, कुपोषण आणि खराब राहणीमान तसेच खबरदारीची आणि गुणकारी उपचार पद्धतीची मर्यादित उपलब्धता यामुळे भारतात आजारांचा बोजा खूप जास्त आहे. तरीसुद्धा, स्वच्छ भारत अभियान, राष्ट्रीय आरोग्य मोहीम, मिशन इंद्रधनुष यासारखे वाढीव लसीकरण उपाय, महिन्याच्या ठराविक दिवशीचे गर्भवती स्त्रियांची काळजी घेणारे मोफत इलाज, तंबाखू नियंत्रण आणि डेंगू प्रतिकार कार्यक्रम हे काही पुढाकार आहेत ज्यांचा उद्देश्य भारतीय वैद्यकीय सुश्रुशा प्रणालीची संपूर्ण पुनर्तपासणी करण्याचा आहे.

२०१७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात काला आजार आणि फिलेरिया कृमींच्या संसर्गामुळे होणारा आजार २०१७ पर्यंत, कुष्ठरोग २०१८ पर्यंत, गोवर २०२० पर्यंत समूळ नष्ट करण्याची महत्वाकांक्षी कृती योजनेची रूपरेषा दिली असून २०२५ पर्यंत क्षय रोगाचे निर्मुलन करण्याचे आणखी महत्वाकांक्षी लक्ष्य निर्धारित केले आहे. अशा संसर्गजन्य रोगांपासून देशापुढे असलेले आव्हान पाहता ही कृती योजना कितपत वास्तववादी आहे? यासाठी दिलेला सार्वजनिक निधी कृती योजना राबवून लक्ष्य साध्य करण्यासाठी वास्तववादाशी जुळतो का? आमच्या देशात खराब आरोग्य परिणामांसाठी प्रमुख कारण हे सुमार दर्जाची वितरण व्यवस्था हेच आहे. दुसरे कारण म्हणजे सरकारकडून सातत्याने दिला जाणारा अपुरा निधी आहे. आरोग्य क्षेत्रावरील सार्वजनिक निधीचे प्रमाण जीडीपीच्या १.२ टक्के आहे. वास्तवात गेल्या पाच वर्षात आरोग्य योजनांवरील केंद्र सरकारच्या निधीत सातत्याने घसरण होत गेलेली पाहायला मिळते.

**अखेरचे आरोग्य धोरण मंजूर झाल्यानंतर १५ वर्षांनी सरकारच्या अगदी ताज्या म्हणजे २०१७ मधील राष्ट्रीय आरोग्य धोरणाचा उद्देश्य देशाच्या सर्व लोकांना स्वस्त आणि दर्जेदार आरोग्य सुविधा पुरवणे हाच आहे. नवीन आरोग्य धोरण २०१७ मध्ये आरोग्य सेवांमध्ये गुंतवणूक व निधीपुरवठा याचा प्राधान्यक्रम निश्चित केला आहे. सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक बदलांना सामोरे जाताना सार्वजनिक आरोग्य प्रणाली नव्याने मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे.**

तंत्रज्ञानात झालेल्या प्रगतीमुळे देशातील आरोग्य सेवा सुविधांमध्ये सुधारणा झालेली असू शकेल परंतु अद्यापही ती परवडणाऱ्या किमतीत सर्वांना उपलब्ध नाही. अखेरचे आरोग्य धोरण मंजूर झाल्यानंतर १५ वर्षांनी सरकारच्या अगदी ताज्या म्हणजे २०१७ मधील राष्ट्रीय आरोग्य धोरणाचा उद्देश्य देशाच्या सर्व लोकांना स्वस्त आणि दर्जेदार आरोग्य सुविधा पुरवणे हाच आहे. नवीन आरोग्य धोरण २०१७ मध्ये आरोग्य सेवांमध्ये गुंतवणूक व निधीपुरवठा याचा प्राधान्यक्रम निश्चित केला आहे. सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक बदलांना सामोरे जाताना सार्वजनिक आरोग्य प्रणाली नव्याने मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. खासगी क्षेत्राशी भागीदारी मजबूत करण्याकडेही लक्ष दिले आहे.

राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ चा प्राथमिक उद्देश्य आरोग्य व्यवस्थेत गुंतवणूक, आरोग्य सेवा सुविधांची रचना करून अर्थपुरवठा करणे, क्षेत्रीय मर्यादा ओलांडून रोगांचा प्रतिबंध व चांगल्या आरोग्यासाठी कृती करणे, तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे, मनुष्यबळ विकास, वैद्यकीय अनेकत्वाला प्रोत्साहन, चांगल्या आरोग्यासाठी आवश्यक ज्ञानाचा पाया विकसित करणे, आर्थिक संरक्षण धोरणे आणि आरोग्यासाठी नियमन व प्रागतिक हमी अशा सर्व मितींमध्ये आरोग्य व्यवस्थेला आकार देण्यात सरकारच्या भूमिकेबद्दल माहिती देणे, स्पष्ट करणे, मजबूत करणे आणि प्राधान्य निश्चित करणे हा आहे. धोरणात देशातील सार्वजनिक आरोग्य संस्था नव्याने अभिमुख व मजबूत करण्यावर जोर दिला असून त्यामुळे मोफत औषधे, निदान करणे आणि इतर आवश्यक आरोग्य सेवा सार्वत्रिकरित्या उपलब्ध होऊ शकतील.

या धोरणाची व्यापक तत्वे व्यावसायिकता, एकत्मिकतता आणि नैतिकता, समानता, परवडणारे, सार्वत्रिकता, रुग्णकेंद्रित आणि सेवांचा दर्जा, उत्तरदायित्व यांना केंद्रस्थानी ठेवणारी आहेत. या धोरणात सार्वजनिक रुग्णालये आणि आरोग्य सुविधा नसलेल्या क्षेत्रांत अधिस्वीकृत गैरसरकारी आरोग्य सेवा पुरवठादारांच्या संयोगातून दर्जेदार दुय्यम आणि तिय्यम आरोग्य सेवांची स्वस्तात आणि सुधारित उपलब्धता आरोग्य सुविधांच्या अफाट किमतीमुळे होणाऱ्या खर्चात लक्षणीय घट साध्य करणे, सार्वजनिक आरोग्य सेवा प्रणालीवरील रुग्णांचा विश्वास पुन्हा स्थापित करणे, खासगी आरोग्य सेवा उद्योग त्याचबरोबर सार्वजनिक आरोग्य उद्दिष्टांच्या बरोबरीने वैद्यकीय तंत्रज्ञान यावर प्रभाव टाकणे यांची खात्री करण्यात आली आहे.

या धोरणात बालके आणि पौगंड अवस्थेतील मुलांच्या इष्टतम आरोग्यासाठी (आजार होण्याआधीच खबरदारीचे उपाय करण्याच्या उद्देश्याने) रोग होऊ नये म्हणून घेण्यात यावयाची काळजीप्रती वचनबद्धता पुन्हा ठामपणे व्यक्त केली आहे. या धोरणात शालेय आरोग्य कार्यक्रमांची प्रमुख भर देण्याचे क्षेत्र म्हणून परिकल्पना करण्यात आली असून आरोग्य व स्वच्छता यांना शालेय अभ्यासक्रमाचा एक भाग करण्यात येत आहे.

आरोग्य सेवा परंपरेतील अनेकत्वाला मजबुती देण्यासाठी धोरणात विविध आरोग्य प्रणालींना मुख्य प्रवाहात आणण्याची शिफारस केली आहे. आयुषची क्षमता मुख्य प्रवाहात आणण्यासाठी धोरणात आयुषअंतर्गत उपचार सार्वजनिक रुग्णालयांमध्ये लोकांना चांगल्या रीतीने उपलब्ध करून देण्याचाही विचार केला आहे. चांगल्या आरोग्याला चालना देण्याचा भाग म्हणून योगाचे धडे शाळा आणि कामाच्या ठिकाणी अधिक व्यापक रीतीने लागू करण्यात येतील.

समाजाचे देणे देण्याच्या उपक्रमांतर्गत ग्रामीण आणि सेवा नसलेल्या क्षेत्रांत मान्यताप्राप्त आरोग्य व्यावसायिकांकडून लाभासाठी काम यावर आधारित स्वयंस्फुर्तीने सेवा देण्या धोरणात समर्थन देण्यात आले आहे. आरोग्य सेवा प्रणालीची कार्यक्षमता आणि परिणाम सुधारण्यासाठी डिजिटल साधने व्यापक प्रमाणात तैनात करण्याची शिफारस धोरणात केली असून संपूर्ण आरोग्य सुविधा क्षेत्रात डिजिटल आरोग्याचे नियमन, विकास आणि तैनातीसाठी राष्ट्रीय डिजिटल हेल्थ ॲथारीटी स्थापन करण्याचे प्रस्तावित केले आहे. प्रागतिक वाढीव वचनावर आधारित पवित्रा घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. देशातील आरोग्य संस्थांसाठी आदर्श प्रमाण निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्यसेवा प्रमाण संघटना तयार करणे अनिवार्य करण्यात आले आहे. परंतु आरोग्य हा राज्याचा विषय असल्याने अशा संघटनेकडे तितकेसे अधिकार असतील की नाही याचीच अनिश्चितता आहे.

**भारतात पुढील २० वर्षात ३० लाख ५० हजार खाटा, ३० लाख डॉक्टर्स आणि ६० लाख परिचारिकांची आवश्यकता असेल असे 'प्राईस वॉटरहाऊस कुपर' या संस्थेने दिलेल्या अहवालात म्हटले आहे. भारतात सध्या फक्त १० लाख ३० हजार खाटा प्रती हजार लोकांमागे आहेत जे प्रमाण जागतिक आरोग्य संघटनेने निश्चित केलेल्या ३० लाख ५० हजार खाटा या मार्गदर्शक तत्वापेक्षा लक्षणीय रित्या कमी आहे**

देशातील आरोग्याच्या बाबतीतील पायाभूत सुविधांचे चित्र पूर्णपणे वेगळ्या प्रकारचे असल्याने विशेषतः गरीब राज्यांमध्ये नवीन आरोग्य धोरण राबवण्याचे आव्हान असून राज्यांतील सध्या अस्तित्वात असलेल्या व्यवस्था राष्ट्रीय कृती योजनेसाठी एका पातळीवर आणण्याची गरज आहे. राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ स्वतःच समारोप करते त्याप्रमाणे - `` धोरण जेव्हा अमलात आणले जाईल तेवढेच खरे असते.'' काही नवीन कल्पना आणि प्राधान्य क्रमांभोवती काम करण्यासाठी बहु भागधारक अंमलबजावणी कृती दल अथवा कार्य गट तयार केले तरच धोरण अधिक चांगल्या रीतीने अमलात आणणे शक्य होईल.

भारतात पुढील २० वर्षात ३० लाख ५० हजार खाटा, ३० लाख डॉक्टर्स आणि ६० लाख परिचारिकांची आवश्यकता असेल असे 'प्राईस वॉटरहाऊस कुपर' या संस्थेने दिलेल्या अहवालात म्हटले आहे. भारतात सध्या फक्त १० लाख ३० हजार खाटा प्रती हजार लोकांमागे आहेत जे प्रमाण जागतिक आरोग्य

संघटनेने निश्चित केलेल्या ३० लाख ५० हजार खाटा या मार्गदर्शक तत्वापेक्षा लक्षणीय रित्या कमी आहे.

**इथून आपण कुठे जाणार?**

अशा तऱ्हे भारतातील अफाट लोकसंख्येच्या लाभांशाचा पुरेपूर उपयोग करून घेण्यासाठी लोक, त्यांचे आरोग्य आणि शिक्षण यात प्रमुख गुंतवणूक करणे गरजेचे ठरेल. आजचे मूल हेच उद्याचा कामगार आहे.

शिक्षण क्षेत्राने खालील मुद्यांवर भर देणे आवश्यक आहे.

शिक्षण क्षेत्राचे आर्थिक आरोग्य - सरकार आणि खासगी शाळा यातील तफावत उद्यो

उपाय - योजनांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी शिक्षणात प्राधान्य क्रम निश्चित केला पाहिजे आणि अंमलबजावणीची खात्री करण्यासाठी जबाबदार यंत्रणा उभारली पाहिजे. शिक्षणावर जीडीपीच्या ६ टक्के खर्च वाढवणे हि ४० वर्षांपासून राष्ट्रीय कटीबद्धता राहिली आहे.

-शिक्षणाचा दर्जा, एकसारखेपणा आणि प्रसार - शिक्षकांचा दर्जा, शिक्षकांची मोठया प्रमाणावर असलेली रिक्त पदे या समस्या पायाभूत सुविधांचा जसे कि प्रयोगशाळा अभाव यामुळे अधिकच बिकट बनला आहे.

उपाय - पात्रताधारक शिक्षकांचे प्रमाण वाढवण्याची तसेच पात्र आणि कमी पात्रता असलेल्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. राज्ये आणि सर्व स्तरावर शाळा आणि उच्च शिक्षण क्षेत्रांत १५ ते ४० टक्के इतक्या शिक्षकांच्या तुटवड्याला सामोरे जावे लागते. शिक्षक प्रशिक्षणाबरोबरच शिक्षणाचा दर्जा, एकात्मिक अभ्यासक्रम यांचा आढावा घेण्यासाठी एक राष्ट्रीय दर्जाची यंत्रणा स्वीकारली पाहिजे.

शिक्षकांची अनुपस्थिती - शैक्षणिक देखरेखीचा ठळकपणे अभाव जाणवतो.

उपाय - शिक्षकांचे मूल्यमापन आणि मध्यावधी फेरमूल्यांकन (शिकवण्याचा दर्जा, शिक्षकांची उपस्थिती, प्रयत्न, सहअभ्यासक्रम आणि मूल्यमापन संबंधित उपक्रम, शैक्षणिक कामगिरी, विद्यार्थ्यांची कामगिरी) कामगिरीवर आधारित करणे, आभासी क्लासरूम कल्पनेला प्रोत्साहन द्यायला हवे. आपापल्या विषयात तज्ञ असलेल्या असामान्य कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचे एकात्मिक जाळे इतरांना प्रेरित व मार्गदर्शन करण्यासाठी तयार केले जाऊ शकते. भारतीय प्रशासकीय सेवेच्या धर्तीवर अखिल भारतीय शिक्षक सेवा लागू करायला हवी.

**आपापल्या विषयात तज्ञ असलेल्या असामान्य कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचे एकात्मिक जाळे इतरांना प्रेरित व मार्गदर्शन करण्यासाठी तयार केले जाऊ शकते. भारतीय प्रशासकीय सेवेच्या धर्तीवर अखिल भारतीय शिक्षक सेवा लागू करायला हवी.**

उपलब्धता - अभ्यास करण्याची अनिवार इच्छा असलेल्या तरुणांच्या अफाट लोकसंख्येच्या मागणीला पुरे पडतील इतका उच्च शिक्षण संस्थांचा पुरेसा पुरवठा करण्यात आपण असमर्थ आहोत. राष्ट्रीय ज्ञान आयोगाने १५०० संस्था असतील असे अंदाजित केले होते पण आपल्याकडे अवघ्या ७५० संस्था आहेत.

उपाय - भाकीत वर्तवण्याच्या अचूक यंत्रणेचा अभाव हे याचे मूळ कारण आहे. भविष्यकाळातील मागणी जाणून घेण्यासाठी तसेच शिक्षणावरील अर्थसंकल्पात वाढ करण्यासह सार्वजनिक आणि खासगी लक्ष्याचे विभाजन करण्यासाठी अंदाज वर्तवणारी यंत्रणा तयार केली पाहिजे. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयांतर्गत National Institutional Ranking Framework (NIRF) जारी केलेल्या यादीत देशातील सर्वोच्च दहा महाविद्यालयांपैकी सहा दिल्लीत आहेत. इतर चारपैकी एक कोलकाता, दोन चेन्नईत आणि एक तिरुचिरापल्ली येथे आहे. दर्जेदार उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची ही स्थिती धोक्याचा इशारा आहे.

परवडणारे शिक्षण - सार्वजनिक निधीतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची टंचाई आणि खासगी संस्थांचे प्रचंड शुल्क यामुळे शिक्षण बहुसंख्य विद्यार्थ्यांना परवडत नाही.

उपाय - शिष्यवृत्ती, शैक्षणिक कर्ज, उद्योग प्रायोजित शिक्षण यासारखे आर्थिक मॉडेल्सची शक्यता विविध स्तरांवर पडताळून पाहण्याची गरज आहे. भारतातील मुलींच्या शिक्षणात प्रगती घडवून आणण्यासाठी युनिसेफने तयार केलेल्या आणि मनुष्यबळ विकास मंत्रालयाने ने सुरु केलेल्या अ डिजिटल जेन्डर ॲटलासमुळे विशेषतः दुर्बल गटांतील मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत खराब

कामगिरी करणारे भाग निश्चित करण्यास सहाय्य होणार आहे. तसेच सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी एक खिडकी पोर्टल समावेशक समाज उभारण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना साहाय्य करेल.

स्वायत्तता - विद्यापीठांमधील राजकीय नियुक्त्या आणि सातत्याने केल्या जाणाऱ्या हस्तक्षेपामुळे संशोधनाच्या क्षमतेत खीळ घातली जात आहे.

उपाय - राष्ट्रीय नियुक्ती आयोग आणि अंतर्गत मॉडेल रचनेत स्वायत्तता ही काळाची गरज आहे.

रोजगार क्षमता - संशोधन सुविधा विद्यापीठापासून वेगळ्या करणे आणि रोजगार निर्माण करणाऱ्या महत्वाच्या शिक्षणाचा अभाव यामुळे देशात उच्च शिक्षणाचा पाठपुरावा करणे जोखमीचे ठरते.

उपाय - संशोधन केंद्रे, वैज्ञानिक विस्तार कार्यक्रम आणि शिक्षण उद्योग यांच्यातील संवाद यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

भाषेचा अडसर - बहुतांश इंग्रजी आधारित शिक्षण आणि भारतीय भाषांमध्ये भाषांतरित केलेल्या पुस्तकांचा प्रचंड तुटवडा यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण सुरु ठेवण्यापासून हतोत्साहित केले जाते.

उपाय - सर्व शैक्षणिक साहित्य विविध भारतीय भाषांमध्ये करण्याचे काम मिशन पद्धतीने हाती घेतले पाहिजे.

जगातील रोगांचा २१ टक्के बोजा एकट्या भारतात असून डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील गुणोत्तर १ : १७०० इतके वाईट असताना आणि लोकांचा आरोग्य सेवेवरील खर्च ६२ टक्के इतका उच्च असताना, भारताला आरोग्य क्षेत्रात रचनात्मक व मुलभूत आव्हानांचा सामना करण्यासाठी जालीम औषधाची गरज आहे.

उपलब्धता - सार्वजनिक आरोग्य वितरण सेवांची घटती भूमिका आणि पुरेशा कुशल लोकांचा अभाव

उपाय - सार्वजनिक आणि खासगी आरोग्य पायाभूत सुविधांचे प्रमाणीकरण, त्यांचे व्यवस्थापन, प्रशासन आणि एकंदर प्रशासकीय रचना यासह आरोग्य सेवेची लोकांना उपलब्धता, दर्जा आणि वितरण सुधारण्यासाठी नियामक यंत्रणा, स्वच्छता कार्यक्रम आणि इतर केंद्रीय व राज्यस्तरावरील योजनाच्या माध्यमातून प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेवर भर देणे गरजेचे आहे.

आरोग्य वितरणाच्या पायाभूत सुविधा - केपीएमजी अहवालात असे म्हटले आहे की, देशातील ६० टक्के रुग्णालये, ७५ टक्के दवाखाने आणि ८० टक्के डॉक्टर्स शहरी भागात राहत असून फक्त २८ टक्के लोकसंख्येला आरोग्य सेवा पुरवतात.

उपाय - वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या आणि जागा वाढल्याच पाहिजेत, ग्रामीण भागात डॉक्टरांना प्रशिक्षणाच्या काळात सेवा करण्यास उत्तम प्रोत्साहन दिले पाहिजे, ग्रामीण भागात किमान ३ ते ५ वर्षे सेवा केलेल्या विद्यार्थ्यांना पद्व्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमांत आरक्षण ठेवले पाहिजे, वैद्यकीय महाविद्यालयांत शिक्षकांच्या नियुक्तीसाठी वयोमर्यादा वाढवली पाहिजे, महाविद्यालयांत वैद्यकीय शिक्षण परवडणार्या किमतीत हवे (खासगी महाविलायांचे शुल्क जबर असते). अगदी वेगळ्या प्रकारचे, तंत्र प्रणीत, नाविन्यपूर्ण, कमी खर्च उपाय शोधण्याची तातडीची गरज आहे. फक्त २०१५ मध्येच आरोग्य सेवा क्षेत्रात सुमारे ३०० स्टार्ट अप उदयास आले आहेत.

विशेषज्ञ आवश्यकता - देशाच्या ग्रामीण आणि शहरी भागांत डॉक्टर्स, परिचारिका आणि निम वैद्यकीय व्यावसायिकांच्या उपलब्धतेत असमतोल

उपाय - आरोग्य क्षेत्रातील विशिष्ट आव्हानांचा सामना करण्यासाठी निवडक प्रशिक्षित व्यक्तींचा कायम स्वरूपी गट तयार करणे आणि रुग्णालयांना ई नेटवर्कद्वारे एकात्मिक करणे जो खाटा-डॉक्टर-सुविधांची उपलब्धता याची माहिती प्रसारित करेल (कार्यक्षम सेवांचे पुरवठादार व समावेशकता यांना सक्षम करणारे तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे)

परवडणारी आरोग्य सेवा - औषधे आणि चाचण्यांच्या प्रचंड किमती

उपाय - जेनेरिक औषधांना चालना

वरील संदर्भानुसार शिक्षण आणि आरोग्य ही क्षेत्रे येत्या दशकांत उभरत्या भारताची व्याख्या निश्चित करतील.

■ ■ ■

*लेखिका वरिष्ठ विश्लेषक असून लोकसभा वाहिनीतील ११ वर्षांचा त्यांना अनुभव आहे.*

*email: natashajha@gmail.com*

# करसुधारणा गतिमान मार्गावर

गेल्या वर्षी जून महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ (सीबीडीटी) आणि केंद्रीय सीमा शुल्क मंडळाच्या (सीबीईसी) अधिकाऱ्यांना संबोधित केले होते. देशाच्या तिजोरीमध्ये महसूल जमा करण्याचे काम करताना त्यांनी लक्षात ठेवावा असा "जलद" हा परवलीचा शब्द पंतप्रधानांनी दिला होता.

राजस्व ग्यान संगमच्या समारोपप्रसंगी वरिष्ठ कर अधिकाऱ्यांना खऱ्या अर्थाने "जलद" हा संदेश त्यांच्या सोबत महसूल, उत्तरदायित्व, सचोटी, माहिती आणि डिजिटायजेशनमध्ये सोबत न्यायचा होता. पंतप्रधानांच्या संदेशाचे सार हे होते की, त्यांच्या बाबतीत कायद्याचे राज्य अंमलात आणणे गरजेचे आहे जे लोक कर जाणीवपूर्वक बुडवत असतात, पण जे लोक कर चुकवत असतात किंवा ज्यांना मनापासून कर भरण्याची इच्छा असते त्यांना त्यांचे राष्ट्रीय कर्तव्य भीतीने नव्हे तर अभिमानाने बजावता आले पाहिजे.

योग्य माहिती, योग्य कायदे, साधने यांच्या माध्यमातून करदात्यांचे सक्षमीकरण केले आणि एकात्मिकता आणि उत्तरदायित्व असलेल्या अधिकाऱ्यांशी त्यांचा संबंध आला तरच त्यांच्या मनातील भीती दूर होऊ शकेल. पूर्वलक्षी प्रभावाने लागू होणारे जुने कर रद्द करण्यात आले असून, त्याबाबत न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा देखील निपटारा करण्यात आला.

करदात्यांची करप्रक्रिया अधिक सोपी करण्यासाठी अर्थमंत्रालय सातत्याने अनुपालनाचे ओझे कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. याचे उदाहरण म्हणजे यापूर्वीच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री अरुण जेटली यांनी स्थानिक दरनिश्चिती हस्तांतरणाच्या कक्षांवर निर्बंध घालण्याची घोषणा केली. प्रत्यक्षात 2012च्या अर्थसाहाय्य कायद्यात करचुकवेगिरीला आळा घालण्याचा उपाय म्हणून हा उपाय योजण्यात आला होता.

त्याच प्रकारे अनुमानित उत्पन्न योजनांना प्राधान्य देणा-या व्यापारी आस्थापनांच्या ताळेबंदासाठीची मर्यादा एक कोटीवरून दोन कोटी करण्यात आली आहे. वैयक्तिक करदात्यांसाठी आणि हिंदू एकत्रित कुटुंबासाठी हिशेबपुस्तके राखण्याची मर्यादा १० लाख रुपयांवरून २५ लाख रुपये करण्यात आली आहे. व्यावसायिकांसाठी अनुमानित कर मर्यादा वार्षिक ५० लाख रुपये करण्यात आली आहे. या तरतुदीमुळे लहान उद्योगांनी ताळेबंदाची हिशेब पुस्तके राखण्याची गरज उरलेली नाही.

परदेशी पोर्टफोलियो गुंतवणूकदारांना समभागांचे किंवा लाभाचे हस्तांतरण करण्याच्या अनुषंगाने उद्योग करण्यात सुलभता निर्माण व्हावी म्हणून वापरकर्त्यांना सोप्या होतील अशा अनेक तरतुदी प्राप्तिकर कायद्यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

पण सर्वात मोठी आणि प्रभावी कर सुधारणा जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर कायद्याच्या रूपाने यावर्षी जुलै महिन्यात किंवा उशिरात उशिरा सप्टेंबर महिन्यात येऊ घातली आहे. जरी एकंदर राजकीय वातावरणाचे परिदृश्य प्रशंसनीय बनत चालले आहे आणि संसदेमध्ये परिवर्तनकारी घटनात्मक सुधारणांना पाठबळ मिळत आहे, तरीही पंतप्रधानांनी खंबीर निर्धाराने उचललेल्या पावलांमुळे हे चित्र निर्माण होऊ शकले आहे. जीएसटी लागू करण्यासाठी पूर्ण क्षमतेने तयारी सुरू असताना, पंतप्रधान स्वतः जातीने या तयारीवर लक्ष ठेवून आहेत. व्यवसाय आणि ग्राहक वस्तू आणि सेवांवर चुकता करत असलेल्या करप्रणालीमध्ये आमूलाग्र परिवर्तन करणाऱ्या अप्रत्यक्ष करासंदर्भात केंद्र आणि राज्यांची व उद्योगांची सज्जता याकडे त्यांची नजर आहे.

यापूर्वीच्या उत्पादक किंवा मूळ स्रोतांवर आधारित करप्रणालीच्या विपरित असलेली ही करप्रणाली म्हणजे अंतिम करआकारणी किंवा ग्राहक आधारित आकारणी असून तिच्यामुळे अनेक प्रकारच्या करांचे एकत्रिकरण होणार आहे आणि शुल्क आणि कर्ज चुकवण्याची पद्धती अतिशय सोपी होणार आहे. त्यामुळे सरतेशेवटी उत्पादन शुल्क, अतिरिक्त उत्पादन शुल्क, मूल्यवर्धित कर किंवा विक्री कर, सेवा कर आणि जकात अशा विविध करांना तोंड देण्याऐवजी ग्राहकाला केवळ एकच कर भरावा लागणार आहे.

विविध प्रकारचे अंदाज असे सूचित करत आहेत की जीएसटीमुळे देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात किमान एक ते दोन टक्क्यांची वाढ होणार आहे, कारण आतापर्यंत व्यापार आणि उद्योगातील करांच्या जाळ्यातून वेगळ्या राहाणाऱ्या अनेक व्यवस्थांना त्यांच्या स्वतःच्या हितांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या

क्षमतावृद्धीसाठी या नव्या करप्रणालीत समाविष्ट व्हावेच लागणार आहे.

या कराचा वस्तूंच्या दरावर परिणाम होण्याच्या चिंता निराधार म्हणाव्या लागतील. त्याउलट मध्यम ते दीर्घ कालावधीमध्ये संपूर्ण मूल्य साखळीअंतर्गत व्यापार प्रणालींना सहजगत्या पतपुरवठा होऊ लागल्याने वस्तूंचे दर कमी व्हायला मदत होऊ शकेल. त्याचबरोबर राज्यांतर्गत होणाऱ्या मालवाहतुकीमध्ये सीमेवर होणाऱ्या विलंबामुळे या व्यवहाराच्या खर्चात होणारी वाढ कमी झाल्यामुळेही ग्राहकांचा खर्च कमी होईल.

व्यापार आणि उद्योग क्षेत्र जीएसटीच्या सुरळित कार्यान्वयनासाठी सज्ज झाले आहे. सीबीडीटी, सीबीईसीच्या संपूर्ण यंत्रणा राज्य सरकारांसह कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यामध्ये आणि व्यापार क्षेत्राशी संवाद साधण्यामध्ये कार्यरत झाल्या आहेत. सुरुवातीच्या टप्प्यात जीएसटी जाळे आधारित प्रणालीकडे स्थानांतरित होताना अजाणतेपणे काही त्रुटी निर्माण झाल्यास त्याबाबत काही प्रमाणात उदार धोरण अवलंबण्याची मागणी उद्योग क्षेत्राकडून होत आहे. अशा प्रकरणांची गुणवत्ता निश्चित केली जाणार असल्याने त्याबाबत जीएसटी परिषदेने निर्णय घेणे गरजेचे आहे. शेवटी जीएसटीला यशस्वी करण्यासाठी आणि भारताच्या करसुधारणांचे दर्शन जगाला घडवण्यासाठी खूपच जास्त प्रमाणात प्रयत्न करावे लागणार आहेत.

जागतिक पतमानांकन संस्था आणि बहुस्तरीय संघटना देखील भारताकडून होणा-या जीएसटी अंमलबजावणीकडे अतिशय काळजीपूर्वक लक्ष ठेवून आहेत. याची सुरळीत अंमलबजावणी नक्कीच भारताला वर नेणार आहे. व्यवसायासाठी सुलभता निर्माण करण्याच्या जागतिक बँकेच्या यादीमध्ये काही स्थानांची तरी सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. करआकारणी हा प्रमुख निर्देशांकापैकी एक असून तो स्थानिक आणि जागतिक स्रोतांकडून होणाऱ्या गुंतवणुकीला चालना देणाऱ्या घटकांपैकी एक आहे. सध्या तरी भारतासाठी तो योग्य ठिकाणी आहे.

(प्रकाश चावला एक ज्येष्ठ पत्रकार आणि समालोचक आहेत. ते राजकीय अर्थव्यवस्था आणि जागतिक आर्थिक विषयांवर लिखाण करत असतात.)

■ ■ ■


## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके




किंमत प्रत्येकी ३० रु.


**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No.G/NMB/137/2016-18


Published Date: 12th **June,** 2017
Date of Posting : 16th **June,** 2017






Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr (Ms) Sadhana Rout** Director General (I/C) on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.


# श्री. रंजन कोळंबे सर लिखित
# भगीरथ प्रकाशनाची दर्जेदार प्रकाशने...

























# UPSC | MPSC

## भगीरथ प्रकाशनाचे आगामी प्रकाशने

१५ जून २०१७




२० जून २०१७

**Bhagirath IAS Academy**
UPSC • MPSC

ऑफीस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे-३०
ऑफीस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे -३०
**Ph.: 020-64013450 | 9970298197 | 7378406920**
***Web :*** www.bhagirathacademy.com
***E-mail :*** bhagirathacademypune@gmail.com
***Facebook :*** Bhagirath IAS Academy